गोव्याच्या राज्यकर्त्यांचीं

नाणीं

—ना. भा. नायक

ॐ

इतिहास-ग्रंथमाला प्रकाशन ४ थें

गोव्याच्या राज्यकर्त्यांचीं नाणीं

★

लेखक
नारायण भास्कर नायक
साहित्य विशारद्
संपादक 'भारतमित्र'
रिवण, गोवा.

★

प्रकाशक:
ना. भा. नायक

सन १९६४

★

मूल्य रु. ३-५०

प्रकाशन:
भारतमित्र कार्यालय
रिवण, गोवा

मुद्रण:
नूतन प्रिंटिंग प्रेस
मडगांव-गोवा

विषयानुक्रम

प्रास्ताविक

'भारतमित्र' प्रकाशनाच्या इतिहास–ग्रंथ-मालेचा हा चौथा ग्रंथ रसिक वाचकांस सादर करतांना फार समाधान वाटत आहे. 'गोमंतक–इतिहास–दिग्दर्शन', 'गोमंतकीय देवालयें' आणि 'गतकालीन गोमंतकीय मुत्सद्दी' अशा मागील तीन ग्रंथांप्रमाणेंच या चौथ्या नाणक–ग्रंथाचेंहि वाचक वर्गाकडून सानंद स्वागत होईल अशी आशा आहे. निरनिराळ्या ग्रंथोत्तेजक संस्था व विद्वद्वर्य यांकडून पहिल्या ग्रंथास ५०० रुपयांचीं, दुसऱ्यास १२५ रुपयांचीं आणि तिसऱ्यास ४० रुपयांचीं रोख पारितोषिकें व अनेक आशीर्वाद लाभले; नियतकालिकांचे उत्तेजक अभिप्राय मिळाले; आणि बहुजन समाजांतील सूज्ञ वाचकवर्गानें स्वयंस्फूर्तीनें स्वागत केलें, त्यामुळें स्फूर्ति मिळून प्रस्तुत ग्रंथ इतक्या लवकर प्रकाशनांत येत आहे.

या विषयावरील हा ग्रंथ अगदीं पहिलाच आहे. असा एखादा ग्रंथ मराठींत किंवा पौरवात्य अन्य भाषेंत तर नाहींच; पण पोर्तुगीज, इंग्रजी किंवा अन्य पाश्चिमात्य भाषांतहि नाहीं. केवळ नाणक शास्त्रावरील ग्रंथ कांहीं भाषांत असले तरी प्रत्यक्ष गोव्याच्या राजकर्त्यांच्या नाण्यांची माहिती सहजासहजीं कुठें मिळत नाहीं, आणि त्यामुळें आरंभीं या ग्रंथलेखनाचें काम जरी सहज साध्य वाटलें, तरी पुढें विविध माहिती मिळविण्यासाठीं पोर्तुगीज, इंग्रजी किंवा अन्य नाणक ग्रंथांपेक्षां शिलालेख, ताम्रपट, नाणीं व दप्तरेंच अधिक पाहण्याचे परिश्रम करावे लागले. नाणीं प्रत्यक्ष पहाण्यासाठीं गोमंतकांत व गोव्याबाहेरहि अनेक ठिकाणीं प्रवास करावा लागला आणि अशा रीतीनें परिश्रमपूर्वक माहिती मिळवून ती ग्रंथरूपानें आज जनतेसमोर येत आहे. अशा या गोमंतकांतील पहिल्या नाणक-ग्रंथाचें रसिक वाचकवर्ग सप्रेम स्वागत करील अशी आशा आहे.

शिलालेख, ताम्रपट, मुद्रा यांच्याप्रमाणेंच नाणीं हीं देखील इतिहासाचें अमोल साधन असून ज्या राज्यकर्त्यांचे शिलालेख किंवा ताम्रपट उपलब्ध नाहींत त्यांची माहिती नाण्यांवरून मिळूं शकते. ग्रीक राजांचा 'विदिशा' हा एकच शिलालेख पंजाबला सांपडला; पण नाणीं २७ राजांचीं सांपडल्यानें त्यांवरून त्यांचा पत्ता लागला. पश्चिमीय क्षत्रपांचेहि अवघेच शिलालेख सांपडले; पण त्यांचीं हजारों नाणीं सांपडल्यानें त्यांवरून त्यांच्या वंशावळीहि तयार करण्यांत आल्या. असें आहे नाण्यांचें महत्व.

या ग्रंथांत चलन पूर्वकाल, चलन निर्मिती, प्राचीन चलन, कागदी चलन, ज्ञात इतिहासारंभींचीं नाणीं अशी माहिती प्रथम देऊन नंतर गोमंतकाच्या प्राचीन व अर्वाचीन राज्यकर्त्यांचा इतिहास आणि त्यांच्या नाण्यांची माहिती दिली आहे.

प्रस्तुत ग्रंथासाठीं ज्यांनीं आपल्याकडील निरनिराळ्या साधनांचा मला प्रेमानें उपयोग करूं दिला व ज्यांनीं आपल्या संग्रहांतील नाणीं आदरपूर्वक दाखविलीं त्यांचा मी कृतज्ञ आहें.

— लेखक

गोव्याच्या राज्यकर्त्यांचीं नाणीं

— १ —

चलनपूर्व काल

सजीव सृष्टि निर्माण होऊन बराच काल लोटल्यानंतर मनुष्यप्राणी जन्मास आला. मनुष्योत्पत्तीचा काल दहा लाख वर्षांपूर्वीचा आहे असा शास्त्रज्ञांचा कयास आहे. तथापि उपलब्ध असलेल्या अवशेषांवरून सुमारें पन्नास हजार वर्षांपूर्वींच्या मनुष्यांबद्दलची कांहीं कल्पना करतां येते. त्या कालास पाषाणयुग म्हणतात. तेंच मानवी संस्कृतीचें आद्ययुग होय. या युगाचे पुरातन व नूतन असे दोन भाग असून पुरातन पाषाणयुगांत मनुष्य दगडी हत्यारांनीं शिकार करून राहात असे. नूतन पाषाणयुगांत धनुष्यादि शस्त्रें त्याला उमगलीं. पण बाण लाकडी होता. पुढें जनावरें पाळण्यांची व त्यांचा उपयोग करून घेण्याची त्याला माहिती झाली. तो शेती करूं लागला. फळझाडांवरहि प्रयोग करून मधुर फळें तयार करूं लागला. अशा रीतीनें अनेक शतकांनंतर तो ताम्र युगांत आला. आणि त्यानंतर बऱ्याच कालानें लोहयुगांत प्रवेशला. या युगाकडे पोंचण्यास त्याला अनेक पिढ्या घालवाव्या लागल्या.

सुधारणेच्या मार्गास लागल्यावर जनावरांसारखें राहाण्याचें सोडून मनुष्य झोंपडी बांधून राहूं लागला. या वेळेपासून कौटुंबिक जीवनास व मालमत्तेच्या कल्पनेस सुरवात झाली. कौटुंबिक राहणीमुळें मनुष्याच्या शरीरावर व मनावर सुखदायी परीणाम घडूं लागला व सुखाची अपेक्षा होऊं लागल्यानें तिच्यांतून पुढें वैमनस्यहि मूळ धरूं लागलें. वैमनस्यामुळें तंटे होऊं लागले. त्यामुळें जमातीच्या पुढाऱ्यांवर आपल्या लोकांच्या रक्षणाची जबाबदारी आली आणि पर्यायानें पुढें तेच राजे होऊन बसले.

अशा रीतीनें मानवजातीची जसजशी प्रगति होत गेली तसतशा त्यांच्या गरजा वाढीस लागल्या. या गरजा भागविण्यास अवश्य असलेल्या धान्यादि जिन्नसाचें उत्पादन एकट्यास करणें अशक्य होऊं लागल्यानें त्याला निरनिराळ्या व्यक्तींनीं उत्पन्न केलेल्या जिनसच्या देवघेवीवर अवलंबून राहाणें भाग होऊं लागलें. आपणास एखादी वस्तु हवी असल्यास तिच्याबद्दल त्याला आपल्याजवळील दुसऱ्याला हवी अशी वस्तु मोबदला देऊनच ती घ्यावी लागे. अशा पद्धतीस 'ऐनजिनसी विनिमय' असें म्हणतात. उदाहरणार्थ एका इसमाजवळ नारळ असून त्याला तांदुळ घ्यावयाचे आहेत. अशा वेळीं तो नारळ दुसऱ्यास देऊन त्याच्या बदलीं तांदुळ घेई आणि नारळांची जरूरी नसल्यास त्याला अन्य वस्तु बघावी लागे.

दुसऱ्यास हव्या असलेल्या वस्तु किंवा जिन्नस याकडे असल्या तरच हा व्यवहार होई; नसल्यास नाहीं. या अडचणीमुळें देवघेवीचें सर्वमान्य साधन म्हणून चलन प्रचारांत आलें.

चलन

देवघेवीचें सोयीचें साधन म्हणून प्राचीन कालीं जें चलन प्रचारांत आलें तें आजच्या सारखें धातूचें किंवा कागदीहि नव्हतें. तर जगाच्या निरनिराळया भागांत निरनिराळ्या वेळीं तें वेगवेगळें होतें. कातडें, जनावरें, धान्य, फळें, तेल, अंडीं, कवड्या, बदाम, तंबाकू, कापड वगैरे निरनिराळ्या सजीव निर्जीव वस्तूंचा चलन म्हणून प्राचीन कालीं उपयोग करण्यांत आल्याचें ऐतिहासिक माहितीवरून दिसून येतें. मनुष्यानें प्रथम आपल्याला अनुरूप अशा पदार्थांचा चलन म्हणून उपयोग केला. पुढें जसजशी सुधारणा होत गेली तसतशी चलनांतहि सुधारणा झाली.

शिकारी युगांत मारलेल्या जनावराचें चामडें माणसाजवळ होतें. म्हणून त्याचें चलन सुरू झालें. मनुष्य जनावरें बाळगूं लागला त्यावेळीं चलनांत जनावरांचा उपयोग होऊं लागला. त्याचा शेती व्यवसाय सुरू झाला त्यावेळीं धान्याचा उपयोग चलनांत होऊं लागला. कवड्या, बदाम, इतर फळें,अंडीं, कोंबडीं यांचाहि चलनांत उपयोग झाल्याचें दिसून येतें. पुढें अशा चलनाच्या अधिकाधिक अडचणी भासूं लागल्या. फळें, अंडीं, कोंबडीं वाहतुकींत सुकून, फुटून किंवा मरून मूल्यांत कमीपणा येऊं लागला. गुरें, घोडे यांची किरकोळ चलनांत अडचण येऊं लागली. शिवाय जनावरें हीं जीवंत असल्यानें तीं चलन म्हणून दूरच्या गांवीं नेणें फार खर्चाचें होऊं लागलें. कित्येक प्रसंगीं जनावरें प्रवासांतच मरत. अशा रीतीनें चलन ठराविक जागीं पोंचण्यापूर्वींच कमी होत जाऊं लागून हा चलनव्यवहार फायद्याचा न होतां नुकसानीचा होऊं लागला.

अशा व्यावहारिक नुकसानीमुळें मूळच्या चलनांत बदल करण्याचा खटाटोप सुरू झाला आणि त्या अडचणींतून फार पडण्यासाठीं मोल, अविनाशित्व, विभाज्यता, वाहतुकींतील सुट-सुटीतपणा वगैरे गुणांमुळें धातूचें चलन अस्तित्वांत आलें.

या नवीन सोयीस्कर चलनाचे लहान लहान भाग करतां आले व आपआपल्या आवश्यक असलेली वस्तु जरूर तेवढीच धातूचीं नाणीं देऊन विकत घेतां येऊं लागली.

धातूच्या चलनाचा उपयोग बऱ्याच प्राचीन कालापासून झालेला आढळतो. वस्तूंच्या चलनाची जागा धातूनें घेतली त्यावेळीं लोकांना फार समाधान झालें. त्यांचे चलनांतील अनेक प्रकारचे त्रास दूर झाले.

धातूचें चलन अस्तित्वांत येण्यापूर्वीं माणसाच्या संपत्तीची मोजदाद विशेषत: गुरांढोरांच्या खिल्लारांवरून करण्यांत येत असे. अजूनहि कांहीं मागसलेल्या जमातींत गुरें, बकरीं, मेंढरें यांच्या अधिक संख्येवरून त्यांच्या धन्यांच्या श्रीमंतीचा कस ठरविण्यांत येतो.

धातूचें चलन

धातूचें नाणें अस्तित्वांत आलें त्यावेळीं तें लोकांना फार सुटसुटीत वाटलें. आरंभीं सोनें, चांदी, तांबें, यांचे नुसते तुकडेच नाणें म्हणून उपयोगांत आणीत. दर वेळीं त्या तुकड्यांचें वजन करून घेत. प्रत्येक वेळीं वजनाचा खटाटोप आणि तुकड्यांतील सोनें किंवा चांदी शुद्ध आहे कीं नाहीं हें समजण्याची अडचण येऊं लागल्यानें पुढें त्यांत सुधारणा होऊन ठराविक वजनांचीं नाणीं प्रचारांत आलीं. या नाण्यांवर सरकारी शिक्का असे. त्यामुळें नाण्यांस लोकांची मान्यता मिळून त्याच्या उपयोगापासून जनतेची ठीक सोय झाली, आणि ती सर्वांच्या इतकी आंगवळणी पडली कीं, नाण्यांवांचून व्यवहारच अशक्य असा समज होऊन बसला.

भारी किंमतीचीं व मुख्य नाणीं सोन्याचीं व चांदीचीं असून किरकोळ व्यवहारासाठीं तांब्याचीं अशी व्यवस्था प्रचारांत आली. या नाण्यांमुळें सर्व प्रकारच्या देवघेवींत अधिक सुलभता आली.

असें जरी असलें, तरी धातूच्या नाण्यांत पुढें एक अडचण डोकावूं लागली. ती अशी, एखाद्या जिन्नसाची या नाण्याच्या मूल्याशीं तुलना होत असतां, खुद्द नाण्यांचें मूल्य प्रसंगीं कमी अधिक होऊं लागलें. कारण सोनें, चांदी, तांबें या धातूंचा पुरवठा कित्येक वेळीं फार तर कित्येक प्रसंगीं कमी होऊन मूल्यांत कमी अधिक फरक पडूं लागला आणि त्या चढउतारांचा परिणाम त्यापासून बनविलेल्या नाण्यांच्या मूल्यांतहि साहजिकच होत जाऊं लागला.

सदर अडचणींतून सहजपणें सुटण्यासाठीं नाण्यांचा पुरवठा लोकांच्या गरजेप्रमाणें बिनहरकत कमी जास्त होऊं देणें योग्य वाटूं लागलें.

ठराविक वजनांचें सोनें किंवा चांदी दिली असतां सरकारनें आपल्या टांकसाळींतून ठराविक नाणीं पाडून देण्याची व बाजारांत त्या धातूंस अधिक किंमत आल्यास नाणीं हवीं तेव्हां वितळविण्याचा हक्क लोकांस देण्याची व्यवस्था केली. या योजनेमुळें नाण्यांतील धातूच्या मोलाचें प्रमाण बाजारांतील धातूच्या मोलाशीं कायम राखतां येऊं लागलें.

ज्या अतिप्राचीन धातूच्या नाण्याचा प्रथम उल्लेख मिळतो त्याचें नांव '**कृष्णल**' असें आहे.

'कृष्णल' हें भारतांतील अतिप्राचीन नाणें आहे. वेदकालांत यज्ञ कृत्यांतील दक्षिणेचा उल्लेख करतांना वेद वाङ्मयांत एका ठिकाणीं बारा 'कृष्णल' दक्षिणा दिल्याची नोंद आहे.

'कृष्णल' नाणें बारा भार वजनी असून तें सोन्याचें होतें. हें नाणें प्राचीन असूनहि सुंदर असल्याचा उल्लेख आहे.

पद्धतशीर चलन

व्यवहारचें सर्वमान्य साधन म्हणजे चलन. तें जिन्नसवाल्यास देऊन त्याच्या मोबदल्यांत आपणास जरूरी असलेल्या जिनसा घेणें हाच त्याचा मुख्य उपयोग.

चलनास सरकारी शिक्क्यानें सार्वत्रिक मान्यता मिळते, व लोकांचा त्याच्यावर विश्वास बसतो. असें असलें तरी अमूक नाण्यांची किंमत अमूक आहे म्हणून ती मानावी असें म्हणणें योग्य नाहीं. नाण्याची कायदेशीर किंमत व नाण्यामध्यें वापरलेल्या धातूची किंमत हीं जर एक असतील तरच ती चलन पद्धति पद्धतशीर आहे असें मानण्यांत येतें.

नाण्यावरील किंमतीच्या शिक्क्यापेक्षां त्यांतील धातूची किंमत कमी असल्यास किंमतीच्या शिक्क्याप्रमाणें देशांतल्या देशांत त्याचा व्यवहार होई. तथापि जगाच्या बाजारांत त्याची किंमत धातूच्या वजनानुरूपच असे. त्यामुळें परदेशी व्यवहारांत नुकसान येऊं लागलें.

व्यवहार विनिमयाचें लोकमान्य साधन म्हणजे चलन आणि त्याच्या मोबदल्यांत वस्तु घेणें हा त्याचा उपयोग. सरकारी शिक्क्यामुळें चलनावर लोकांचा विश्वास बसतो. कायद्याचा अधिकार आणि लोकांचा विश्वास यांच्या जोरावर व्यवहारांत निशंकपणें चलन खेळतें. वास्तविक पहातां नाण्याला अंगच्या किंमतीची आवश्यकता नाहीं कारण तें फक्त देवघेवीचें साधन. कापड मोजण्याचा गज लांकडाचा असला काय किंवा सोन्याचा असला काय सारखेंच. चलन हें वस्तूंचें मोल मापण्याचें मापच नव्हे का? तथापि पैशाचा पुरवठा वाढला असतां त्याचें मूल्य किंवा पदार्थ विकत घेण्याचें सामर्थ्य कमी होतें. म्हणजेंच बाजारभाव वाढतो.

याच्या उलट चलनाचा पुरवठा कमी झाला तर त्याचें मूल्य वाढतें आणि बाजारभाव घटतात.

चलन हें साध्य नसून तें केवळ व्यवहार विनिमयाचें साधन आहे. तथापि सर्व साधारण-पणें जिन्नस विकत घेणाऱ्या साधनासहि अंगची किंमत असावी असें लोकांस वाटणें साहजिकच आहे.

नाणीं जवळ बाळगण्याची व पुढील उपयोगासाठीं राखून ठेवण्याची आवश्यकता आर्थिक प्रगतीबरोबर कमी कमी होत जाऊन लोकांस चलनाच्या खऱ्या स्वरूपाची ओळख पटत जाते तेव्हाच ठीक असतें.

ज्या नाण्याची कायदेशीर किंमत त्यांतील धातूच्या मूल्यापेक्षां अधिक असून ती धातू टांकसाळींत नेऊन अन्य नाणीं पाडून घेण्याची सवलत नसते व जें नाणें दुसऱ्या नाण्याच्या हिशाचें असतें त्याला उपनाणें म्हणतात. अशीं उपनाणी पूर्वीं प्रचरांत होतीं.

प्राचीन चलन

चलन सुरू करण्याचा पहिला मान भारताचा आहे. वस्तूंचें चलन व्यवहारांत प्रत्येकाला जाचक होऊं लागलें त्यावेळीं जनतेंतील विचारवंत प्रमुखांच्या कित्येक सभा होऊन त्यांत धातूचें चलन अस्तित्वांत आणण्याचा विचार मंजूर झाला.

वेदकालांत '**कृष्णल**' या नांवांचें पहिलें नाणें अस्तित्वांत आलें, त्यावेळीं त्या नाण्याबद्दल प्रत्येकाला कौतुक वाटलें. हें नाणें बारा भार वजनाचें दिसण्यांत सुंदर व निर्भेळ सोन्याचें होतें. पाणिनी सूत्र कालांतहि हें सुवर्ण नाणें अस्तित्वांत असल्याचा उल्लेख मिळतो.

रामायणकालांत श्रीरामराज्याभिषेकाच्या वेळीं जीं नाणीं निघाली तीं सोन्याचीं असून त्याच्या मुख्य बाजूनें सूर्य व दुसऱ्या बाजूनें तुळसी पत्र होतें.

महाभारतकालांत धर्मराजाच्या राज्याभिषेकाच्या वेळीं जीं नाणीं पाडण्यांत आलीं तीं सोन्याचीं असून हस्तनापूरच्या नवीन टांकशाळेंत पाडलीं होतीं. या सुवर्ण नाण्यांत 'कृष्णल' व 'निष्क' असे दोन प्रकार होते.

महाभारतकालांत कृष्णल, निष्क, शतमान, कार्षापण, शाण अशीं नाणीं असल्याचा उल्लेख मिळतो. कृष्णल व निष्क हीं सोन्याचीं, शतमान व कार्षापण हीं चांदीचीं आणि शाण हें तांब्याचें होतें असें म्हटलें आहे. यांवर सूर्य, चंद्र, धनुष्य असे ठसे असत.

यानंतर कित्येक कालपर्यंत भारतांत निष्क, गद्याण, पण, हाग, द्राम, धरण अशीं निरनिराळ्या राज्यकर्त्यांचीं निरनिराळ्या आकाराचीं व निरनिराळ्या धातूचीं नाणीं प्रचारांत असल्याची माहिती मिळते.

सदर नाण्यांवर एका किंवा दोन्हीं बाजूंवर ठसे असत. व ते मनुष्य, वृक्ष, तरवार, गाय यांचे असत.

पुढील कालांत होन, मोहरा, पुतळ्या अशीं सोन्यांचीं नाणी अस्तित्वांत आलीं. तशींच कांहीं रुप्याचीं व तांब्याचींहि होतीं. तथापि या कोणत्याच नाण्याची अधिकृत किंमत कायद्यानें ठरविलेली नव्हती. त्यामुळें सदरील सर्व नाण्यांच्या किंमती धातूच्या बाजारभावाप्रमाणें वारंवार बदलत असत. ज्यांच्याजवळ हें नाणें विशेष खेळत राही अशा व्यापारी व्यवहारी लोकांना इतर जिन्नसाप्रमाणें प्रत्येक नाण्यावरहि नफा तोटा होण्याचा प्रसंग येई.

वेगवेगळ्या वजनांचीं नाणीं वेगवेगळ्या भागांत चालत. त्यामुळें एका भागांतील नाणीं दुसऱ्या भागांत नेण्यांत येत तेव्हां देवघेवींत त्यांचीं वजनें करावीं लागत. नाण्यांचें वजन केल्यावांचून कोणताच व्यापारी तीं स्वीकारीत नसे. निरनिराळ्या ठिकाणचें नाण्यांतील असें हें निरनिराळें प्रमाण लोकांना बरेंच त्रासक होई व त्यामुळें जरूरीशिवाय नाणें जास्त सांठविलें जात नसे.

कागदी चलन

चलनाचा वास्तविक उपयोग तें दुसऱ्यास देतां यावें, खर्चितां यावें हा आहे. यासाठीं सोनें, चांदीसारख्या मूल्यवान् वस्तूंच्या ऐवजीं कागदाचा उपयोग करण्यांत व्यवहारी लोकांचा फायदा असून सोयीचेंहि आहे असें दिसून आल्यानें पुढें कागदी चलन प्रचारांत आलें.

पहिल्या प्रथम हुंडीच्या स्वरूपांत कागदी चलनास सुरवात झाली. हुंड्यांची पद्धत भारतांत फार प्राचीन कालापासून चालत आलेली आहे. प्रवास करणें पूर्व कालांत धोक्याचें होतें. त्यांत खर्चासाठीं नाणें बरोबर घेणें आणि तें संभाळणें तर अत्यंत कठिण होतें. त्यामुळें पतवाल्या मोठ्या सावकारांकडे रकमा ठेवून त्यांचेकडून हुंड्या घेत आणि दुसऱ्या ठिकाणच्या त्याच्या स्नेही सावकाराकडून जरूरीप्रमाणें त्यांचे पैसे वसूल करीत. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे हल्लीच्या प्रवाशांना ज्याप्रमाणें बँका निर-निराळ्या शहरीं रकमा मिळण्याची सोय ड्रफ्ट वगैरेंनीं करतात, तीच व्यवस्था हुंड्यांच्या योगानें पूर्वी होत असे.

प्रवासी लोक पैसे भरून हुंडी घेत ती विशेषत: दर्शनी हुंडी असे. दर्शनी हुंडी म्हणजे त्वरीत पैसे मिळावयाची. पुराणांत अशा हुंड्यांचा उल्लेख आहे. इतर हुंडी हें एक धनकोनें रिणकोस लिहिलेलें पत्र असे. त्यांत लिहिलेली रकम रिणकोनें एका ठराविक इसमास ठराविक वेळीं द्यावी अशी धनकोनें आज्ञा केलेली असे. हुंडी ही लेखीच असली पाहिजे व तींत रकम देण्याचा हुकूम विनशर्त असला पाहिजे असा नियम असे. क्वचित् एखादी अट नमूद केली असल्यास ती अट पार पडेल अशी खात्री असावी लागे.

व्यापारी लोकहि हुंड्याच घेत व त्यामुळें हुंड्यांचा व्यवहार बराच चाले. ज्याला रकम मिळावयाची त्याच्या नांवापुढें ठराविक शब्द लिहिले तर ज्यानें ती स्वीकारली त्याला कोणाच्याहि नांवांचा शेरा लिहून ती दुसऱ्यास विकतां येई, आणि तो विकत घेणारा पुन्हा शेरा लिहून ती हुंडी इतरांनां विकूं शके. अशा रीतीनें एकामागून एक वाटेल तितके शेरे मारतां येत.

देशांतील व्यापार वाढूं लागल्यावर हुंड्यांची देवाण घेवाण विशेष वाढत चालली आणि पुढें बँकांनीं हें काम अंगावर घेतल्यावर नोटा चलनांत आल्या. त्यापूर्वी सन १३२७ त दिल्लीच्या सुलतानानें तांब्याची नोट काढली होती. पण पुढें ती लवकरच त्यानें बंद केली. सोन्याचें प्रतीक म्हणून नोट छापली असल्यानें ती परत केल्यास ठराविक वजनाचें सोनें देण्याची कायदेशीर जबाबदारी त्या बँकेवर असे. या पद्धतीस सुवर्ण परिमाण म्हणतात. यांत चलन सोन्याशीं निगडीत असल्यानें वस्तूंच्या किंमती समतोल राहतात. यानंतर नोटा काढण्याची जबाबदारी फक्त सरकारी मध्यवर्ती बँकेनेंच पत्करली.

ज्ञात इतिहासारंभींचीं नाणीं

भारतीय युद्धानंतर युधिष्ठिरापासून शिशुनाग, नंद, शुंग, कण्व, गुप्त वगैरे राजवंशांनीं मगधाचें राज्य केलें. यापुढील इतिहास म्हणजे भारताचाच इतिहास. मगधाची राजधानी प्रथम राजगृह व नंतर पाटलीपुत्र होती. कण्व राजांकडून मगध राज्य मौर्यवंशीय चंद्रगुप्त यानें खि. पू. ३२१ त घेतलें. याच्या मागून त्याचा मुलगा समुद्रगुप्त गादीवर आला. यानें अश्वमेध यज्ञ करून उत्तर व दक्षिण भागांतील अनेक राजांना जिंकून मांडलिक केलें. यावेळीं सबंध कोंकण याच्या कक्षेंत आलें होतें. याच्या सुवर्ण नाण्यावर एका बाजूनें त्याचें बैठें चित्र व दुसऱ्या बाजूस अक्षरें होतीं. आकार पूर्वीच्या रुपयाएवढा होता. याच्या मागें दुसरा चंद्रगुप्त राज्यावर आला. याच्या नाण्यांवर उजव्या हातांत धनुष्य व डाव्या हातांत बाण घेतलेलें त्याचें चित्र असून दुसऱ्या बाजूनें अक्षरें होतीं.

ग्रीकांची सत्ता काबुल, पंजाबकडे खि. पू. १२० पर्यंत होती. त्यामुळें भारतांत त्यांचीं नाणीं आलीं. त्या नाण्यांवर एका बाजूस ग्रीक लिपींत राजाचें नांव व किताब आणि दुसऱ्या बाजूवर खरोष्ठी (गांधार) लिपींत मजकूर असे. उभय बाजूंनीं दोन पुरुषाकृति असलेलें यांचें 'पुतळी' नावांचें एक सुवर्ण नाणें बरेंच प्रचारांत होतें.

ग्रीकांनंतर त्या भागांत शकांचा प्रवेश झाला. शकांचीं नाणीं ग्रीक नाण्यासारखींच; पण तितकीं सुंदर नव्हतीं. शक राजा रुद्रदामन याची राजधानी उज्जयनीस होती. या रुद्रदामनच्या नाण्यांवर एका बाजूनें राजाचा मुखवटा व दुसऱ्या बाजूनें परशु असून सभोंवतीं अक्षरें होतीं. दुसऱ्या कांहीं नाण्यांवर मुखवटा व दुसऱ्या बाजूनें चंद्र, सूर्य व अक्षरें होतीं.

पराक्रमी विक्रम राजानें सनपूर्व ५७ सालीं शकांचा पराभव करून त्यांना भारतांतून घालवून दिलें. याचवेळीं त्यानें विक्रम संवत् सुरू केला. याबद्दलच्या उज्जयनींतील महोत्सवप्रसंगीं विक्रम राजाचीं जीं नाणीं निघालीं तीं देवनागरी लिपींतील आहेत.

कुशान राजांच्या नाण्यांवरहि ग्रीक लिपीचाच मजकूर होता.

पश्चिमीय क्षत्रपांच्या नाण्यांवर एका बाजूस राजाचें व त्याच्या बापाचें नांव असून दुसऱ्या बाजूस राजमुखवटा व संवतचे आंकडे होते. मजकूर देवनागरी लिपींतील आहे.

कनिष्काचें नाणें एका बाजूस भाला हातांत घेतलेला दाढीवाला सैनिक व सभोंवतीं अक्षरें असें होतें.

भारताचा यमुना व चंबळपर्यंतचा भाग यांकडे होता आणि त्यानें आपल्या या राज्याची सीमा अफगणिस्थानापलीकडे नेली होती.

कनिष्कानंतर 'हविष्क' आला. याच्या नाण्यावर ग्रीक, इराणी व भारतीय देवतांचीं चित्रें सांपडतात. याच्यानंतर वासुदेव नांवाचा राजा गादीवर आला या राजापासून पुढील सर्व राजे पूर्णपणें हिंदु झाले. याच्या नाण्यांवर शिवाचीं व नंदीचीं चित्रें सांपडतात.

सातवाहनाचीं नाणीं

सातवाहन किंवा शालिवाहन हा ज्ञात इतिहासांतील गोमंकाचा पहिला सम्राट होय. सातवाहनांचें मूलस्थान सातारा हें असून मूळ पुरुष शिमूख (ख्रि. पू. २२०). यानें प्रतिष्ठान किंवा पैठण नगरी आपली राजधानी केली होती. या घराण्यांत ३० राजे होऊन गेले व त्यांनीं ४५६ वर्षें राज्य केलें. या वंशांतील तिसरा राजा शातकर्णी यानें अश्वमेध यज्ञ केला. पंधरावा राजा पुलुमायी यानें शकांची तिसरी लाट पिटाळून लावली. सतरावा राजा हाल यानें आपल्या राज्यारोहणापासून शालिवाहन शक सुरू केला. तोच आज चालू आहे.

शालिवाहन हा सम्राटपद गाजविणारा महाराष्ट्राचा पहिला राजवंश होय. परचक्रापासून स्वदेशाचें – संपूर्ण भारताचें रक्षण करण्याची महाराष्ट्राची परंपरा यानेंच प्रथम प्रस्थापित केली. महाराष्ट्र भाषेंत ग्रंथरचना करण्याचा पाया यानेंच घालून विद्वानांस प्रोत्साहन दिलें. भारतीय राष्ट्रध्वजावरील चक्रचिन्ह अशोकाचें असलें तरी तें शालिवाहनांचें अर्थात् वैदिक संस्कृतीचेंहि म्हणतां येईल. कारण शालिवाहनांच्या नाण्यांवर असेंच चक्रचिन्ह आहे. असें चक्रचिन्ह असलेलीं कांहीं नाणीं ब्रह्मपुरीच्या उत्खननांत सांपडलीं आहेत.

शालिवाहनांच्या उपलब्ध चौवीस शिलालेखांतून त्यांची बरीच माहिती मिळते. त्यांच्या ४६ उपलब्ध नाण्यांत ३२ पश्चिम भारतांत, ४ आंध्रमध्यें व इतर ठिकाणीं १० सांपडलेलीं आहेत. यांच्या कांहीं नाण्यांवर सिंहाचें चित्र आहे. अकोला जिल्ह्यांतील तेऱ्हाळा गांवांत स. १९४० च्या सुमारास यांचीं ५०० नाणीं सांपडलीं. आंध्र गौतमीपुत्राचें एक नाणें भारत-इतिहास संशोधक मंडळांत आहे. तें शिशाचें असून वजन १.५८ व आकार १.५ आहे. त्यावर सव्यमुख हत्तीची अस्पष्ट आकृति आहे. पाठीवर उज्जयनीचें अस्पष्ट चिन्ह आहे.

कोल्हापूर येथें बौद्धस्तुपाच्या पडक्या इमारतींत कांहीं वर्षांपूर्वी तांब्याच्या व शिशाच्या नाण्यांचा संग्रह सांपडला होता. त्या नाण्यांवरील अक्षरें खालील प्रमाणें असून तीं शालिवाहनकालीन असल्याचें प्रसिद्ध झालें आहे.

रण्णो वासिठी पुतस विळिवाय कुरस. रण्णो गोतमी पुतस विळिवाय कुरस.

रण्णो मढरी पुतस सेवल कुरस.

वासिष्ठीपुत्र पुलुमायी, गौतमीपुत्र यज्ञश्री शातकर्णी, मढरीपुत्र शकसेन यांच्या प्रतिनिधींनीं आपल्या अधिकारांत पाडलेलीं हीं नाणीं असावींत. म्हणून त्यांवर त्यांचींहि नांवें आहेत.

सदरील नाण्यांवरील अक्षरें कांठापासून बरींच वर आहेत.

उत्तरकालीन सातवाहनवंशीय पुलुमायी याचा काल सन १३० ते १५४.

गौतमीपुत्र यज्ञश्री शातकर्णी याचा काल स. १५४ ते १७२.

मढरीपुत्र शकसेन राजा याचा काल स. १७२ ते १८०

चालुक्यांचें चलन

ज्ञात इतिहासांतील सातवाहनानंतरचे गोमंतकाचे अधिसत्ताधीश चालुक्य होय. अर्थात् गोमंतकाचे हे दुसरे सम्राट.

विजापूराजवळच्या बदामी गांवास पूर्वी वातापी अशी संज्ञा होती. याच वातापी नगरांत चालुक्यवंशीय पुलकेशी यानें स. ५५० सालीं आपल्या राज्याची स्थापना केली. हा पराक्रमी होता. यानें अश्वमेध यज्ञ करून आपलें सम्राटपद जाहीर केलें. याचा मुलगा कीर्तिवर्मन किंवा कीर्तिवर्मा हा स. ५६६ च्या सुमारास गादीवर आला. या वेळीं कोंकण भागावर मौर्य राजांचें राज्य होतें. कीर्तिवर्म्यानें या मौर्यांवर स्वारी करून त्यांना आपली अधिसत्ता मान्य करावयास भाग पाडलें.

कोंकणचे मौर्य हे सम्राट मौर्यांच्या घराण्यापैकींच असावे असें इतिहास संशोधकांचें मत आहे. मगध येथील मौर्यांची एक शाखा कोंकण प्रांतांत राज्य करीत होती असा उल्लेख डॉ. बालकृष्ण यांनीं आपल्या प्राचीन भारताच्या इतिहासांत केला आहे. या मौर्यांचें नाणें देखील सम्राट मौर्यांच्या नाण्यासारखेंच असून त्याच्या एका बाजूनें धनुर्धारी चित्र व दुसऱ्या बाजूनें अक्षरें होतीं. यांचें कार्षापण नांवांचेंहि नाणें होतें.

स. ५९७ त कीर्तिवर्मनच्या मागें त्याचा कनिष्ठबंधु मंगलीश हा गादीवर आला. त्यानें रेवतीद्वीप (रेडी) काबीज केलें. याच्या मागून पुतण्या दुसरा पुलकेशी यानें स. ६१० त राज्यसूत्र हातीं घेतलीं. हा पराक्रमी असून त्यानें कांची, केरळ, पल्लव, पांड्य वगैरे राजांना जिंकून अश्वमेध यज्ञहि केला.

स. ६५४ सालीं विक्रमादित्य व त्याच्या मागें त्याचा मुलगा विनयादित्य स. ६७८ त राज्यावर आला. पुढें स. ६९६ सालीं त्याचा मुलगा विजयादित्य व नंतर स. ७३३ त त्याचा पुत्र दुसरा विक्रमादित्य यानें राज्यसूत्रें हातीं घेतलीं. याच्या कारकिर्दीनंतर त्याचा मुलगा दुसरा कीर्तिवर्मा सन ७४३ सालीं गादीवर आला. हाच चालुक्य घराण्यांतील शेवटचा सम्राट होय.

चालुक्य राजे सनातनधर्मी असूनहि इतर धर्मांशीं सहिष्णुतेनें वागत असत. यांनीं शिल्पकलेस उत्तेजन दिलें. अजिंठा, येलिफंटा येथील लेणीं व चित्रकला यांच्याच कालची आहे. आपल्या पश्चिम किनाऱ्याच्या रक्षणासाठीं यांनीं मोठें आरमार तयार केलें होतें. कोंकण किनाऱ्याच्या इतर भागाप्रमाणेंच गोव्याच्या सागर किनाऱ्यावरहि यांचें आरमार सज्ज होतें.

चालुक्यांच्या ध्वजावर वराहाचें चिन्ह होतें.

चालुक्यांची नाणीं पाडण्याची टांकसाळ बदामी येथें राजधानींतच होती. आजपर्यंत उपलब्ध झालेल्या दक्षिणी नाण्यांत राजाचें नांव असलेलें जुन्यांत जुनें नाणें म्हणजे

चालुक्यांचेंच.

सोन्याचीं नाणीं दक्षिणेंत प्रथम चालुक्यांनीं व नंतर कदंब राजांनीं पाडलीं.

चालुक्यांनीं पहिल्या प्रथम जीं नाणीं पाडलीं त्यांवर एका बाजूस पद्म व दुसऱ्या बाजूस राजाचें नांव होतें. नंतरच्या नाण्यांवर वराह होता. सुवर्णनाण्यावरील या वराहामुळेंच त्या नाण्यालाच पुढें वराह किंवा 'वरा' असें नांव प्रचारांत आलें.

चालुक्यांच्या टांकशाळेंत यानंतर सुधारलेलीं जीं नाणीं पाडण्यांत आलीं त्या नाण्यांच्या एका बाजूस मध्यभागीं वराह चित्र व सभोंवतीं राजाचें नांव व बिरुदें होतीं. पहिल्यानदां पाडलेल्या या नाण्याचें वजन ५८ ग्रेन व दुसऱ्या खेपेस पाडलेल्या नाण्यांचें वजन ६६ ग्रेन होतें. यांचा आकार वाटोळा होता. चालुक्यांनीं गद्याण नांवाचें जें नाणें पाडलें त्याचें वजन प्रथम ६५ व नंतर ६६ ग्रेन होतें. कासें व शिसें याचींहि चालुक्य नाणीं होतीं. (मद्रास जॅा. लि. सो.).

—१०—

राष्ट्रकूटांचीं नाणीं

बदामीच्या चालुक्यांच्या राजवटीनंतर ज्यांचें साम्राज्य महाराष्ट्रांत कोंकण किनाऱ्यापर्यंत व दक्षिण भागांतहि विस्तारलें गेलें तें राष्ट्रकूट घराणें इतिहासांत सुविख्यात आहे. राष्ट्रकूटांचे कोरीत लेख इ. स. च्या आठव्या शतकापासूनचे सांपडले आहेत. उपलब्ध असलेल्या त्यांच्या तीन ताम्रपटांवरूनहि बरीच माहिती मिळते.

पहिला ताम्रपट डॉ. भाऊ दाजी यांच्या संग्रहांतील असून तो रॅायल एशियाटिक सोसायटीच्या मुंबई शाखेच्या नियतकालिकांत पु. ८८ पृ. १६ वर प्रसिद्ध झाला आहे. दुसरा कोल्हापुराकडे सांपडलेला प्रो. कुंदनगार यांनीं म्हैसूर पुराण वस्तु संशोधन खात्याकडे पाठविला व तो त्या खात्याच्या १९२९ च्या वार्षिक रिपोर्टांत पृ. १९७ इ. वर छापला. आणि तिसरा गोमंतकांत शिरोडें येथें सांपडलेला इ. स. कृष्णमाचार्ल् यांनीं एपिग्राफिया इंडिका (पु. २४ पृ. १४३ इ.) मध्यें प्रसिद्ध केला आहे.

राष्ट्रकूटांचा मूळ पुरुष मानांक यानें इ. स. च्या चौथ्या शतकांत मानपूर नगर स्थापन करून तेथें आपली राजधानी केली. हें मानपूर सातारा जिल्ह्यांतील माणगंगेजवळचें माणगांव असावें असा म. म. मिराशी यांचा कयास आहे.

सातव्या शतकारंभीं त्यांची एक शाखा वऱ्हाडांत गेली. तेथील त्यांची राजधानी अचलपूर येथें होती. पुढें गोविंदराज तिसरा याचा बंधु इंद्रराज यानें गुजराथमध्यें दुसरी शाखा स्थापिली.

राष्ट्रकूट घराण्यांतील दंतिदुर्ग नांवाचा, चालुक्य दुसऱ्या कीर्तिवर्माचा एक प्रांताधिकारी होता. त्यानें चालुक्याचें साम्राज्य मोडकळीस आलेलें पाहून साम्राज्यांतून निघून आपलें स्वतंत्र राज्य स्थापन केलें.

दंतिदुर्गास मुलगा नसल्यानें त्याच्या मागून त्याचा चुलता कृष्णराज हा स. ७५८ त गादीवर आला. त्यानें स. ७६० च्या सुमारास कीर्तिवर्म्याचा पूर्ण पराभव करून सर्व चालुक्य साम्राज्य आपल्या राज्यास जोडलें.

या कृष्णराजाचे मुलगे दोन; गोविंद व ध्रुव, त्यांपैकीं बापानंतर दुसरा गोविंदराज म्हणून गोविंद गादीवर आला. तथापि ध्रुवानें त्याला पदच्युत करून स. ७८० त तो राजा झाला.

पुढें त्याचा मुलगा तिसरा गोविंदराज बापाच्या मागें अधिकारावर आला. हा पराक्रमी होता. याच्या मागें राष्ट्रकूट साम्राज्यास उतरती कळा लागली. यानंतर अमोघवर्ष सिंहासनावर आला आणि त्याच्या पश्चात् त्याचा मुलगा दुसरा कृष्णराज राजा झाला. पुढें स. ९१४ ते ९७३ पर्यंत तिसरा इंद्रराज, दुसरा अमोघवर्ष, चौथा गोविंदराज, तिसरा अमोघवर्ष, तिसरा कृष्णराज, नित्यवर्ष, दुसरा कर्कराज असे राजे होऊन गेले.

चालुक्यांच्या तैलप नांवाच्या सामंतानें कर्कराजाविरुद्ध बंड करून त्याचें साम्राज्य धुळीस मिळविलें.

मालखेड येथें राजभवनाच्या डाव्या बाजूस राष्ट्रकूटांची टांकसाळ होती. येथें तीन प्रकारचीं नाणीं पाडीत. सोन्याचीं, चांदीचीं आणि तांब्याचीं. राज्याच्या नाण्यांशिवाय इतरांनांहि ज्या कुणाला नाणीं पाडून घेणें असतील त्यानें संबंधीत मंत्र्याच्या परवानगीनें आवश्यक तेवढें सोनें, चांदी, किंवा तांबें टांकसाळींत देऊन त्यासाठीं लागणाऱ्या मजुरीचाहि भरणा करावा लागे, म्हणजे तेवढ्या धातूंचीं नाणीं पाडून मिळत.

गद्याण, द्राम, धरण अशीं यांचीं नाणीं होतीं. गद्याणचें वजन अंदाजें ३५ ग्रेन असे. यांच्या जुन्या नाण्यावर गरुड चित्र असे.

— ११ —

शिलाहार नाणीं

राष्ट्रकूट सम्राट कृष्णराज पहिला यानें सन ७६५ च्या सुमारास दक्षिण कोंकण सणफुल्ल शिलाहार याकडे व्यवस्थेसाठीं दिलें. ते त्या भागाची व्यवस्था अधिराजांचा योग्य मान राखून करीत. या शिलाहारांची राजधानी वलीपट्टण येथें होती. सणफुल्लाचा मुलगा धम्मीयर यानें वलिपट्टणचा किल्ला बांधला. वलीपट्टण गोव्याच्या उत्तरेस असून तेथें बंदरहि होतें असा उल्लेख मिळतो त्या वरून व इतरहि कित्येक पुराव्यांवरून तें वालावली गांव असावें असें इ. स. चें मत आहे.

सन १००८ च्या खारेपाटण ताम्रपटांत दक्षिण कोंकणांतील शिलाहारांची जी वंशावळ मिळते ती अशी :- सणफुल्ल (स. ७६५-७९५), धम्मीयर, ऐयपराज, अवसर, आदित्यवर्मा, दुसरा अवसर, इंद्रराज, भीम, तिसरा अवसर, रट्टराज व ज्ञात वर्ष.

शिलाहार घराण्याच्या तीन शाखा असून मुख्य क-हाड-कोल्हापूरची, दुसरी दक्षिण कोंकणची व तिसरी उत्तर कोंकणची पुरी (जंजिऱ्याजवळची दंडाराजपुरी) येथें होती. या तिन्हींचें मूळ तगर (जुन्नर) शहर होतें. तिन्हीं राजांच्या बिरुदावलींत 'तगरपूर-वराधीश्वर' असा शब्द आहे.

उत्तर कोंकण शिलाहारांची सत्ता स. ८१० ते १२६६ पर्यंत सुमारें साडेचारशें वर्षें अव्याहत चालली.

कपर्दी, पुलशक्ति, लघुकपर्दी, वपुवन्न, झंज, गोग्गी, वज्रदेव, अपराजीत, दुसरा वज्रदेव, अरिकेसरी, चित्तराज, नागार्जून, मुम्मुणी, अनंतदेव, अपरादित्य, हरिपालदेव, मल्लिकार्जून, दुसरा अपरादित्य, केशीदेव, व सोमेश्वर असे वीस राजे उत्तर कोंकणच्या कुलांत होऊन गेले.

दक्षिण कोंकणचे शिलाहार अखेरपर्यंत राष्ट्रकूटांशीं राजनिष्ठ राहिले. शिलाहारांची कुलस्वामिनी कोल्हापूरची महालक्ष्मी ही असून महालक्ष्मीचें देऊळ व पूजा अर्चा वगैरे-साठीं शिलाहार राजांनीं बराच खर्च केला होता. इनामेंहि लावून दिलीं होतीं.

सन ७६५ पासून अडीचशें वर्षें दक्षिण कोंकणच्या शिलाहारांचें राज चालू होतें. खारे-पाठणच्या ताम्रपटांत दक्षिण कोंकणचे शिलाहार 'सिंहलक्ष्माभृतां वर:' म्हणजे मूळ सिंहलद्विपाचे राजे होते असें वर्णन आहे. तथापि त्यांचें मूळचें वसतीस्थान सिंहल-द्विपासमान गोवें हेंच होतें असें डॉ. आळते-करांचें मत आहे.

कोल्हापूरच्या शिलाहारांची वंशावळ:—

जतिग, नयीवर्मा, चंद्र, जतिरा दुसरा, गोंक, मारसिंह, यूवल, बल्लाळ, भोज, गंडरादित्य, विजयादित्य व दुसरा भोज.

शिलाहारांच्या तिन्हीं शाखांच्या राजांचीं नाणीं कोल्हापूरच्या शिलाहारांच्या राजनगरीं-तील म्हणजे पन्हाळयाच्या टांकशाळेंत पाडण्यांत येत असत. धरण, गद्याण, पद्मटक, रामटक अशीं यांचीं नाणीं होतीं. यांच्या नाण्यांच्या एका बाजूस राजाचा अस्पष्ट मुखवटा व दुसऱ्या बाजूस राजाचें नांव लिहिलेलें असे.

ठाण्यांतील एका मोरीजवळ एका भांड्यांत घालून पुरलेलीं शिलाहारांचीं ४१० नाणीं १९२४ सालीं सांपडलीं होतीं. प्रत्येक नाण्यांचे वजन सुमारें पांच आणे भार होतें. धरण व गद्याण अशीं त्यांचीं सुवर्णनाणींहि मिळालीं होतीं.

मध्यहिंदुस्थानांत सहाव्या शतकापासून ससानियन राजांच्या नाण्यासारखीं जीं नाणीं प्रचारांत होतीं, त्याचप्रमाणें शिलाहारांचीं कांहीं नाणीं १९२० सालीं पन्हाळ्याकडील एका इमारतीचा पाया खोदतांना मिळालीं होतीं.

हिंदु, बौद्ध, जैन असे तिन्हीं धर्म शिलाहा-रांच्या राज्यांत नांदत होते. कोल्हापूरच्या आसपास जैनांचें प्राबल्य होतें. कण्हेरीच्या गुहांत बौद्धांचे मठ होते आणि हिंदु धर्माच्या लोकांची संख्या तर अधिक पण तिन्हीं वर्गाचे लोक गुण्या गोविंदानें नांदत, व सगळ्यांकडे राजांची दृष्टी सारखी असे.

कदंबांची नाणीं

उत्तर कर्नाटकांतील वैजयंती किंवा वनवासी हेंच कदंबांचें मूलस्थान होय. तेथें पांचव्या शतकाच्या मध्यकालांत मयूरशर्मा नांवाचा कदंबवंशीय राजा राज्य चालवीत होता. हळशीकर कदंब व हनगलकर कदंब हे याच वंशांतील होत. गोमंतकांतील चंद्रपूरचे कदंब हे हळशीकर शाखेंतील असून हें हळशी गांव बेळगांव जिल्ह्यांतील खानापूर तालुक्यांत आहे. त्यावेळीं बारा हजार गांवांचें हळशी राज्य कदंबांच्या ताब्यांत होतें. शिलाहार वंशांतील शेवटचा राजा रट्टराज याला जिंकून अकराव्या शतकाच्या पूर्वार्धांत त्याचें दक्षिण कोंकणचें राज्य कदंबांनी आपल्या राज्यास जोडलें.

वास्तविक कदंब व शिलाहार दोघेहि चालुक्य सम्राटांचे मांडलीक; तथापि तत्कालीन मांडलिकांना आधुनिक मांडलिकांसारखीं बंधनें नसून बरेंच स्वातंत्र्य होतें. त्यामुळें कदंबानें शिलाहारांचें राज्य बळकावलें आणि चालुक्यांचीहि तक्रार न आल्यानें तें साहजिक कदंबाच्या पदरीं पडलें.

कदंबराजा दुसरा षष्ठदेव यानें प्रथम दक्षिण कोंकण घेऊन नंतर उत्तर शिलाहारांकडून उत्तर कोंकणहि काबीज केलें. यावेळीं अरीकेसरी, व त्याचा पुतण्या छित्तराज मरण पावून त्याचा बंधु मुम्मुणी राज्यावर होता.

मुम्मुणी षष्ठदेवास शरण आला व त्यानें आपली सुंदर कन्या त्याला देऊन त्याच्याशीं नातें जोडलें त्यामुळें षष्ठदेवानें उत्तर कोंकणचा प्रदेश मुम्मुणीस परत दिला. षष्ठदेव हा चालुक्य सम्राट जयसिंह दुसरा याचा मांडलीक होता. तो स. १०५० च्या सुमारास मरण पावल्यावर त्याचा पुत्र जयकेशी पहिला राज्यावर आला. याची कारकीर्द स. १०८० पर्यंत चालली. यानेंच चंद्रपूर (चांदर) येथून आपली राजधानी गोपकपट्टण (थोरलें गोवें) येथें आणली. तुळजापूरची श्रीभवानी देवी ही कदंबांची कुलस्वामिनी; तथापि चंद्रपूरला असतांना श्रीचंद्रेश्वराकडे आणि गोपकपट्टणला गेल्यानंतर श्रीसप्तकोटेश्वर यांकडे त्यांची कुलस्वामिनीइतकीच भक्ति होती.

सन १०३८ चा सावैवेरें ताम्रपट, स. १०५९ चा पणजी ताम्रपट, स. ११०७ चा त्रिभुवनमल्लकालीन ताम्रपट, कदंबकूल, 'कोंकणच्या इतिहासाचीं साधनें' इ. वरून कदंबांची बरीच माहिती मिळते.

कदंब जयकेशीच्या अमदानींत गोपकपट्टण फार भरभराटीस आलें. त्याबद्दलचें ठीक वर्णन देगवें येथील लेखांत दिलें आहे.

जयकेशी याच्या मागें त्याचा पुत्र गुहल्लदेव तिसरा हा गादीवर आला. त्याच्यामागून त्याचा भाऊ विजयादित्य याकडे राज्यसूत्रें आलीं. याचा मुलगा दुसरा जयकेशी हा स. ११०४ सालीं राज्यावर आला. याच्या राजवटींत गोव्याच्या कदंबांची सत्ता कळसास पोंचली. (डॉ. पां. स. पिसुर्लेकर).

यानंतर तिसरा जयकेशी राज्यावर आला. यानें चालुक्यांचें मांडलिकत्व झुगारून स्वतःला 'कोंकण चक्रवर्ती' अशी पदवी घेतली. तथापि चालुक्य सम्राट सहावा विक्रमादित्य यानें त्याच्यावर हल्ला करून त्याला पदच्युत केल्यावर तो शरण येऊन पुनः त्याचा मांडलीक बनला.

कदंबांच्या राजवटींत गोमंतकीयांच्या बुद्धीस व शौर्यास चांगला वाव मिळाला.

कदंबकालांत गोपकपूर किंवा गोपकपट्टण हें अत्यंत महत्वाचें बंदर झालें. सौराष्ट्र, गुर्जर, वैमुल्य, ब्रह्मदेश, चीन, मलाया, अरबस्थान, आफ्रिका वगैरे अनेक देशांकडे या बंदरांतून गलबतांच्या सहाय्यानें मोठा व्यापार चाले. पहिल्या जयकेशीच्या कालांत कदंबांचें आरमारहि प्रबल होतें. पश्चिम किनाऱ्यावरील आरमाराचा पहिला निर्माता हाच होय.

गोव्याच्या कदंबांची वंशावळ अशी आहे:– कंटकाचार्य, गुहलदेव पहिला, षष्ठदेव पहिला, चतुर्भुज, गुहलदेव दुसरा, षष्ठदेव दुसरा, जयकेशी पहिला, गुहलदेव तिसरा, विजयादित्य पहिला, जयकेशी दुसरा, शिवचित्त, विष्णुचित्त ऊर्फ विजयादित्य दुसरा, जयकेशी तिसरा, त्रिभुवनमल्ल, षष्ठदेव तिसरा, कामदेव, कामदेवाचा मुलगा, कामदेवाचा नातू.

कदंबांचीं नाणीं सोनें, चांदी व तांबें अशा तीन प्रकारच्या धातूंचीं असून तीं ओतीव होतीं. चंद्रपूरच्या टांकशाळेंतील आरंभींचीं नाणीं गोपकपट्टणच्या टांकशाळेंतील नाण्यांपेक्षां भिन्न प्रकारचीं होतीं.

गोपकपट्टणच्या टांकशाळेंत जीं ओतीव नाणीं तयार करीत त्या नाण्यांसाठीं मातीचे सांचे वापरीत. धातूचा रस गोठून थंड झाल्यावर मग सांचा मोडीत. आकृति उमटविण्यासाठीं गरम नाणें खालीं व वर अशा दोन ठशांत ठेवून मग त्याच्यावर हातोडीचा फटका मारीत. हे ठसे कांशाचे असत.

चिनी नाणकशास्त्रज्ञ लाऊ म्हणतो कीं, प्राचीन भारतीयांना ओतीव नाण्याची माहिती नव्हती; पण ही गोष्ट अगदीं खोटी आहे. भारतीय नाण्यांचा अभ्यासू इंग्रज संशोधक ब्राऊन म्हणतो कीं, इ. स. पूर्व पांचव्या शतकापासून भारतांत ओतीव नाणीं तयार होत असत.

कदंबांच्या जुन्या नाण्यांवर एका बाजूनें राजाचें नांव व बिरुदावली असून दुसऱ्या बाजूनें कदंबांचें सिंहाचें लांच्छन असे. सोन्याच्या नाण्यांपैकीं एका नाण्याचें वजन साडेतीन तोळे होतें. गद्यानक, द्राम्म, तैराव, निष्क अशा निरनिराळ्या नांवांचीं कदंबांचीं अनेक नाणीं होतीं. द्राम्म व पण हीं यांचीं सोन्याचीं छोटीं नाणीं गोव्यांत कित्येक ठिकाणीं सांपडलीं आहेत. यांच्या पद्मटेक किंवा पद्मटंक या नाण्याच्या एका बाजूवर मध्यें मोठें कमळ व सभोंवतीं चार लहान कमळें असून दुसऱ्या बाजूवर सरस्वती, ब्रह्मदेव, मल्लिकार्जुन, नंदी अशीं चित्रें होतीं.

इ. स. १२११ सालीं प्रमोद संवत्सरांत जयकेशी तिसरा यानें पद्मटंक नांवाचें जें सुवर्णनाणें पाडलें त्या नाण्यावर 'श्रीसप्त कोटीशलब्धवरवीर जयकेशीदेव, असे शब्द नागरी लिपींत एका बाजूनें आहेत.

होयसळांचें चलन

कर्नाटकांत म्हैसूरजवळ अकराव्या शतकापासून 'होयसळ' नांवांचें राजघराणें होतें. चालुक्य सम्राटाचे हे मांडलीक. उत्तरेस तुंगभद्रा, कृष्णा व दक्षिणेस कावेरी यांच्यामध्यें होयसळांचें राज्य असून मुख्य राजधानी द्वारसमुद्र येथें होती. विष्णुवर्धन व दुसरा बल्लाळ हे दोन राजे या घराण्यांत विशेष प्रसिद्ध होऊन गेले.

होयसळ घराण्याचा मूळ पुरुष शाल या नांवांचा होता. विनयादित्य हा त्या घराण्यांतील पहिला प्रसिद्ध पुरुष होय. त्यानंतर नीप्रकम हा कल्याणीच्या चालुक्यांचा मांडलीक होता. चालुक्य व चोल यांच्या लढाईंत नीप्रकम व दुसरा विनयादित्य हे विशेषत्वानें पुढें आले. पहिल्या बल्लाळानंतर त्याचा भाऊ भीतिदेव यानें सन १११७ मध्यें चोल राजांचें गंगावदी हें ठिकाण जिंकलें व तामीळ प्रांतांत चढाई करून रामेश्वर गांठलें आणि अशा रीतीनें सन ११३७ च्या सुमारास सर्व म्हैसूर प्रांतावर त्याची सत्ता सुरू झाली.

त्यानंतर नरसिंहाच्या कारकिर्दीत होयसळांची सत्ता कमी झाली.

दुसऱ्या बल्लाळानें देवगिरीचा राजा भिल्लम याचा पराभव केला त्यामुळें स. ११९१ त त्याची सत्ता कृष्णा नदीपर्यंत वाढली. यानेंच चालुक्यांची अधिसत्ता झुगारून देऊन तो स्वतंत्र झाला.

होयसळांनीं सन ११९३ सालीं गोमंतकांतील कदंबांवर स्वारी करून त्यांना आपली अधिसत्ता मान्य करावयास भाग पाडलें. या सालापासून सम्राट या नात्यानें ते कदंबांकडून ठराविक वार्षिक खंडणी घेऊं लागले व अशा रीतीनें गोव्याचे अधिसत्ताधीश झाले.

होयसळ विष्णुवर्धन यानेंच इ. स. च्या ४ थ्या शतकांत पंढरपूर येथील श्रीपांडुरंगाचें देऊळ बांधलें इ. सं. पंचमुखीहि श्रीविठ्ठमूर्तीचें शिल्प इ. स. च्या ४ थ्या शतकांतील आहे असें म्हणतात. चन्नकेशव मंदिर, पार्श्वनाथ मंदिर इ. होयसळांचें आहे.

होयसळांची टांकसाळ द्वारसमुद्र येथें असून त्या टांकसाळीवर अप्पय्या नांवांचा एक कुशल अधिकारी होता. सोनें, रुपें व तांबे अशीं तिन्हीं धातूंचीं होयसळांचीं नाणीं असून तीं कानडी लिपींत आहेत. यांचीं कित्येक नाणीं म्हैसूर भागांत मिळालीं असून कांहीं मद्रास येथील इतिहास संग्रह खात्यांतहि होतीं. यांच्या जुन्या नाण्यावर एका बाजूनें त्यांचें राष्ट्रचिन्ह हनुमानचित्र असे. वाटोळ्या सोन्याच्या गद्याण नाण्याचें वजन ६१ ग्रेन व नवीन गद्याणचें ६३ ग्रेन होतें. पण व ञिन्नाम अशींहि यांचीं दोन छोटीं नाणीं होतीं.

यादवांचीं नाणीं

यादव राजघराण्याची विश्वसनीय माहिती देणारा त्यांचा पहिला ताम्रपट म्हणजे संगमेश्वरचा ताम्रपट होय. तो शके ९२२ म्हणजे सन १००० चा असून दुसऱ्या भिल्लमकालीन आहे. त्यांतील माहितीवरून त्यांचा मूळ पुरुष सेऊणचंद्र हा असून त्याचा मुलगा दृढप्रहार व त्याचा पुत्र भिल्लम हा होता. या पहिल्या भिल्लमाचा मुलगा श्रीराज हाच सदर ताम्रपट दिलेल्या दुसऱ्या भिल्लमाचा बाप होय. चालुक्यांचा मांडलीक या नात्यानें हा श्रीनगर येथें राज्य करीत होता. याच कुळांतील पुढील राजांपैकीं पांचवा भिल्लम यानें शके ११११ सालीं चालुक्य चौथा सोमेश्वर याचा पराभव करून देवगिरी येथें आपल्या राज्याची स्थापना केली व तेव्हांपासून तेथील राजांना देवगिरीचे यादव असें म्हणूं लागले.

मल्लगी, भिल्लम, जैत्रपाल, सिंघण, जैत्रपाल, कृष्ण, महादेव, रामदेव, शंकरदेव, हरपाळ अशी देवगिरीच्या यादवांची वंशावळ आहे.

यादवकालांत मराठी भाषेस व विद्वानांस फार प्रोत्साहन मिळालें. यांचे निरनिराळे पन्नासांवर ताम्रपट व शिलालेख उपलब्ध आहेत.

सुप्रसिद्ध राजकारणी व यादवांचे पंतप्रधान पंडित हेमाडपंत यांच्या चतुर्वर्गचिंतामणी या ग्रंथांत देवगिरीच्या यादवांची ठीक माहिती मिळते. यांची राजभाषा मराठी होती.

बल्लाळांच्या उतरत्या कालांत त्यांचें राज्य यादवांनीं घेतलें व तिकडे कदंबहि स्वतंत्र झाले; तथापि पुढें पराक्रमी यादव सम्राट सिंघणदेव यानें आपला हुशार सरदार विचण्णा याला मोठ्या सैन्यानिशीं कदंबांवर पाठवून त्याला आपला मांडलीक बनवलें.

यादवांची टांकशाळा देवगिरीच्या किल्ल्यांत असून तेथें विविध प्रकारचीं ओतीव नाणीं तयार करीत. श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं ज्ञानेश्वरीच्या सातव्या अध्यायांत याच टांकसाळीच्या प्रत्यक्ष पाहाणीनें टांकसाळीच्या व्यवहाराची प्रकृतीच्या उलाढालीशीं तपशीलवार तुलना केली आहे.

गद्यान किंवा गद्याणक, आसू, कशुत्रि, धष्ट, महाजनी, द्राम, इ. नावांचीं यादवांचीं नाणीं होतीं.

गद्यान हें नाणें सोन्याचें असून त्याचें वजन एक तोळा व किंमत १५ रुपये होती. आसू या सुवर्णनाण्याची किंमत १० रुपये होती. कशुत्रि हें सोन्याचें नाणें ७ रुपये किंमतीचें होतें. होन सुवर्णनाण्याचें मूल्य ४ रुपये असून छोटें सुवर्ण नाणें धष्ट याची किंमत २ रुपये होती. सदर नाण्याचें मूल्य रुपयांनीं दाखविलें; तरी त्यावेळीं रुपया नसून त्याच्याच किंमतीचा ' महाजनी ' होता. महाजनी हें एक रुपया किंमतीचें रुप्याचें मुख्य नाणें असून द्राम हें दुसरें कमी किंमतीचें होतें. तसेंच पण हें तांब्याचें नाणें होतें. यांच्या नोटा (दर्शनी हुंड्या) असून त्यांच्यासाठीं उंची पातळ चामडें वापरीत.

सुलतानी नाणीं

तेराव्या शतकापासून दिल्लीचें तख्त गुलाम वंशाकडे होतें. या वंशांतील अखेरचा बादशहा कैकुबाद याच्या मृत्यूनंतर त्याचा सरदार जलालुद्दीन खिलजी यानें तें बळकावलें. पुढें त्यानें अल्लाउद्दीन या आपल्या पुतण्यास जांवई करून कुरा सुभ्यावर त्याला सुभेदार नेमलें. यानें देवगिरीवर अचानक हल्ला केला व यादवांना मांडलिक बनवलें. देवगिरीहून परतल्यावर सासऱ्याचा खून करून अल्लाउद्दीन स. १२९६ सालीं दिल्लीच्या गादीवर आला. त्यानें दक्षिणेंतील कामगिरीवर मलीक काफूरची नेमणूक केली. काफूर स. १३०६ त देवगिरी-वर आला व स्वतंत्र झालेल्या रामदेवरायावर हल्ला करून त्यानें देवगिरीची अगणित संपत्ती लुटून नेली. पुन्हां देवगिरी दिल्लीच्या अधिसत्तेखालीं आली. इकडे कदंबहि स्वतंत्र झालेच होते. मलीक काफूर सन १३०९ सालीं पुन्हां दक्षिणेंत येऊन त्यानें दोन तीन वर्षांतच वरंगळ, द्वारसमुद्र व मदुरा हीं राज्यें जिंकून मांडलीक बनवलीं. यानंतर त्यानें कोंकणावर स्वारी करून गोंव्यांतीलहि बरीच लूट तो घेऊन गेला. स. १३१६ त अल्लाउद्दीनाच्या मृत्यूनंतर गादीच्या झगड्यांत त्यांचा मुलगा मुबारिक यानें मलीक काफूरचा वध करून अडगळ दूर केली व आपण गादीवर आला.

मुबारिकानें दक्षिणेच्या कारभारावर सरसुभेदार म्हणून मलिक ऐनुल्मुल्क मुलतानी या सरदारास पाठविलें. त्याचा दुसरा सरदार मलिक खुश्रू यानें स. १३१८ च्या सुमारास मलबारचा व दक्षिण कोंकणचा किनारा हस्तगत केल्यानें मलिक तब्लघ हा सुभेदार गोंव्याच्या सुभ्यावर आला त्यामुळें कदंब राजा गोपकपट्टण सोडून चंद्रपुरास जाऊन राहिला.

पुढें खुश्रू दिल्लीस जाऊन त्यानें गादीच्या आशेनें मुबारिकाचा खून केला, पण गाजी बेग यानें त्याच्यावर हल्ला करून सरसुभेदार मुलतानी व सुभेदार तब्लघ या सहाय्यकर्त्यांसह त्याचा वध करून ग्यासुद्दीन तघलक या नावानें तो गादीवर आला.

स. १३२१ त मलिक तब्लघ गोंव्यांतून गेल्यावर कदंब कामदेव याच्या मुलानें मुसलमानांना पिटाळून लावून आपलें राज्य स्वतंत्र केलें आणि राजधानी पुन्हां गोपक-पट्टणला आणली.

स. १३२६ त सत्कार मंडपांतच सुलतान ग्यासुद्दीन तघलक चिरडून मेला व महंमद तघलक नांव घेऊन उलुघखान दिल्ली – तख्तावर आला. हा स. १३२७ त गोंव्यावर आला व त्यानें चंद्रपूरची कदंब – राजधानी लुटली नि उध्वस्त करून टाकली. इतक्यांत दिल्लींत बंड झाल्यानें तो तिकडे धांवला.

फेरिस्ता लिहितो कीं — " महंमद तघलख दिल्लीस गेल्यावर त्यानें घेतलेल्या दक्षिणेंतील सारा प्रदेश स्वतंत्र झाला." याच वेळीं कदंबहि स्वतंत्र झाला.

कुतुबुद्दीन ऐबक, शमसुद्दीन अल्तमश, रझिया, नासिरउद्दीन महंमदशहा, बलबन, कैकोबाद असे सुलतान गुलाम घराण्यांत

होऊन गेले. जलालउद्दीन खिलजी, अल्लाउद्दीन खिलजी, मुबारकशहा असे खिलजी घराण्यांत झाले. ग्यासुद्दीन तघलक महंमद, फिरुझशहा, दुसरा महंमद असे तघलक घराण्यांत, खिजरखानापासून आलमशहा पर्यंत चार सुलतान सय्यद घराण्यांत; आणि बहलोल लोदी, शिकंदर, इब्राहीम इ. लोदी घराण्यांत सुलतान होऊन गेले.

सदरील दिल्लीच्या सुलतानांच्या नाण्यांना सुलतानी नाणीं म्हणतात. सुवर्ण, रौप्य व तांबें अशा धातूंचीं यांचीं नाणीं होतीं. यांची प्रथमचीं नाणीं राजपूत नाण्याच्या पद्धतीचीं होतीं. गुलाम वंशांतील अल्तमश यानेंच मुसलमानी ढंगाचीं व फार्सी लिपीचीं नाणीं पाडलीं. नाण्यांवर हिजरी सन घालण्याचीहि पद्धत यानेंच सुरू केली. याच्या नाण्यांवर टांकसाळीचें नांव किंवा खूण असे. महंमद तघलक याला वेडा महंमद म्हणत असले, तरी तो पर्शियन वाङ्मयांत विद्वान् होता. यानें तांब्या पितळेच्या नाण्यांवर चांदी सोन्याच्या नाण्यांची किंमत छापून तीं नाणीं चालू केलीं. तथापि बनावट नाण्यांचा जिकडे तिकडे सुकाळ झाल्यानें लवकरच त्याला तीं बंद करावीं लागलीं. महंमद तघलक यानें टंक नुक्र व टंक सिआह अशीं नाणीं पाडलीं. सोन्याचा टका व रुप्याचा टका पाडला. शिकंदर लोदीचे टंके रुप्याचे व रुपें – तांबें मिश्र असे होते.

पुणें येथील भारत – इतिहास – संशोधक मंडळाच्या नाणक संग्रहांत निरनिराळ्या जातीचीं व आकाराचीं दिल्लीच्या सुलतानांचीं ४५ नाणीं आहेत. त्यांच्या मूळच्या तांब्याच्या नाण्यांचा आकार १.६० होता. नागरी लिपींतील नाण्यांच्या एका बाजूवर अस – सुल्तान उल – अ अजम व दुसऱ्या जलाल – उद – दु निया व अद – दीन अशीं अक्षरें असून दुसऱ्या एका नाण्याच्या पुढच्या बाजूवर अस – सुल्तान – उल अ अजम अला – उद – दु व पाठीवर मुहम्मद शाह श्री सुलतां अलावदीं अशीं आहेत. निया व अद – दीन अशीं अक्षरें पुढच्या व अबू – अल – मुजफ्फर मुहम्मद शाह अस – सुल्तान ७१२ (हि. स.) अशीं मागच्या बाजूवर असलेलीं कांहीं नाणीं आहेत. अस – सुलतान – उल – अ अजम कुत्ब – उद – दु निया व अद – दीन अशीं अक्षरें एका व दुसऱ्या बाजूनें अबू – अल – मुजफ्फर मुबारक शाह अस – सुल्तान ७१६ अशीं फार्सी लिपीचीं कित्येक नाणीं असून त्यांचा आकार १-६० आहे.

हि. स. ७१९ मधील नाण्यांवर अल – इमाम – उल – अ अजम कुत्ब उद – दुनिया पुढच्या बाजूनें व पाठच्या वर्तुळांत खलीफत – उल्लाह मुबारक शाह आणि भोंवतीं अस – सुल्तान उल – वासिक व इल्लाह अमीर – उल – मोमिनीन अशीं फार्सी अक्षरें आहेत. हि. स. ७२१ ते ७२७ पर्यंतच्या नाण्यांवर एका बाजूनें अस सुलतान उल गाझी गियास – उद – दुनिया अद – दीन व दुसऱ्या अबू – अल मुजफ्फर तुग्लक शाह अस सुलतान अशीं फार्सी अक्षरें आहेत.

हि. स. ७३५ च्या नाण्यांत पुढच्या बाजूनें

वर्तुळांत अर – राजी व पाठीवरील वर्तुळांत मुहम्मद बिन अशीं अक्षरें आहेत, तर एका नाण्यावर पुढच्या बाजूनें रहमत – उल्लह अल – करीम व पाठच्या तुग्लक सनत खम्स सलसीन सब्अ मायत अशीं आहेत. अखेरच्या दोहोंपैकीं एकाचा आकार १.४० व दुसऱ्याचा १.६७ आहे.

– १६ –

बहमनी नाणीं

महंमद तघलक दिल्लीकडे जातांना त्यानें अल्लाउद्दीन शहा ऊर्फ हसन गंगू या सरदारास दक्षिणेचा प्रशासक नेमलें. त्याला राजा होण्याची हांव सुटल्यानें त्यानें तघलकाच्या सैन्यावर स्वारी केली त्यामुळें नासिरुद्दीन यानें आपण होऊनच दौलताबाद (देवगिरी) त्याच्या स्वाधीन केली. तत्काल त्यानें अल्लाउद्दीन हसन जाफरखान बहमनशाह असें नांव धारण करून कलबुर्गा येथें आपल्या बहमनी राज्याची स्थापन केली. त्यानें राज्य स्थापना केली, तथापि त्याला महमद तघलकाची बरीच भीति होती. पण लवकरच तघलक मृत्यू पावल्यानें तो निर्धास्त झाला. त्यानें मुधोळ व मिरज घेऊन खारेपाटणाकडे मोर्चा वळविला आणि हां हां म्हणतां गोवा शहरास वेढा घातला. तेथें तो सतत सहा महिनें तळ देऊन राहिला. कदंबानें शिकस्तीचा प्रतिकार केला; पण तिसवाडींत कदंबांच्या लोकांचा कोंडमारा होऊन त्याला आपली सत्ता टिकविणें कठिण झालें. यावेळीं गोमंतकीय हिंदूंनीं कदंबांना फार सहाय्य केलें; तथापि त्यांच्या प्रयत्नांला यश आलें नाहीं. हसन गंगूचा हल्ला जमिनीवरून तसाच समुद्रमार्गानेंहि निकराचा झाल्यानें आणि त्याचें सैन्य अफाट असल्यानें कदंबांना टिकाव धरणें अशक्य झालें. अशा रीतीनें सन १३५२ सालीं गोमंतक बहमनी सत्तेंत गेला.

सन १३५७ त हसन जाफरखानानें आपलें राज्य चार सुभ्यांत विभागलें आणि गोव्याचा अंतर्भाव पहिल्या मुख्य सुभ्यांत केला. हसन जाफरखान स. १३५८ त वारला व त्याचा मुलगा महंमद गादीवर आला. महंमदानें सुनी पंथ स्वीकारून आपणास 'गाजी' हा किताब घेतला. युद्धांत परधर्मीयांचा वध करून मुसलमानी धर्माचा प्रसार करणारासच ही पदवी देण्यांत येते. गोमंतकीय हिंदूंस त्यानें फार त्रास दिला. या वेळीं चौदा वर्षे बहमनी सत्ता गोमंतकावर राहिली. शेवटच्या आठवर्षांतील बहमनी कारकिर्द प्रजेला अत्यंत जाचक झाली.

अल्लाउद्दीन बहमनशाह, महंमद, मुजाहिद, दाऊद, दुसरा महंमद, घियासुद्दीन, शमसुद्दीन, ताजुद्दीन फिरुझ, अहमद अली, अल्लाउद्दीन अहमद, हुमायून झालीम, निजाम, तिसरा महंमद, महमूद, अहमद, अल्लाउद्दीन, वली –

उल्ला, कलीमुल्ला असे बहमनी सुलतान होऊन गेले. अखेरच्या कालांत बहमनी वजीर महंमद गवान याचीच फार चलती होती. हा मोठा शूर होता. कोंकण व गोवा घेण्यांत यानें मोठी धडाडी दाखविली होती. पुढें बादशहाच्या रोषामुळें त्याला देहांत शिक्षा मिळाली आणि बहमनी सत्तेसही उतरती कळा लागली. पुढें बहमनी राज्याचीं पांच शकलें होऊन त्यांतून निजामशाही, आदिलशाही, इमादशाही, बरीदशाही व कुतुबशाही अशा पांच शाखा निर्माण झाल्या.

अहमद बहिरी यानें नगर येथें निजामशाही स्थापन केली. युसुफ आदिलशहानें विजापुरास आदिलशाही स्थापिली. फत्तेउल्ला यानें वऱ्हाडांत इमादशाही; कासीम बेरीद यानें बेदर येथें बरीदशाही आणि कुतुबशहा यानें गोंवळकोंड्यास कुतुबशाही स्थापन केली.

बहमनी राज्याची मोठी टांकसाळ कलबुर्गा येथें होती. सर्व बहमनी नाणीं फारसी लिपींत आहेत.

तांब्याच्या एका बहमनी नाण्यावर पुढच्या बाजूनें शाह बहमन अस – सुलतान अशीं अक्षरें असून दुसऱ्या बाजूनें अला – उद – दुनिया अद – दीन अशीं आहेत. याचा आकार १.३१ आहे.

दुसऱ्या एका नाण्यावर पुढील बाजूवर राजी रिजवान मुहीमनी अशीं अक्षरें असून पाठीवर वर्तुळांत फिरूज शाह बहमनी अशीं आहेत. आकार १.७४ आहे.

एका नाण्याची पुढची बाजू अर – राजी अर – रहमान बताईद या अक्षरांची असून पाठची अबू – अल – मुजफ्फर अहमदशाह अस – सुलतान अशा अक्षरांची आहे. याचा आकार १.८७ आहे.

हि. स. ८४५ च्या एका नाण्याचा आकार १.८८ असून त्याच्या पुढच्या बाजूवर अल – वासिक बतायीद उलमुल्क लिल्लह अबू अल मुजफ्फर अशीं अक्षरें असून मागील बाजूवर अहमद शाह बिन अहमद शाह बहमन शाह अशीं आहेत. एका नाण्याचा आकार २.३७ व वजन १७.५७ असून त्याच्या पुढच्या बाजूनें अल – कवी अल – गनी व मागच्या अल – बहमनी अशीं अक्षरें आहेत.

सोन्याचें हूण (होन) नांवाचें बहमनी नाणें होतें. तसेंच रुप्याचें लारी असें होतें.

विजयनगरचें चलन

अरेरावीच्या बहमनी राज्यकारभारानें गांजलेल्या गोमंतकीय जनतेनें ठिकठिकाणीं मुसलमानांवर विजय मिळवीत चाललेल्या विजयनगरच्या रायांकडे आपल्या पुढाऱ्यांना पाठवून आपली शोचनीय स्थिति कळविली. विजयनगरचे महाराज बुक्कराय यांचें व मुसलमानी सैन्याचें युद्ध चालूच होतें. स. १३६५ साली त्यांच्या लढाईला बराच रंग चढला. उभय बाजूंचे लक्षावधि लोक मेले. याच लढाईंत सन १३६६ सालीं बेळगांव वगैरे बराच मुलूख त्यांनीं मुसलमानांकडून घेतला. यावेळीं गोमंतकासह दक्षिण कोंकणच्या स्वारीवरील यशस्वी युद्धांत माधव मंत्री यांनीं महत्वपूर्ण कामगिरी केल्याचें इतिहासांत नमूद आहे. सन १३६६ सालीं घेतलेला हा प्रदेश पुढें सन १४७० पर्यंत विजयनगरच्या सत्तेंत राहिला.

वैशाख शु॥ १५ मा शके १२५८ ता. २८ एप्रिल सन १३३६ ही विजय नगर साम्राज्य स्थापनेची मिती आहे. त्याकालीं श्रीशंकराचार्यांच्या आद्यपीठावर विराजमान असलेल्या श्रीमाधवाचार्य ऊर्फ विद्यारण्य स्वामी यांच्या आग्रही व सक्रीय प्रोत्साहनानें तुंगभद्रा नदीच्या दक्षिण तीरावर हंपी येथें हरिहरराय व बुक्क राय बंधूंनीं या हिंदु साम्राज्याची स्थापना केली. चारहि बाजूंनीं परसत्तेनें वेढलेल्या व गांजलेल्या जनतेला हा तेजस्वी आशा किरण दिसतांच आजूबाजूचे हजारों लोक विजयनगर राज्यांत येऊन स्थिर झाले. विद्या, कला, व्यापार यांना तेथें सक्रीय प्रोत्साहन मिळूं लागलें आणि राज्यविस्तार चारहि बाजूंनीं वाढूं लागून या साम्राज्याचा दरारा इतर मोठाल्या राज्यांवरहि बसला.

संगम, साळुव, तुळुव व आरविडु अशा चार घराण्यांतील राजांनीं हें राज्य चालविलें. हरिहरराय, बुक्कराय, दुसरा हरिहर, विरुपाक्ष, दुसरा बुक्कराय, देवराय, तिसरा बुक्कराय, दुसरा देवराय, मल्लिकार्जून व दुसरा विरुपाक्ष असे दहा राजे पहिल्या संगम घराण्यांत होऊन गेले.

नरसिंहराय व इम्मडी नरसिंगराय, असे दोन राजे दुसऱ्या साळुव घराण्यांत झाले.

वीर नरसिंहराय, कृष्णदेवराय, अच्युतदेवराय, वेंकटदेव, दुसरा तिरुमलदेव व सदाशिवदेव असे सहा राजे तिसऱ्या तुळुव घराण्यांत होऊन गेले.

तिसरा तिरुमलदेव, श्रीरंगदेव, दुसरा वेंकटदेव, दुसरा श्रीरंगदेव, रामदेव, तिसरा वेंकटदेव व तिसरा श्रीरंगदेव असे सात राजे चौथ्या आरविडु घराण्यांत होऊन गेले.

एकंदर २५ राजपुरुष विजयनगरच्या सिंहासनावर आले. त्या सर्वांत हरिहरराय व बुक्कराय या प्रथमच्या दोघांनंतर कृष्णदेवराय हा विशेष शौर्यशाली निपजला. सन १५०९ ते १५३० असा याच्या राज्यकारभाराचा काल असून विजयनगरच्या सिंहासनावरील हा चौदावा राजा होय. राय सम्राटांत हा विशेष धूर्त, मोठा राजकारणी, कलाप्रिय उदार आणि प्रजाप्रिय होता. हा स्वभावानें विनोदी व आनंदी असून याची राज्यपद्धति व न्यायपद्धति उत्कृष्ट होती. हा वयाच्या

विसाव्या वर्षी गादीवर आला. कारकिर्दीच्या सुरवातीसच यानें अनेक स्वाऱ्या करून त्यांत विजय मिळवला. 'राया वाचकम्' या तेलगू ग्रंथांत त्यासंबंधींची चांगली माहिती मिळते. तिरुमलंबा ऊर्फ जगन्मोहिनी, अन्नपूर्णा व कमला या त्याच्या तीन लग्नाच्या राण्यांत पहिली जगन्मोहिनी ही पट्टराणी असून तीहि राजकारणी होती.

विजयनगरला आज दिसणारे अवशेष कृष्णदेवकालीनच आहेत. संस्कृत व तेलगू भाषेंत हा बराच प्रवीण असून ग्रंथकारहि होता. मद्रासच्या जनरल लायब्ररींत 'जांबवती कल्याण' या नांवाचा यांचा एक हस्तलिखित ग्रंथ असून संस्कृतांत व तेलगूंत यांचे दुसरेहि कांहीं ग्रंथ आहेत.

याची राजनीति शुक्रनीति इ. ग्रंथांतील तत्त्वांस धरून होती. सहा लाख पायदळ, साठ हजार घोडदळ, दोन हजार हत्ती असें त्याचें खडें सैन्य असून शिवाय राखीव सैन्य होतें. युद्धोपयोगी सर्व साहित्य बनविण्याचा कारखाना विजयनगरांत होता.

कृष्णदेवराय यानें विजयनगरच्या मूळच्या टांकशाळेंत विशेष, सुधारणा केली. नाणींहि नवीन पद्धतीचीं व सुंदर पाडलीं. त्याची माहिती पुढें येईलच.

कृष्णदेवराय आपल्या राज्याच्या उत्पन्नांतून सर्व खर्च वजा जातां दरसाल एक कोट प्रताप शिल्लक ठेवी. त्यामुळें त्याचें कोषागार नेहमीं भरलेलें असे. याशिवाय सुवर्ण, चांदी, निरनिराळीं रत्नें यांचाहि मोठा सांठा त्याच्या खजिन्यांत असे.

त्यानें कित्येक वेळां आपल्या सुवर्णतुला केल्या व त्या सोन्याचा दानधर्म केला. एकदां नवरत्नतुलाहि केली.

कलिंगदेशच्या युद्धांत जय मिळाल्यानें त्या सेनेचें नेतृत्व करणारा त्यांचा प्रधान अप्पाजी याला दरबारांत गालिचाच्या बैठकीवर बसवून खास या युद्धाच्या विजयानिमित्त विजयनगरच्या टांकशाळेंत पाडलेल्या मोहोरांचा व नवरत्नांचा त्याच्यावर वाद्य इ. थाटांत अभिषेक केला.

यानें विजयनगरपासून बंकापूर मार्गानें गोमंतकापर्यंत एक रहदारीचा रस्ता तयार केला होता.

याच्या साम्राज्यांत हिऱ्याच्या तीन खाणी होत्या. कालिकतजवळच्या खाणींत भरपूर माणकें मिळत. सोन्याच्या खाणीहि बऱ्याच होत्या.

दरबारच्या नृत्यांगना डोक्यापासून पांयांपर्यंत हिऱ्यामोत्यांचे विविध प्रकारचे दागिने घालीत. हत्ती घोडे यांनांहि दागिने वापरीत.

कृष्णदेवरायांच्या अंबारीच्या मुख्य हत्तीच्या गळ्यांत त्यावर बसून पहिला विजय मिळविल्याच्या आनंदाप्रित्यर्थ त्या विजयाबद्दल पाडलेल्या एक हजार एक सुवर्ण मोहोरांचा हार घातला होता.

आपल्या प्रत्येक वाढदिवसादिवशीं कृष्णदेवराय भिकाऱ्यांना सुवर्णनाणें देई.

विजयनगर साम्राज्याची पहिली टांकशाळा पहिला हरिहरराय यानेंच स्थापन केली. या पहिल्या टांकशाळेवरील अधिकाऱ्याचें नांव निरुपाक्ष असें असून त्याच्या नेतृत्वाखालीं पांच माणसें तेथें वावरत होतीं. पैकीं चार कारागीर होते. पहिला हरिहरराय याचें

राजचिन्ह हनुमान व गरुड असें होतें. यानें पहिलें नाणें पाडलें त्यावेळीं त्याच्या उद्घाटन समारंभास दरबारांत श्री विद्यारण्य स्वामी हजर होते. तांबें, चांदी व सोनें या धातूंचीं हरिहररायाचीं नाणीं होतीं. याचा काल सन १३३६ ते १३५५ आहे.

बुक्कराय याचें राजचिन्ह हनुमान असून याचा काल स. १३५५ ते १३७७ आहे.

दुसरा हरिहरराय याचा काल स. १३७७ ते १४०४ असून याचीं राजचिन्हें उमामहेश्वर, लक्ष्मीनारायण, सरस्वती – ब्रह्मदेव व नंदी हीं होतीं. विरुपाक्षरायाकडून त्यांत फरक झाला नाहीं. कारण त्याचा काल कांहीं महिनेच होता.

दुसरा बुक्कराय याचें चिन्ह नंदी हें असून काल स. १४०५ ते १४०६ आहे.

पहिला देवराय याचा काल स. १४०६ ते १४२२ असून याचीं चिन्हें उमा-महेश्वर, लक्ष्मीनारायण, नंदी, गज, रामचंद्र अशीं होतीं.

तिसरा बुक्कराय यालाच विजयराय अशी संज्ञा आहे. याचें राजचिन्ह नंदी असून काल स. १४२२ ते १४२३ आहे.

दुसरा देवराय याचें चिन्ह गज व उमा-महेश्वर असून काल स. १४२३ ते १४४६ आहे.

मल्लिकार्जून याचेंहि चिन्ह गज हेंच असून काल स. १४४७ ते १४६५ आहे.

दुसरा विरुपाक्ष याचें गज हेंच चिन्ह असून काल स. १४६५ ते १४८६ आहे.

साळुव घराण्याचा पहिला नरसिंहराय व इम्मडीनरसिंहराय यांचीं चिन्हें हनुमान व गरुड हीं असून काल अनुक्रमें स. १४८६ ते १४९१ व १४९१ ते १५०१ असा आहे.

तुळुव घराण्याचा पहिला राजा वीर नरसिंहराय याचें चिन्ह नंदी व काल स. १५०४ ते १५०९ आहे.

कृष्णदेवराय याचीं चिन्हें व्यंकटेश, शिव-पार्वती, बाळकृष्ण, नंदी व गरुड अशीं आहेत. याच्या नंतरचे राजे अच्युतदेवराय, वेंकटदेव, दुसरा तिरुमलदेव व सदाशिवदेवराय यांची चिन्हें अनुक्रमें गरुड, नंदी, गज व शिवपार्वती अशीं असून काल स. १५३० - ४१, १५४१ - ४२, १५४२ - ४३ व १५४३ ते १५६८ असा आहे.

विजयनगरचा १९ वा राजा व चौथ्या आरविडु घराण्याचा पहिला तिरुमलदेव ३ रा याचीं चिन्हें श्रीराम, शंख, चक्र, गरुड, वराह, गज नंदी व लक्ष्मीनारायणवंदन अशीं असून काल स. १५६८ ते १५७२ आहे.

श्रीरंगदेव व वेंकटराय यांचें चिन्ह वेंकटेश हें असून काल अनुक्रमें सन १५७२ ते १५८६ व सन १५८६ ते १६१४ आहे.

श्रीरंगराय दुसरा याचें चिन्ह नंदीश्वर असून काल स. १६१४ ते १६१५ आहे.

रामदेवराय याचें चिन्ह व्यंकटेश्वर हें असून त्याची कारकिर्द सन १६१५ — १६३३ अशी होती.

तिसरा वेंकटदेवराय यानें चिन्हांत फरक केल्याचें दिसत नाहीं. याचा काल स. १६३३ ते १६४५ आहे.

तिसरा श्रीरंगदेवराय हा २५ वा व शेवटचा राजा. यानें टांकसाळीचा हक्क इस्ट इंडिया कंपनीस दिला व नाण्यांवर कुलदेवता शिवपार्वतीची प्रतिमा छापण्याची अट घातली.

दुसरा हरिहरराय यानें विजयनगर साम्राज्याच्या मूळच्या टांकशाळेंत वरीच सुधारणा करून व्याप वाढविला. नाण्याचा आकार वाटोळा करून नाण्यांवर नागरी लिपींत पण कानडी भाषेंत बिरुदें छापण्यास सुरवात केली. त्याच्या पूर्वी कानडी लिपी वापरीत असें दिसतें.

गद्याण किंवा गद्यानक, वराह, पोण किंवा पगोडा, प्रताप (माड किंवा माडई), काटि, पण, हाग अशीं विजयनगरचीं सोन्यांचीं नाणीं होतीं. प्रताप विशेष प्रचारांत होता.

तार हें चांदीचें नाणें सर्वसाधारण जनतेंत जास्त प्रचलित होतें.

तांब्याचा पण, जितल, कासू अशीं तांब्याचीं नाणीं होतीं.

पगोडा ५२ ग्रेन वजनाचा व गद्याण ६२ ग्रेनचा होता. नंतरच्या गद्याणचें वजन ६५ ग्रेन होतें. तथापि पुढें ५२ ग्रेनचाच पगोडा साम्राज्यांत सर्वत्र चालू राहिला.

वराहांत घट्टी वराह (वजन ७-५), दोड्ड वराह (दुप्पट वजन), शुद्धवराह असे भेद होते. शुद्ध वराहालाच गद्याण म्हणत.

कृष्णदेवरायाचा गद्याण ११९-७ ग्रेन असे. अच्युत रायाचें चक्रगद्याण नांवाचें जें नाणें होतें तें साधारणतः ४ रुपये किंमतीचें होतें. काटि गद्याण हा वळाहाचा पावभाग होय. अर्धगद्याणास प्रताप म्हणत. प्रतापाचीं तामीळ नांवें माड व माडई अशीं होतीं. ५ पणांचा प्रताप व १० पणांचा गद्याण असे.

अच्युतरायाच्या कारकिर्दीत 'चिन्नाम' नांवाचें एक नाणें होतें. तें पगोड्याच्या एक अष्टमांश होतें.

पाव पणाला हाग म्हणत. यालाच काकिणी असेंहि नांव होतें. भास्कराचार्यांच्या लीलावती ग्रंथांत चार काकिणीचा एक पण असें म्हटलें आहे.

'फनाम' नांवाचें एक नाणें असून तें प्रतापाच्या एक दशांश वजनाचें व सुवर्णाचें असे. तार हें फनामच्या एक सोळांश किंमतीचें होतें. कौटिल्याच्या अर्थशास्त्रांत याचें नांव मिळतें.

विजयनगरच्या बहुतेक सर्व नाण्यांवर एका बाजूनें नाण्यांचें नांव व राजचिन्ह आणि दुसऱ्या बाजूनें राजाचें नांव व बिरुदावली असे. प्रत्येक राजाच्या या राजचिन्हाची माहिती वर आलीच आहे.

विजयनगर साम्राज्याच्या टांकशाळेंत सर्वांत अधिक सुधारणा कृष्णदेवराय यांनीं केली. याच्या कारकिर्दीतील टांकशाळेचा प्रमुख अच्युपन्नायद नांवाचा कुशल इसम होता.

कृष्णदेव रायाच्या कालीं विशेष प्रचारांत असलेलें चलन म्हणजे वराह, अर्धा वराह किंवा प्रताप, पाव वराह, हण किंवा फनम (हा वराहचा २० वा भाग) हें सोन्याचें तार हें चांदीचें आणि जितल हें तांब्याचें होय.

विजयनगर साम्राज्याच्या मांडलिक राजांच्याहि टांकशाळा असून त्यांना नाणीं पाडण्याचे अधिकार होते. हें लक्ष्मण दण्णायक याच्या नाण्यावरून दिसून येतें. दक्षिण भारतांत विजयनगरचीं नाणीं सर्वत्र सांपडतात.

— १८ —

आदिलशाही नाणीं

विजयनगरचा राजा विरुपाक्षराय हा दुर्बल व त्याचा गोमंतकांतील प्रतिहस्त अमराजी हा देखील साधारणपैकींच असल्याची संधि साधून काकदृष्टि महंमद गवानानें स. १४७० सालीं जमिनीवरून व समुद्रमार्गें गोमंतकावर हल्ला चढवला व तें स्वतःच्या सत्तेखालीं आणलें. अशा रीतीनें गोमंतक पुन्हां बहमनी राजवटींत आला.

महंमद गवान हा बहमनी राजवटींतील अकरावा बादशहा अहमदशहा याचा वजीर होता. ता. ११ फेब्रुवारी सन १४७१ रोजीं गोव्याचा कारभार त्याच्या हातीं आला असा ऐतिहासिक कागदपत्रांतून उल्लेख मिळतो.

पुढें कांहीं कालानें दारूच्या नशेंत एका आरोपावरून बादशहानें मारेकऱ्याकडून गवानाचा खून केला. यानंतर एकाच वर्षानें महंमदशहाहि कालवश झाला. बादशहाचा असा अंत झाल्यावर सरदार स्वतंत्र होण्याची चुळबूळ करूं लागले. स. १४८६ च्या सुमारास सरदार बहादूर खिलजीनें बंड पुकारून गोमंतकांतील बहमनी सरसुभेदाराला ठार केलें व आपण गोमंतकाचा राजा झाल्याची द्वाही फिरविली. लगेच बादशाही सेनापतीनें खिलजीवर हल्ला करून त्याला ठार केलें. यानंतर आलेल्या सुभेदारानें दोन वर्षें कारभार पाहिला. पण त्याच्या मागून सुभेदार म्हणून आलेल्या त्याच्या मुलानें विजापूरचा सुभेदार स्वतंत्र झालेला पाहून आपणेंहि स्वातंत्र्य पुकारलें. तथापि त्याचें सैन्यबल कमी असल्यानें विजापूरकरांनीं जरब दाखवितांच त्यानें तत्काल नमतें घेऊन विजापूरकराची सत्ता कबूल केली आणि अशा रीतीनें सन १४८९ सालीं गोमंतकावर आदिलशाही सत्ता सुरु झाली.

बहमनी राजवटींत गोपकपट्टण (थोरलें गोवें) शहराचा विध्वंस झाल्यानें त्याचें सौंदर्य अजिबात नष्ट झालें आणि जवळच्या जुन्या गोव्याच्या वाढत्या प्रगतीस आरंभ झाला.

आदिलशाहीचा मूळ पुरुष अबूल मुझफार हा असून तो तुर्कस्थानच्या राजघराण्यापैकीं होता. तो कांहीं कारणानें तिकडून पळून रोम येथें गेला व तेथून इराणला येऊन सन १४५९ सालीं हिंदुस्थानांत आला. पुढें महंमद गवानाच्या शिफारशीनें बहमनी राज्यांत तो अधिकारी झाला व वाढतां वाढतां सरदार होऊन विजापूरच्या सुभ्यावर सुभेदार झाला. कांहीं दिवसांनंतर त्याच्या मनांत स्वतंत्र राज्याच्या कल्पना येऊं लागल्या व त्या त्याला चैन पडूं देईनाशा झाल्या. पुढें बहमनी बादशहा अल्पवयी पाहून संधिसाधु अबूल मुझफरनें स्वातंत्र्याची घोषणा केली आणि युसुफ आदिलशहा या नांवानें विजापूरच्या नवीन तक्तावर तो आरूढ झाला. बेरीदशाही, निजामशाही, इमादशाही, कुतुबशाही व आदिलशाही या बहमनी राज्यांतून जन्म पावलेल्या पांचहि शाह्यांपैकीं आदिलशाही युसुफ आदिलशहाच्या पराक्रमामुळें जास्त प्रबल झाली.

युसुफ आदिलशहाच्या राजधानीचें शहर विजापूर हें असून त्याला पूर्वी विद्यापूर असें म्हणत असत. राजधानीचा मान मिळाल्यावर शहर चारहि बाजूनें वाढत जाऊन लोकसंख्या दहा लाख झाली. शहराभोंवतालची तटबंदी मजबूत करून राजवाडाहि भव्य बांधण्यांत आला. आजहि तटाचे अवशेष, खंदक इ. दिसत असून पश्चिम तटावरील पंचधातूची मुलुखमैदान तोफहि तिथेंच आहे. त्यावेळीं या तोफेची प्रसिद्धी फार होती.

युसुफ आदिलशहानें गोमंतक घेतल्यावर जुनें गोवें येथें आपली या भागांतील राजधानी थाटली. राजधानीचा मान या शहरास मिळाल्यामुळें जुन्या गोव्याची अधिकाधिक भरभराट होत चालली. त्यावेळीं या शहराची रचना सुंदर असून त्याची लांबी पाऊण मैल व रुंदी पाव मैलाच्या अंदाजांत होती. शहराभोंवतीं मोठा तट असून त्याच्या बाहेर चारहि बाजूंनीं पाण्यानें भरलेले खंदक होते. चोहों-बाजूंस चार दरवाजे होते. आज दिसणाऱ्या व्हिसिरै कमानीच्या जागीं पहिला प्रमुख दरवाजा असून दुसरा सां. कातारीन मंदिराच्या जागीं, तिसरा नो. सिं. द सेन्ह मंदिराजवळ व चौथा गतकालीन जकात कचेरीच्या जागीं होता.

पहिल्या दरवाज्यांतून आदिलशहाच्या वाड्यांत जातां येई. वाडा मजबूत व सुंदर होता. मुख्याधिकाऱ्यांसाठीं निरनिराळीं शोभिवंत घरें होतीं. रस्त्याजवळच एक मशिद होती. या मशिदीवर पुढें सां. पाउल कॉलेजची उभारणी करण्यांत आली.

विजापुरकर युसुफ आदिलशहा यानें एका मराठ्याच्या मुलीकडे लग्न केलें होतें. तो धोरणी असल्यानें त्यानें हिंदूंशीं आपलें वर्तन सहानुभूतीचें ठेवलें होतें. राजकारणांत त्यानें गोमंतकीय हिंदूंना बरेंच जवळ केलें होतें. कित्येक हिंदूंना त्यानें मोठ्या अधिकारावर नेमलें होतें. गोव्याच्या निरनिराळ्या भागांत असलेले सरदेसाई किंवा देसाई हे आदिल-शहाचेच अधिकारी होते. असें जरी असलें तरी हिंदु संस्कृति व इस्लामी संस्कृति यांच्यांत जी साहजिक तेढ होती त्यामुळें हिंदूंच्या सांस्कृतिक आकांक्षा मुसलमान सत्ताधाऱ्यां-कडून पूर्ण होणें शक्य नव्हतें. आदिलशाही सैन्यांतील रुमी, तुर्क, आफाफी या लोकांकडून प्रजेवर होणारा जुलूमहि कांहीं कमी नव्हता. विजयनगरच्या राजवटींतील सुख समाधानी व आपुलकी तर मुसलमानी अमदानींत मिळणें अशक्य असल्यानें आदिलशाही सत्ता प्रजेला बरीच जाचत होती. तथापि खुद्द आदिलशहा हिंदूंविषयीं आपलें प्रेम दाखवीत होता. विद्या, शौर्य, राजकारण यांत युसुफ मोठा चतुर होता. यानें गोव्यांतील दरबारी दप्तर प्रजेच्या सोयीसाठीं मुद्दाम मराठी भाषेंत ठेवलें होतें. विजापूर येथील नूतन नगर रचनेची कल्पना याचीच आहे.

युसुफाच्या मागें त्याचा मुलगा इस्माईल आदिलशहा गादीवर आला. युसुफ आदिल-शहाची कारकिर्द स. १४८९ ते १५१० पर्यंत चालली तर इस्माईल याची स. १५१० ते १५३४ पर्यंत होती. सन १५३४ त इस्माई-लच्या मागें मल्लू आदिलशहा व त्यानंतर

इब्राहीम आदिलशहा हा राज्यावर आला. यानें कारभारांत बरीच प्रगति केली. बंधूच्या वेळीं जन्म पावून अधून मधून त्याच्याविरूद्ध डोकावणारीं कोंकणातील बंडेंहि यानें मोडलीं. स. १५५८ त हा वारला.

आदिलशाही तक्तावरील पांचव्या राजाचें नांव अली आदिलशहा असें होतें. याचा काल १५५८ तें १५८० आहे. हा बुद्धिमान व शूर असून त्याचा फडणीस ब्राह्मण होता.

दुसरा इब्राहिम आदिलशहा हा सहावा राजा असून त्याचा काल स. १५८० ते १६२७ आहे. हा अल्पवयी असल्यानें राज्यकारभार त्याची चुलती चांदबिबी ही पाही. याच्यावेळीं सरदारांत गोंधळ माजला व अकबराच्या सैन्याचाहि हल्ला आला; तथापि चांदबिबीनें खंडणी देऊन अकबराकडे तह केला आणि सरदारांनांहि वठणीवर आणलें. वयांत आल्यावर यानें राज्यांत अनेक सुधारणा केल्या. यानें आपल्या राजवाड्यांत सरस्वतीची मूर्ति स्थापन केली व दर पौर्णिमेस तिचा उत्सव सुरू केला. याच्या फर्मानांवर ' श्रीसरस्वती ' अशीं अक्षरें असत.

महंमद आदिलशहा हा विजापूरच्या गादीवरील सातवा शहा. याचा काल स. १६२७ ते १६५७ असा आहे. मोंगलाचा जहागिरदार मुरारराव परांडे याच्यावर हल्ला करून त्याच्या परिंडा किल्ल्यावरची प्रसिद्ध तोफ यानेंच विजापुरास आणली. ती अजून विजापुरच्या तटावर असून तिला ' महांकाळी ' असें नांव आहे. हिचें वजन ६० खंडी, लांबी ४० फूट व तोंडाचा घेर २ फूट ४ इंच आहे.

दुसरा अली आदिलशहा (स. १६५७–१६७२) व शिकंदर आदिलशहा (१६७२–१६८६) या आठव्या व नवव्या शहांच्या कारकिर्दीत श्रीशिवाजी महाराजांनीं हिंदी स्वराज्याची स्थापना केली.

आदिलशाही तक्त विजापूर येथें सन १६८६ पर्यंत टिकलें असलें, तरी गोवें बेट व इतर भाग आदिलशाही सत्तेंतून गेल्यानंतर अंत्रूज व जांबावली पंचमहाल हे श्रीशिवाजीनें घेईपर्यंत म्हणजे सन १६७४ पर्यंतच आदिलशाही सत्ता गोव्यांत राहिली होती. यावेळीं गोमंतकांतील मुख्य राजधानीचें त्यांचें ठिकाण फोंडें येथें होतें. तेथील किल्ल्याचे व इतर अवशेष अजून दिसतात. फोंडें येथील सभामशीदहि त्याच वेळची आहे.

इ. सं. डॉ. पिसुर्लेकर यांनीं आपल्या ' इंस्क्रिसोंइश प्रेपोर्तुगेझस् द गोअ ' या पुस्तकास जोडलेल्या स. १६६७ च्या मोडी लिपींतील एका मराठी दाखल्यावरून त्या कालीं फोंडें येथें आदिलशहाचे खालीलप्रमाणें अधिकारी असल्याचें कळून येतें :—

सुभेदार, हवालदार, ठाणेदार, मुजुमदार, नाजीर, सरसामंत, डबीर, सरनौबत, सबनीस, सरगुरो, सरनाईकवाडी, नाईकवाडी, सरदेसाई, प्रतापराव सरदेसाई, ग्यानतराव सरदेसाई, पंडित इ.

युसुफ आदिलशहा तक्तावर आला त्याच

वर्षी आपल्या नांवांचीं नाणीं पाडण्याचा विचार ठरवून त्याबद्दलची त्याची तयारी सुरू झाली. तक्तावर आल्यावर किंवा एखाद्या स्वारींत विजय मिळविल्यावर त्याबद्दलचें स्मरण म्हणून नाणीं पाडण्याच्या मुसलमानी पद्धतीस धरूनच त्याचा हा विचार होता. नाणीं कशा तऱ्हेचीं पाडावीं हें ठरविण्यापूर्वी त्यानें आपले इसम निरनिराळ्या मुसलमानी राज्यांत पाठवून त्यांचीं नाणीं आणविलीं.

महंमद गझनीचे टंक आणले. शिकंदर लोदीचे टेके, महंमद बिन तघलकचे टके, कुणाचे हूण व कुणाचे पनव आणले. पर्शियांतून अश्रफी (वजन १० ग्रेन) व लारी हीं नाणी आणलीं. आणलेल्या सर्व नाण्यांतून आदिलशहाला लारी हें नाणें विशेष आवडलें. लारी नाणें चांदीचें असून तें प्रथम पर्शियन गल्फमध्यें शहा अब्बासनें पाडलें. इराणमधील लार या ठिकाणीं पाडण्यांत आल्यानें त्याला 'लारी' अशी संज्ञा मिळाली.

आदिलशहाची पहिली टांकशाळा युसुफ आदिलशहानें विजापूर येथें सुरू केली व त्यानें आपल्या नांवचें लारी नाणें पाडलें. त्यावर एका बाजूनें हिजरी सन व सुलतान युसुफ आदिलशहा अशीं उर्दू अक्षरें व दुसऱ्या झरब लारी अशीं अक्षरें होतीं. कित्येक इंग्लिश संशोधकांनीं या नाण्याला लारीन व लाहरी म्हटलें आहे.

अली आदिलशहाचीं जीं नाणीं उपलब्ध आहेत त्यांपैकीं कांहींकांवर एकाबाजूनें हिजरी सन १०७१ (इ. सन १६५९) असून सुलतान अली आदिलशहा अशीं उर्दू अक्षरें व दुसऱ्या बाजूनें 'झरब लारी डांघ सिक्का' अशीं आहेत. हीं नाणीं अस्सल चांदीचीं असून कित्येक लांबट व कित्येक वाटोळीहि आहेत. अर्ध लारी नांवांचेंहि आदिलशाही नाणें होतें. अंझोल नांवाच्या नंतरच्या आदिलशाही नाण्यावर शहाचा मुखवटा होता.

दक्षिण कोंकणांत व खुद्द गोव्यांत चालू असलेल्या नाण्यांवर एका बाजूस उर्दू भाषेंत '१११ अली आदिलशहा' असें नांव व दुसऱ्या बाजूस सालारीवाले अशीं अक्षरें होतीं. हें नाणें चिमट्याच्या आकृतीचें लहान आकाराचें होतें. हें लारी नाणें चांदीचें होतें.

भारत इतिहास संशोधक मंडळाच्या नाणक-संग्रहांत जीं लारी नाणीं आहेत त्या सर्वांवर एका बाजूस 'सुलतान अली आदिलशहा' व दुसऱ्या बाजूस 'जर्ब लारी दावुली सनह' असा मजकूर आहे. कांहीं नाण्यांवर आदिल ऐवजीं आदाल असा शब्द आहे. कित्येकांवर शाह शब्दापुढें एक उभी रेघ आहे तर कित्येकां-वर तीन उभ्या रेघा आहेत. एकावर जर्ब या शब्दांतील र्ब वर तारा आहे. या लाऱ्यांचा प्रचार कोंकणांतच विशेष होता. जुनें गोवें येथेंहि एक आदिलशाही टांकसाळ होती.

पोर्तुगीज चलन (पूर्वार्ध - १)

सांस्कृतिक किंवा इतर दृष्टीनेंहि आदिलशाही सत्ता गोमंतकीयांना मानवत नसल्यानें ते नाखुष होते. विजयनगरचा सरदार व होनावरच्या आरमारी ठाण्यावरील प्रमुख तिमाजी नाईक ऊर्फ तिमोज याचीहि इच्छा आदिलशाही सत्तेंतून गोमंतक मुक्त करण्याची होती. तथापि विजापूरकर आदिलशहाचें बस्तान गोव्यांत ठीक बसलेलें असून त्याचें सैन्यहि प्रबल असल्यानें आणि विजयनगर सरकारला निरनिराळ्या शत्रूंना शह देण्यासाठीं आपल्या सैन्याची विभागणी करण्याची जरूरी असल्यानें गोव्याच्या आदिलशाही सत्तेवर आपण हल्ला करण्यापेक्षां तो पोर्तुगिजांकडून करवून मग सलोख्यानें खंडणी वगैरे निमित्त्यानें सत्ता आपण हातीं घ्यावी आणि पोर्तुगीज इकडून परतल्यावर विजयनगरच्या अधिसत्तेंत सामील होऊन आपण मांडलीक म्हणून गोव्याचा राज्यकारभार करावा अशी त्याची इच्छा होती.

कालिकतच्या लढाईनंतर कांहीं दिवसांनीं पोर्तुगीज सरदार आफोंस द आल्बुकेर्क ससैन्य सोकोट्राकडे निघाला असतां वाटेंत आंजेदिवजवळ तिमोजीशीं त्याची भेट झाली. याच भेटींत तिमोजनें त्याला गोवा घेण्याची युक्ति सांगितली.

गोवा हें पश्चिम किनाऱ्यावरील एक बरेंच महत्वाचें व्यापारी ठिकाण असून तेथें गलबतें राहाण्यास उत्तम बंदर आहे. अशा प्रकारची उत्तम जागा स्वतःच्या सत्तेंत असल्यावर व्यापारास मोठा वाव मिळेल हें तिमोजचें म्हणणें आल्बुकेर्कला पटलें. कोचीन, कालीकत वगैरेकडील पोर्तुगिजांच्या वखारी तेथील राजांच्या मर्जीप्रमाणें चालवाव्या लागत. सत्ता स्वतःची असली म्हणजे मग तेथील व्यापार आपल्या मर्जीप्रमाणें चालविणें ठीक असतें हेंहि त्याच्यालक्षांत आलें. आफ्रिकेहून कोचीनपेक्षां गोवा जवळ असून तो काबीज करण्यास प्रजेशीं वैर करण्याचीहि जरूरी नव्हती हें लक्ष्यांत घेऊन आल्बुकेर्कनें तिमोजचें म्हणणें मान्य केलें व गोवा घेण्याचा निश्चय केला.

आल्बुकेर्क गोव्यांत आला तेव्हां मलीक युसुफ गुर्गी हा आदिलशाही सुभेदार गोव्याच्या कारभारावर होता. अनेक गोष्टीमुळें हिंदूंना तो नकोसा झाला होता. स्वतः आदिलशहा विजापुराकडील एका महत्वाच्या राजकारणांत गुंतला होता. सर्व प्रजा मुसलमानांविरुद्ध पोर्तुगिजांस सहाय्य करण्यास सज्ज होती.

पणजीच्या बंदराच्या नाक्याजवळ आदिलशहाचा किल्ला होता. (हीच सध्याची पॅलेस होय.) आल्बुकेर्कनें त्यावर हल्ला करून ता. १ मार्च सन १५१० रोजीं तो घेतला आणि व्यापारानिमित्त आलेल्या पोर्तुगिजांच्या हिंदुस्थानांतील सत्तेची त्यानें स्थापना केली. दोन दिवसांत सबंध गोवा शहर पोर्तुगिजांच्या हातीं आलें.

हल्ला जबरदस्त असल्याचें पाहून सर्व मुसलमान अधिकारी पळून गेले. कित्येक तर मृत्युमुखीं पडलेच होते. यवनी सत्तेंतून सुटल्याचा प्रजेसहि संतोष झाला.

यावेळीं गोमंतकाची क्षेत्रमर्यादा उत्तरेस कुडाळपासून दक्षिणेस सदाशिवगडापर्यंत होती व या भागास तळकोंकण असें नांव होतें.

आदिलशहाकडून गोवा गेल्याची बातमी चहूंकडे पसरली. कित्येकांनीं पोर्तुगिजांचें अभिनंदन केलें तर कांहीं मुसलमानांनीं आदिलशहाकडे दुःखप्रदर्शन केलें. हिंदु लोकांनीं मोठा आनंद व्यक्त केला. आल्बुकेर्क यानें भारी मोलाची हिऱ्याची आंगठी वगैरे देऊन तिमोजचा गौरव केला.

गोवा गेल्याच्या बातमीनें विजापूरच्या दरबारांत मोठी गडबड उडाली. साठ हजार फौजेसह इस्माईल आदिलशहा धांवत आला व त्यानें २३ मे रोजीं पोर्तुगिजांकडून गोवा परत घेतला. इस्माईल आदिलशहा बरेच दिवस गोव्यांत राहिला आणि नंतर सरदार रसलखान याकडे कारभार संपवून एका महत्वाच्या कामासाठीं तो विजापुराकडे निघून गेला.

ही संधि साधून तिसवाडींतील लोकांनीं बंड पुकारलें व मुसलमान ठाणेदाराला ठार केलें.

इस्माईलनें गोवें घेतल्यावर आल्बुकेर्क आपल्या लोकांसह जहाजांतून समुद्रांत जाऊन राहिला व नंतर कोचीनकडे गेला.

आदिलशहा निघून गेल्याची व लोकांनीं बंड पुकारल्याची बातमी तिमोजनें आल्बुकेर्कला कळविली व गोव्यावर पुन्हां हल्ला करण्याचा आग्रह केला. आपण हल्यासाठीं आपल्या सैन्यासह तयार असल्याचेंहि त्यानें सांगितलें. इतक्यांत पोर्तुगालहूनहि आणखी सैन्य आलें. अशा रीतीनें सैन्याची जमवाजमव होऊन आल्बुकेर्कनें पुन्हां गोव्यावर हल्ला केला. आदिलशाही सरदार रसलखान व पुलातखान यांच्याशीं निकराची लढाई देऊन सोमवार ता. २५ नोव्हेंबर १५१० रोजीं आल्बुकेर्कनें पुनः गोवें घेतलें.

या लढाईंत तिमोज, सरदेसाई म्हाडपै, मल्हराव, मन नाईक, मांग दळवी, रवळू कामत वगैरे अनेक हिंदु पुढाऱ्यांनीं आपणास मनःपूर्वक सहाय्य केल्याचें आल्बुकेर्कनें पोर्तुगालला राजास पाठविलेल्या पत्रांत लिहिलें आहे.

गोव्याची योग्य तटबंदी केली, इतर व्यवस्थाहि ठीक ठाक केली आणि स्थिरस्थावर झाल्यावर आल्बुकेर्क मलाकाकडे जाण्यास निघाला. ही बातमी कळतांच मल्लिकाजी या सरदारास विजापुरकरानें पुन्हां गोव्यावर पाठविला; तथापि त्याचे प्रयत्न फुकट गेले.

सन १५२४ त विजापुरकरानें गोव्यावर फिरून स्वारी केली. त्यामुळें गोवा बेटाखेरीज तळकोंकणचा सर्व भाग पुन्हां विजापुरकराकडे आला. पुढें सन १५४३ त साष्ट व बार्देश हे भाग आदिलशाकडून पोर्तुगिजांस मिळाले आणि तेव्हांपासून गोवा बेट म्हणजे तिसवाडी, साष्ट व बार्देश या तिन्हीं महालांवर पोर्तुगिजांची सत्ता सुरू झाली. सदरील प्रदेशालाच जुनी काबिजार म्हणतात.

पोर्तुगीज सत्ता सुरू होतांच आफोंसु द आल्बुकेर्क या पोर्तुगीज सरदारानें प्रशासकाच्या नात्यानें एक जाहीरनामा काढून सर्व प्रजाजनांना आपापल्या धर्माप्रमाणें व चालीरीतींप्रमाणें वागण्यास पूर्ण मुभा दिल्याचें

जाहीर केलें.

जसजसे दिवस जाऊं लागले तसतसा आल्बुकेर्कला इतर धर्मांचा द्वेश वाटूं लागला आणि गोव्यांत ख्रिस्ती लोकांची आवश्यकता भासूं लागली. त्यानें गोव्यांत लागलेंच एक कॅथेड्रल उघडलें. जाहीरनाम्यानें प्रजेस दिलेलें अभिवचन संपुष्टांत आणून गोव्यांतील साऱ्या लोकांचें ख्रिस्तीकरण लवकरांत लवकर करण्याची त्याला हुरहूर लागली.

सन १५३४ त गोव्यांत बिशपची गादी स्थापन झाली.. सन १५३८ सालीं व्हिगारियु जेराल आला. यानेंच तिसवाडींतील हिंदूंना बाटवून ख्रिस्ती करण्यास सुरवात केली. सदर व्हिगारियु मिगेल व्हाज या महान् हिंदु-धर्मद्वेष्ट्या पाद्रीनें स. १५४० त तिसवाडींतील सारीं हिंदु देवळें मोडलीं.

पुढें स. १५३६ सालीं साष्टींतील बाटाबाटी-स जोर चढला व रायतुरचा किल्लेदार दियोग रुद्रीगिस् यानें लोटलीच्या श्रीरामनाथ देवाल-याचा विध्वंस केला. पुढील सालीं त्यानें साष्टींतील सर्व देवळें मोडून टाकलीं.

सन १५७३ त बार्देशच्या बाटाबाटीस ऊत आला. तेथील सर्व हिंदूंना बाटवून त्यांचीं सर्व देवळें मोडून टाकलीं व त्या ठिकाणीं ख्रिस्ती मंदिरें उभारण्यांत आलीं.

या बाटाबाटीच्या महान् दुःखद प्रसंगानें गोव्यांतील सारे हिंदु होरपळून गेले. ज्यानें धर्म-पालनाचें अभिवचन दिलें त्याच दुष्ट आफोंसु आल्बुकेर्कनें आपल्या धर्मांची, चालीरीतींची, देवळांची आणि घरादारांची राख रांगोळी करण्यास धर्मवेड्या पाद्रींना प्रोत्साहन देऊन जनतेचा सर्वस्वी विश्वासघात केला त्यामुळें सारी प्रजा प्रक्षुब्ध झाली. सर्वत्र गडबड माजली. ज्या आल्बुकेर्कच्या हुकुमानें आपला सत्यानाश झाला त्या बदमाशाला नेस्तनाबूत कसें करावें हाच विचार प्रत्येकाच्या अंतः-करणांत घोळूं लागला. पण सशस्त्र सत्तेपुढें निःशस्त्रांचें काय चालणार ? त्यांनीं शक्य तों प्रतिकार केला. कांहींकांनीं बायकामुलांसह देहार्पण केलें. कित्येकांनीं देव व कुटुंबियांसह पलायन केलें आणि कित्येक पळतां पळतांहि त्या दुष्टांच्या कचाटींत सांपडून कैद झाले. अर्थात् पुढें ख्रिस्ती झाले !

बाटाबाटीच्या वेळीं पाद्री आणि सरकार यांनीं एकदिलानें जें भयंकर अत्याचार गोव्यांत केले, तरुण बायकांचा जो छळ केला, स्त्रियांची व मुलांचीं जी कत्तल केली तो प्रकार जनावरां-नांहि लाजविणारा आहे !

सन १५१० सालापासून गोवें ही पोर्तुगि-जांची हिंदुस्थानांतील राजधानी झाली. गोवें शहरांत त्यावेळीं सुमारें चार लाख लोकवस्ती होती. शहराचा कांहीं भाग सपाट व कांहीं भाग टेकडीवर वसलेला होता त्यामुळें. घरांच्या व्यवस्थित रचनेमुळें आणि मोहकता व संपन्नता यांमुळें पोर्तुगिजांना हें शहर आपल्या लिजबोअसारखें वाटे.

गोवें बंदरांत त्यावेळीं अंदाजें अर्ध्या जगां-तील व्यापारी जहाजांची रहदारी होती.

पोर्तुगीज राज्य हें स्पेन राज्यांतून उदय पावलें. पोर्तुगिजांच्या इतिहासाचे सन ११३९ पासून १९१० पर्यंतच्या कालांत आठ खंड पडले आहेत.

सन ११३९ ते १२९७ पर्यंतचा मुलुख संपादनाचा प्रथम खंड, १२९७ ते १३८५ पर्यंतचा राज्य संघटनेचा द्वितीय खंड, १३८५ ते १४९८ पर्यंतचा शोधांचा तृतीय खंड, १४९८ ते १५८० पर्यंतचा वैभवाचा चतुर्थ खंड, १५८० ते १६८० पारतंत्र्याचा पंचम खंड, १६८० ते १७५० हा पोर्तुगालचें स्वातंत्र्य व ब्राझीलचें संपादन यांचा षष्ठ खंड, १७५० - १८३४ हा सुधारणेचा सप्तम खंड आणि १८५४ ते १९१० हा सनदशीर पद्धतीचा अष्टम खंड होय.

पोर्तुगीज राष्ट्राचा मूळ संस्थापक दों आफोंसु यॅन्हीकिस् या राजापासून प्रजासत्ताकच्या स्थापनेपर्यंत चार घराण्यांतील एकंदर तेहतीस राजे पोर्तुगालच्या गादीवर आले.

पोर्तुगीज राज्याचा कारभार चालविणारीं सदरील चार घराणीं म्हणजे आफोंसीन, ज्योआनीन, फिलीपीन व ब्रिगांतीन हीं होत.

पहिल्यांत दों आफोंसपासून दों फेर्नांद, दुसऱ्यांत दों जुआंवपासून कार्दियाल दों यॅन्हिक, तिसऱ्यांत पहिला दों फिलीपपासून तिसरा दों फिलीप आणि चौथ्यांत दों जुआंवपासून दुसरा दों मानुयेल या राजांचा समावेश होतो.

दों आफोंस यॅन्हीकिस् ११२८ - ११८५, दों सांश १ला ११८५ - १२११, दों आफोंस दुसरा १२११ - २३, दों सांशु २रा १२२३ - ४८, दों आफोंस ३रा १२४८ - ७९ दों दिनीज १२७९ - १३२५, दों आफोंस ४था १३२५ - ५७, दों पेद्रु १३५७ - ६७, दों फेर्नांदु १३६७ - ८३, दों जुआंव १ला १३८३-१४३३, दों दुआर्ति १४३३ - ३८, दों आफोंस ५वा १४३८ - ८५, दों जुआंव २रा १४८५-९३, दों मानुयेल १ला १४९३ - १५२१, दों जुआंव ३रा १५२१ - ५७, दों सेबास्तियांव १५५७ - ७८, दों यॅन्हिक १५७८ - ८०, फिलीप १५८० - ९८, फिलीप २रा १५९८-१६२१, फिलीप ३रा १६२१ - ४०, जुआंव ४था १६४० - ५६, आफोंस ६वा १६५६-८३, पेद्रु २रा १६८३-१७०६, जुआंव ५वा १७०६ - ५०, जुजे १ला १७५० - ७७, दोन मारीअ १७७७ - १८१६, जुआंव ६वा १८२६ - २८, मिगेल १८२८ - ३४, दोन मारीअ २री १८३४ - ५३, पेद्रु ५वा १८५३ - ६१, लुईज १८६१ - ८९, दों कार्लु १८८९ १९०८, दों मानुयेल २रा १९०८ - १९१०. यानंतर प्रजासत्ता कारभार सुरू झाला.

पोर्तुगीज चलन (पूर्वार्ध २)

पोर्तुगीज राजवटींतील चौदावा राजा दों मानुयेल पहिला याच्या कारकिर्दीत पोर्तुगिजांचा हिंदुस्थानाशीं पहिल्यान्दां संबंध आला. ८ जुलै सन १४९७ रोजीं पोर्तुगाल येथून व्यापारी जहाजें घेऊन निघालेला व्हास्कु द गाम ता. २७ ऑगष्ट सन १४९८ रोजीं हिंदुस्थानांत कालिकत येथें पोंचला. पुढें सन १५१०त पोर्तुगीज सरदार आफोंस द आल्वुकेर्क यानें तिमोज वगैरे गोमंतकीय पुढाऱ्यांच्या सहाय्यानें गोवें घेतलें हें मागें आलेंच आहे.

गोवें घेतल्यानंतर कांहीं दिवसांनीं गोव्यांतील व्यापारी एकत्र जमून व्यापार व्यवहाराच्या सोयीसाठीं नवीन राज्यकर्त्यांचीं नाणीं व्यवहारांत येण्याची आवश्यकता प्रतिपादूं लागले. सगळयांनीं एकमतानें ठरवून ही गोष्ट तिमोजला सांगितली आणि या व्यापारी शिष्टमंडळासह तिमोज गोव्याचा पोर्तुगीज प्रशासक आफोंस आल्वुकेर्क याकडे गेला. व्यापार व्यवहारासाठीं नवीन नाण्यांची किती जरूरी आहे हें त्याला सांगितलें आणि नवीं नाणीं पाडलीं नाहींत, किंवा पूर्वीचीं नाणीं चालविण्याची परवानगी दिली नाहीं तर व्यापार व्यवहाराला कसा खंड पडेल याचें दिग्दर्शन केलें.

आल्वुकेर्कनें पोर्तुगालच्या राजाकडे परवानगी मागितली आणि ती आल्यावर दुसऱ्यान्दां गेलेल्या शिष्टमंडळाला त्यानें नाण्याच्याबावतींत विचार करीत असल्याचें आश्वासन दिलें.

त्याच आठवड्यांत आल्वुकेर्कनें शहरांतील सराफ, व्यापारी व सुवर्णकार यांनां बोलावून आणून चालू असलेल्या जुन्या नाण्यांची तपासणी करविली आणि पोर्तुगालांत चालू असलेल्या नाण्यांशीं त्यांचा मेळ कसा बसेल हें पाहून लगेच नवीन नाणीं पाडण्याचें फर्मान काढलें.

ता. १७ फेब्रुवारी सन १५१० रोजीं पोर्तुगीज चलन गृह 'काझ द मुयेद' गोव्यांत स्थापन झालें. या चलनगृहावर ॲडमिनिस्ट्रेटर म्हणून त्रिस्ताव द येग (कित्येक जागीं यांचें नांव मिस्तांव रेयेग असें आहे.) याची नेमणूक करून सोनें, चांदी व तांबें या धातूंचीं कायदेशीर नाणीं बनवण्यास सुवर्णकारांना पाचारण केलें. हीं नाणीं सांच्यांतून तयार करावयाचीं होतीं.

ज्यावेळीं हीं पोर्तुगीज नाणीं तयार झालीं त्यावेळीं आल्वुकेर्कनें व्यापारी, जमीनदार, अधिकारी व पुढारी यांची मोठी सभा भरवून तींत नवीन नाणीं चालू केल्याची घोषणा केली. नंतर वॅडवाद्याच्या थाटांत एक मिरवणूक निघाली आणि नाक्यानाक्यांतून नाण्याचा जाहीरनामा वाचून मूठ मूठ नाणीं उधळण्यांत आलीं. याच वेळीं जुनी नाणीं टांकसाळींत देऊन बदली नवीं नेण्याचीहि लोकांना ताकीद दिली.

त्यावेळीं लोकांनीं मूळचीं नाणीं चलनगृहांत देऊन त्याच्या बदली पोर्तुगीज नाणीं घेतलीं. तथापि तीनएक महिन्यांनंतर पुन्हां आदिलशाही सत्ता सुरू झाल्यावर पुन्हां मुसलमानी नाणें सुरू झालें. ता. २५ नोव्हेंबर सन १५१० रोजीं पोर्तुगीज सत्ता पुन्हा प्रस्थापित झाल्यावर पूर्ववत फर्मान काढून पोर्तुगीज सरकारनें मुसलमानी नाणीं चलनगृहांत परत घेतलीं व यांच्या बदली नवीन दिलीं. यावेळीं सदर टांकशाळा भाटीकर नांवाच्या सुवर्णकारागिरानें ६००

हजार रेइस किंवा १२५ लिब्रें (गिनी) अशा रकमेस मक्त्यानें घेतली होती. त्यापूर्वी तिचा मक्ता एका भटकळच्या इसमाकडे होता.

गोव्यांत पोर्तुगिजांनीं सुरू केलेलीं हीं नाणीं सोन्याचीं, रुप्याचीं व तांब्याची होतीं. सोन्याच्या नाण्याला क्रुझाद किंवा मानुयेल असें नांव असून त्याच्या एका बाजूनें क्रूस व ग्लोब आणि दुसऱ्या बाजूनें दों मानुयेलचें निषाण होतें. रुप्याच्या नाण्याला येस्फेर व तांब्याच्या नाण्याला लेयाल व दिंज्यैर म्हणत.

नाण्यांचें सर्वसाधारण प्रमाण खालील प्रमाणें होतें :—

क्रुझाद (१७ बरगणी किंवा ६८० रैस. नंतरचा ४२० रैस) हें सोन्याचें नाणें होतें.

बरगणी (येस्फेर किंवा ४० रैस),

अर्धी बरगणी (अर्ध येस्फेर किंवा २० रैस) आणि **लेयाल** (तीन दि ज्यैरु) हीं नाणीं चांदीची होतीं.

दिंज्यैरु हें नाणें तांब्याचें होतें.

कोमेंतारियु द आफोंसु द आल्बुकेर्क या पुस्तकावरुन कळून येणाऱ्या सदरील नाण्यांत व गास्पार कुन्हे यांच्या लेन्दसमध्यें उल्लेख आलेल्या नाण्यांत फरक आहे. 'लेन्दस्' पुस्तकांत खालील नाण्यांचा उल्लेख आहे :—

सोन्याचें नाणें **पार्दाव** यालाच पगोडा म्हणत. याचें मूल्य ३६० रैस असे. बरगणीचें मूल्य ४० रैस व वजरूकचें मूल्य २ रैस होतें. पोर्तुगिजांपूर्वी जीं नाणीं गोव्यांत चालू होतीं त्यांच्या बरोबरीनें नवीन नाणीं पाडल्यास जनतेस सोयीचें होईल अशी मागणी जनतेची होती व तशीच आल्बुकेर्कचीहि इच्छा असल्यानें त्यानें पूर्वीच्या नाण्यांत सुधारणा करून हीं नवीन चालू केलीं असें दिसतें. पगोडापेक्षां क्रुझादचें मूल्य अधिक होतें.

सोन्याचा पगोडा (३६० रैस किंवा ९ बरगण्या), चांदीची बरगणी (४० रैस किंवा २० वजरूक), वजरूक ऊर्फ लेयाल (२ रैस किंवा ४ सेपायक) व सेपायकचें मूल्य अर्धा रैस असून तें तांब्याचें होतें.

पोर्तुगिजांनीं चलनांतून मुसलमानीं नाणीं रद्द केलीं असलीं तरी त्याच्यापूर्वींचीं विजयनगर इ. हिंदु राज्यकर्त्यांचीं नाणीं गोव्यांत सर्वत्र चालू होतीं. त्यांपैकीं वराह किंवा पगोडा व होन हीं सोन्याची आणि पनास हें चांदीचें होतें. (Historical and Arch. Skets.)

तामील राज्यांतील कार्षापण हें नाणेंहि विरळ दिसे. कांसें व शिसें अशा धातूंचें असलें नाणें रोमन साम्राज्य कालांत इजिप्त व फ्रान्स येथें सुरु होतें. (La monnaic dans l'antiquite, T. I p. 207).

क्वचित आढळणारीं इ. स. च्या दुसऱ्या शतकांतील आंध्रभृत्य यांचींहि कांसें व शिसे या धातूंची नाणीं होतीं. (Jour. B. B. A. S. 1877, p. 303).

चालुक्यांचींहि सुवर्ण, रौप्य व कांशाचीं नाणीं कित्येकाकडे होतीं. ६ व्या ते ९ व्या शतकांत शिशाकांशाचीं चालुक्यांनीं नाणीं पाडलीं होतीं (M. Jour. of Lit. S. N. S. VIII p. 220).

कदंबांचीं नाणीं देखील कित्येक ठिकाणीं दिसत असत.

गोव्यांत वसती करणाऱ्या फिरंग्यांच्या हितार्थ आल्बुकेर्क यानें सेनाद या नांवांची एक संस्था स्थापन केली होती. तिनें सरकारी हुकुमानें रॅाद नावांचें एक कल्हई व शिसें यांचें मिश्रण असलेल्या धातूचें हलकें नाणें पाडलें. हें नाणें बुद्धचक्राकार असून त्याच्या एका बाजूनें राजचिन्ह व दुसऱ्या सेंट कातारीनचें निषाण होतें.

नाण्याचें वजन १४० ग्रेन असून मूल्य अडीच बजरूक होतें. यानंतर पांच बजरूकचें रॅाद दुल, साडेसात बजरूकचें अर्ध व्हितें आणि पंधरा बजरूकचें व्हितें हीं नाणीं निघालीं.

सन १५४८ ते १५४९ या कालांत गार्सीअ द सा हा गोव्याचा गव्हर्नर होता. यानें 'सां तोमे' नांवाचें सोन्याचें नाणें चालू केलें. याचें मूल्य एक हजा रैस असून त्यावर सांतोमेचे चित्र होतें. या नाण्याला 'सतमीं' असें व्यवहारांत म्हणत.

स. १५५० ते १५५४ पर्यंत व्हिसिरै हम्हणू येथें असलेल्या आफोंस नोरोंज्य यानें चांदीचें सां तोमे नाणें चालू केलें. त्याला व्यवहारांत पाताकोंइस् असेंहि म्हणत. यांत अकरा भाग चांदी व एक भाग तांबें होतें.

सन १५५४त वसई येथें फिरंग्यांचीं पुढील नाणीं सुरू असून तीं गोव्यांतहि चालत होतीं: — पार्दाव (३०० रैस किंवा चांदीचीं ५ तांगें), चांदीचें तांग (चार फद्या किंवा ६० रैस), फद्या (१५ रैस).

कालिकत, कानानूर, सिलोन या ठिकाणीं फनांव चक्राव (२५ रैस) वगैरे फिरंगी नणीं चालू होतीं.

कोचीन येथें सोन्याचा पार्दाव (३६० रैस), शेराफीं किंवा अशर्फी (३०० रैस) व फनांव ($21\frac{3}{5}$ रैस) हीं नाणीं होतीं

दिव येथें सोन्यांचा पार्दाव (३६० रैस), चांदीची अशिरी (६० फद्या). अशीं नाणीं होतीं.

सन १५७८ सालीं फिरंग्यांनीं गोव्यांत शेराफीं (५ तांगें) हें रुप्याचें व लारीं हें तांब्याचें अशीं नाणीं सुरू केलीं. पर्शियांत सुरू झालेल्या अश्रफीवरून हें शेराफीं नाणें निघालें. याचें वजन ५० ग्रेन होतें. फिलीप सासेती हा इटालीयन प्रवासी १६ व्या शतकांत गोव्यांत प्रवास करी. तो आपल्या प्रवास वृत्तांत म्हणतो कीं — "शेराफीं हा शद्ब सराफ (Cambista) यावरून व तांग हा टंकवरून आला असावा."

लारेख हें ओर्मूजजवळचें पर्शियन गल्फमधील सात हजार लोकवस्तीचें बाराशें घरांचें बेट स. १६५७ च्या सुमारास फिरंग्यांकडे होतें. तेथें त्यांनीं फलु, दिनार, टंक, लारीं अशीं नाणीं सुरू केलीं होतीं. तींहि नाणीं गोव्यांत चालत असत. (Numismatic Chronicle, V. XVI, p. 179).

लारेख येथें जी टांकसाळ फिरंग्यांनीं सुरू केली त्या टांकसाळींतील प्रमुख कारागीर गोमंतकीय सुवर्णकार कारैकर या उपनांवाचा होता. तो कारागिरींत प्रवीण होता. गोवा येथें बाटाबाटीच्या एका प्रसंगांत सांपडला असतांना त्याला कैद केलें आणि ओर्मूजकडे जाण्याच्या अटीवर त्याला बाटविण्याच्या प्रसंगांतून वगळलें. ओर्मूजला जाऊन तो फिरंगी-अधिकाऱ्यांसोबत लारेखला पोंचला आणि तेथील टांकसाळींत काम करूं लागला. पुढें विश्वासघातानें त्याला बाटविण्यांत आलें.

सन १७२५ त गोव्यांतील नाण्यांत कांहीं फरक करण्यांत आला व पुढील चार वर्षांत कोणतेंच नाणें न निघतां स. १७२९ त जीं नाणीं निघालीं तीं नवीन स्वरूपाचीं चांदीचीं असून पुढील रुपया व अर्धा रुपयाच्या आकाराचीं होतीं. त्यांच्यावर एका बाजूनें सेंट तोमासचा क्रूस व दुसऱ्या बाजूनें राजचिन्ह

होतें.

रुपयाचें नाणें भारतांत प्रथम सुरू केलें तें शेरशहा सुरी यानें. यानें मोगल बादशहा हुमायुन याच्यावर हल्ला करून दिल्लीचें तक्त बळकावलें, त्यावेळीं त्यानें १७८ ग्रेन वजनाचें चांदीचें नवें नाणें पाडलें व त्याला रुपया हें नांव दिलें. हें जाडें व वाटोळें असून त्यावर देवनागरी लिपींत श्रीशेरशहा अशीं अक्षरें होतीं. या रुपयावर ९४९ हिजरी सन (इ. स. १५४२). होता.

राजा दों जुझे पहिला याच्या राजवटींत दों फ्रांसिस्क द आसीज ताव्होर हा व्हिसिरै स. १७५० सालीं गोव्यांत आला. तो १७५४ पर्यंत गोव्यांत होता. याच्या कारकिर्दींत 'सां तोमे' हें सुवर्णनाणें नवीन आकारांत सुरू झालें. त्याच्या एका बाजूनें क्रूस व वर्ष आणि दुसऱ्या बाजूनें राजचिन्ह असें. सन १७५२ सालीं यानें रुप्याचें नाणें पाडलें व त्याला रुपया असें नांव दिलें. त्याचें वजन १८४ ग्रेन असून त्याच्या एका बाजूस राजमुखवटा, Joseph I. R. P. अशीं अक्षरें व खालीं १७५२ सन, आणि दुसऱ्या बाजूस क्रूससह राजचिन्ह व खालीं Rupia अशीं अक्षरें होतीं. **रुपयाच्या अर्ध्या** भागाला पार्दाव **म्हणत. पार्दाव हें नांव** प्रताप नाण्यावरून **आलें. मुसलमान लोक** प्रतापला परताव व **पोर्तुगीज पार्दाव म्हणूं** लागले. असर्फी किंवा **शेराफीं व पार्दाव** यांचें मूल्य तीनशें रैस होतें. त्या खालील अर्धा पार्दाव हाहि चांदीचा होता. तांब्याचें नाणें तांग व अर्धे तांग होतें. टंक यावरून तांग नांव आलें.

सन १७७८ सालीं गोव्याचे राज्यकर्ते फिरंगी व हिंदुस्थानचे ब्रिटिश यांच्यांत विचार विनिमय होऊन पोर्तुगीज हिंदुस्थान व ब्रिटिश हिंदुस्थान यांमधील व्यापार व्यवहाराचे हिशेब व देवघेव सोयिस्कर होण्यासाठीं वजनें, मापें व नाणीं यांमध्ये समता राखण्याचें ठरलें.

गव्हर्नर जनरल फ्रांसिस्क द कुंज्य मिनेझिस् हा गोव्यांत स. १७८६ ते १७९४ पर्यंत होता. याच्या वेळीं सुवर्ण नाणें पूर्वीसारखेंच सां तोमे हें असून सनांत तेवढा बदल झाला. रुपयांत किंचित फरक पडून त्याच्या एका बाजूवर राणीचा मुखवटा असून दुसऱ्या बाजूवर Goa, Rupia व खालीं सन होता. याचें वजन १६५ ग्रेन होतें.

व्हिसिरै बेर्नार्दु जुझे मारीअ लोरेन याच्या स. १८०७ ते १८१६ पर्यंतच्या कारकिर्दींत जीं नाणीं पाडलीं त्यांत सुवर्ण नाणें पूर्वीसारखेंच सां तोमे हें असून चांदीचा रुपया मात्र नवीन आकारानें आला. याच्या एका बाजूनें राज मुखवटा, उजवीकडे रुपीअ हीं अक्षरें व खालीं सन १८०७ हें वर्ष असून दुसऱ्या बाजूनें राजचिन्ह होतें. याचें वजन २ ड्राम ४५ ग्राम होतें.

सन १८१७ ते १८२१ पर्यंतच्या व्हिसिरै दों दियोग द सौज याच्या कारकिर्दींत रुपयाच्या आकारांत फरक होऊन एका बाजूनें राजमुखवटा, गोवा, रुपीअ व स. १८१७ आणि दुसऱ्या बाजूनें क्रॉऊनसह राजचिन्ह होतें याचें वजन १७० ग्रेन होतें.

पोर्तुगीज चलन (पूर्वार्ध ३)

चौथा दों पेद्रु याच्या राजवटींत स. १८२६ सालीं गोव्यांत आलेल्या व्हिसिरै दों मानुयेल द पुर्तुगाल इ कास्तु यानें सुवर्ण, रुपें, ब्राँझ व तांबें अशा धातूंचीं नाणीं गोव्यांत; व दिव येथें तुतेनागचीं पाडलीं. सुवर्णनाणें पूर्वीसारखेंच होतें. रुपयाच्या एका बाजूनें राजमुख, डावीकडे गोअ, उजवीकडे रुपीअ व खालीं स. १८३१ आणि दुसऱ्या बाजूनें क्रॉऊ-नसह राजचिन्ह होतें. वजन १७० ग्रेन. यानें स. १८३४ त पाडलेल्या रुपयावर पुढच्या बाजूनें दोन वेलींमध्यें ६०० रैस अशीं अक्षरें व खालीं १८३४ सन होता. पाठच्या बाजूनें क्रॉऊनच्या सभोंवतीं रुपीअ द गोअ अशीं अक्षरें होतीं. तांग या ब्राँझच्या नाण्यावर एका बाजूनें क्रॉऊन व दुसऱ्या बाजूनें वेल, A P (आझिअ पुर्तुगेज) व खालीं T (तांग) अशीं अक्षरें होतीं. तांगचें वजन ९ द्राम ५५॥ ग्रेन होतें.

दुसरी दोन मारीअ राणी हिच्या राजवटींत आलेल्या व्हिसिरैनें स. १८३९ सालीं पाडलेलीं नाणीं पूर्व पद्धतीचींच होतीं. फक्त यानें पावतांग किंवा तीन रैसचें ब्राँझचें नाणें नवें पाडलें.

सन १८४४ ते १८५१ पर्यंतच्या जुझे फेन्हैर पेस्तान या व्हिसिरैच्या कारकिर्दींत त्यानें १८४५ त जीं नाणीं पाडलीं त्यांतील रुपयाच्या एका बाजूवर राणीचा मुखवटा, सभोंवतीं D. Maria. Portg Et Algarb. Regina व खालीं १८४५ सन आणि दुसऱ्या बाजूवर क्रॉऊनच्या भोंवतीं वेल व मध्यें Rupia अशीं अक्षरें होतीं. या रुपयाचें वजन १६८ ग्रेन होतें. त्याचप्रमाणें अर्धा व पाव रुपया हीं नाणीं होतीं. दहा, साडेसात, सहा व तीन रैस मुल्याचीं तांब्याचीं नवीं नाणीं यानें पाडलीं.

स. १८५५ त आलेल्या गव्हर्नर जनरल आंतोनियु सॅझर द व्हासकोंसेलुस् कुन्हैय हा स. १८५४ पर्यंत गोव्यांत होता. यानें चांदीचा रुपया, अर्धा रु. व पाव रु. पाडला. रुपयाच्या एका बाजूनें राजमुखवटा, भोंवतीं Petrus V Port. e Algarve व खालीं १९५६ हा सन आणि दुसऱ्या बाजूवर दोन वेलींत Rupia व खालीं Goa अशीं अक्षरें होतीं. यानें तांग किंवा ६० रैस चें नवें नाणें पाडलें.

पहिला दो लुईज याच्या राजवटींत जुझे फेन्हैर पेस्तान पुन्हां गोव्यांच्या व्हिसि रै पदा-वर आला. या खेपेस त्याची कारकिर्द १८६४ ते १८७० पर्यंत चालली. यानें स. १८६९ त पाडलेल्या रुपयाच्या पुढच्या बाजूवर राजाचा मुखवटा, भोंवतीं अक्षरें व खालीं सन असून मागच्या बाजूवर दोन वेलींमध्यें Rupia व खालीं Goa अशीं अक्षरें होतीं. याचें वजन १६५ ग्रेन होतें.

याच्या कारकिर्दीपूर्वी स. १८६२ सालीं १६७ ग्रेन वजनाचा ६०० रैसांचा एक रुपया गोव्याच्या चलनांत आला होता. त्याच्या एका बाजूवर दोन वेलींमध्यें वर Rupia मध्यें Goa व खालीं ६०० रैस असा मज-कूर असून दुसऱ्या बाजूवर Ludovicus. Portg. Et Algarve व खालीं 1862 असा मजकूर होता.

सन १८७० त जानुआरियु कुन्हैय द आलमैद हा गव्हर्नर जनरल गोव्यांत आला. त्यानें पाडलेल्या नाण्यांतील रुपया पूर्वीसारखाच होता. तांब्याचें तांग नाणें मात्र नवीन पद्धतीचें मुंबईच्या टांकसाळींतून पाडून आणलें. त्यावर एका बाजूनें वर क्रॉऊन, डावीकडे India, उजवीकडे Portugal, खालीं १८७१ सन आणि पाठीवर दोन वेलींत Tauga व खालीं ६० रैस अशीं अक्षरें होतीं. याचें वजन ९ द्राम ३५ ग्रेन होतें. याशिवाय अर्धे तांग (३० रैस), पाव तांग (१५ रैस) व त्याच्या खालील १०, ५ व ३ रैस अशा किंमतीचीं त्यानें नाणीं पाडून चालू केलीं.

सन १८७८ सालीं गोव्याच्या गव्हर्नर जनरलच्या जागीं कायतानु आलेशांद्री द आलमैद इ आल्बुकेर्क हा चतुर नाणक शास्त्रज्ञ आला. यानें पोर्तुगीज व इंग्रज यांच्यांत स. १८७८ सालीं झालेल्या विचाराप्रमाणें जो तह झाला होता तो १५ जानेवारी १८८० पासून अंमलांत आणला आणि त्याप्रमाणें त्यानें मागील सर्व नाणीं रद्द करून नवीन रुप्याचीं व तांब्याचीं सुधारलेल्या पद्धतीनें पाडून घेऊन चालू केलीं. पहिल्यांदा त्यानें कलकत्त्याच्या टांकसाळींत व नंतर मुंबईच्या टांकसाळींत निरनिराळीं नाणीं पाडून घेतलीं.

सदर नाण्यांपैकीं रुप्याच्या नाण्यांवर एका बाजूनें राजमुखवटा, डावीकडे Ludovicus I Portuguez Et. Algar B. Rex व मध्यें १८८१ सन आणि दुसऱ्यावर India Portugueza, मध्यें क्रॉऊन व खालीं Uma rupia इ. नाण्यांची किंमत असे. हीं नाणीं त्यानें रुपया (वजन १८० ग्रेन), अर्धा रुपया (९० ग्रेन), पाव रुपया किंवा पावली (४५ ग्रेन) व चवली (२२॥ ग्रेन) अशीं पाडलीं.

तांब्यांच्या नाण्यांत अर्धे तांग (अर्धा आणा किंवा ढब्बू वजन २०० ग्रेन), पाव तांग (एक पैसा– १०० ग्रेन), अर्धा पैसा (५० ग्रेन) व रेयाल (पै) अशीं नाणीं होतीं.

या वेळेपासून एका रुपयाला सोळा आणे (तांगें), ६४ पैसे व १९२ पै असें व्यापार व्यवहाराच्या सोयीचें हिंदुस्थानच्याप्रमाणें प्रमाण ठरविण्यांत आलें; आणि नाणींहि तिकडील टांकसाळींतूनच पाडून घेण्यांत येऊं लागलीं.

पोर्तुगाल सरकारकडून याच गव्हर्नरला गोव्यांत पहिल्यांदा नोटा चलनांत सुरु करण्याचा अधिकार प्राप्त झाला.

गोव्याच्या पहिल्या नोटा

हिंदुस्थानांत पहिल्यांदा पोर्तुगीजानींच चलनी नोटा सुरू केल्या. दिल्लीच्या सुलतानानें सन १३२७ सालीं तांब्याच्या पत्र्यावर आंकडे व अक्षरें कोरून स्वतःच्या शिक्क्याच्या कांहीं नोटा तिकडे चलनांत सुरू केल्या होत्या. पण त्याचा परिणाम ठीक न झाल्यानें व बनावटीचेहि प्रयत्न झाल्यानें पुढें लगेच त्यानें त्या बंद केल्या.

सन १६८४ सालीं फ्रान्सच्या ४०० लष्करी लोकांना देण्यासाठीं कानडा येथील गव्हर्नरला पैशांची गरज भासली; तथापि त्यावेळीं त्याच्याकडे आवश्यक रक्कम नसल्यामुळें इस्पिकमधील राजाच्या चित्राच्या पानांवर त्यानें ठराविक रक्कम लिहून त्यांच्या

खालीं आपली सही केली व ती त्यांना दिली. आणि ती रक्कम त्यांनीं खजिन्यांतून घेतली. या गोष्टीवरून नोटांची पहिली कल्पना त्याची असल्याचे पाश्चिमात्य म्हणतात. पण पुराण कालांपासून निरनिराळ्या प्रकारच्य हुंड्या वगैरेंची भारतीय प्रथा पाहतां ती कल्पना भारतीयच आहे असें वाटतें. भारतीयांची हुंड्यांची पद्धत चिनी लोकांनीं स्विकारली. चीनमध्यें तेराव्या शतकापूर्वी हुंड्यांची कल्पनाहि नव्हती.

हुंड्या वगैरेंची कल्पना कुणाचीहि असली तरी प्रत्यक्ष नोट गोव्यांत अतएव भारतांत प्रथम पोर्तुगीजांनींच आणली असें म्हणण्यास हरकत नाहीं.

पहिल्या प्रथमच्या या नोटांचा कागद जाडसर व आकार सध्याच्या नोटापेक्षां बराच मोठा होता.

ता. १ नोव्हेंबर सन १८८० रोजीं प्रथम पांच रुपयेवाल्या नोटा चलनांत सुरू झाल्या. यांना Notas de Cobre (तांब्याच्या नोटा) म्हणत. यांच्यावर पोर्तुगालच्या राजाचें नांव व मुखवटा, ईंदिअ पुर्तुगेज अक्षरें, क्रॉऊन, रक्कम रुपये तारीख व खालीं गव्हर्नरची सही असे.

त्याच सालीं डिसेंबरांत दहा रुपयेवाल्या नोटा चलनांत आल्या. त्यांना Notas de prata (रुप्याच्या नोटा) म्हणत. त्यांचें स्वरूप व आकार पांचाच्या नोटींपेक्षां जरा निराळें होतें.

पुढें २ जानेवारी १८८१ पासून २०, ५०, १०० व ५०० रुपयेवाल्या नोटा चलनांत सुरू झाल्या. यांनाहि रुप्याच्या नोटा म्हणत. रकमेप्रमाणें त्या त्या नोटांच्या आकारांतहि फरक असे.

सन १८८२मध्यें कार्लुस येवजेनियु द आलमैद नांवाचा गव्हर्नर जनरल गोव्यांत आला. पहिला गव्हर्नर दों फ्रांसिस्क आलमैद याच्यापासून हा १२८ वा गोव्याचा पोर्तुगीज गव्हर्नर होय. यानें एकंदर जुनी नाणीं रद्द करून त्यांच्या जागीं नवीं चलनांत सुरू केली. जुनीं नाणीं परत आणून त्याच्याबदली नवीं घेण्याचा यानें कायदाच केला होता.

सन १८८९ त पोर्तुगालचे राजे दो कार्लु पहिला याच्या मुखवट्याचीं नाणीं निघालीं. नाण्यांचा नमुना मागच्या प्रमाणेंच होता.

त्यानंतर गादीवर आलेला दुसरा दों मानुयेल याची कारकिर्द सन १९०८ पासून १९१० पर्यंत फक्त तीन वर्षे चालली. पोर्तुगाल देशाचा हा शेवटचा राजा नाणक शास्त्राचा अभ्यासू व राजकारणांत हुशार आणि मनाचा फार प्रेमळ होता, पण त्याच्या कोणत्याच गुणांचा फायदा प्रजेला जास्त दिवस सोडाच; पण अल्पकालहि मिळूं शकला नाहीं. कारण त्याची राजवट फार अस्वास्थ्यांतच गेली.

गादीवर येतांच त्याच्या नांवाची पहिल्यांदा जीं नाणीं निघालीं तेवढींच चलनांत सुरू होतीं. याच्या राजवटींतील गोव्याचीं नाणीं मागच्याप्रमाणेंच रुपया, अर्धा रुपया, पावली हीं रुप्याचीं आणि पाव आणा, अर्धा पैसा अशीं तांब्याची होतीं.

पोर्तुगालचा हा अखेरचा राजा असून याच्यानंतर बादशाही राजवट संपुष्टांत येऊन प्रजासत्ताक कारभार सुरू झाला.

पूर्वेकडील पोर्तुगीज टांकसाळी

गोव्याची टांकसाळ:— ता. १७ फेब्रुवारी सन १५१० रोजीं गोव्याची टांकसाळ स्थापन झाली. यांत गोव्यांतील अनेक सुवर्ण कारागिर काम करीत असत. पहिल्या प्रथम या टांकसाळींत अगदीं साध्या पद्धतीनें नाणीं तयार करीत; पण पुढें लोटलीकर उपनांवाच्या कुशल कारागिरानें ओतीव पद्धत सुरू केली व ती जास्त उपयुक्त वाटल्यानें तीच पद्धत पुढील कालांत चालू झाली.

ओतीव नाणीं तयार करण्यासाठीं मातीचे सांचे वापरीत असत. सोनें चांदी किंवा तांबें यांपैकीं ज्या धातूचीं नाणीं पाडावयाचीं त्या धातूचा रस तयार करून तो तयार ठेवलेल्या मातीच्या सांच्यांत ओतीत. हा धातूचा रस गोठला गेल्यावर मग सांचा मोडीत. आकृती उमटविण्यासाठीं गरम नाणें खालीं व वर अशा दोन ठशांत ठेऊन मग त्याच्यावर हातोडीचा फटका मारीत. हे ठसे कांशापासून बनविलेले असत.

सन १५१० सालीं सुरू झालेली ही गोव्याची टांकसाळ जुनें गोवें येथें धर्मगृह इमारतीच्या मागच्या बाजूच्या इमारतींत होती.

सदर टांकसाळ सन १५५२ सालीं किल्ल्यांत आणण्यांत आली. पुढें सन १५८९ सालीं ती पानवेल येथील दारूकारखान्याच्या इमारतींत नेली आणि नंतर कांहीं कालानें ती शहरांत आणण्यांत आली. कांहीं कारणानें पुन्हां तिला पनवेल पहावी लागली आणि कांहीं दिवसानंतर सन १९३४ सालीं ही टांकसाळ पणजी येथें नेली. आठएक वर्षानीं सन १८४२ त गोव्याची ही टांकसाळ पुन्हां जुनें गोवें येथें आणली आणि मग ती अंतापर्यंत तेथेंच राहिली.

गोव्याच्या या टांकसाळींत सोन्याची, चांदीचीं, तांब्याचीं व झिंक-जस्त या धातूंचीं नाणीं पाडण्यांत येत असत.

पुढें ता. २५ नोव्हेंबर सन १८६९ रोजीं पोर्तुगालच्या राजाच्या फर्मानानें ही टांकसाळ कायमची बंद करण्यांत आली.

दमणची टांकसाळ:— ही सन १६०९ सालीं सुरू झाली. या टांकसाळींत तांगें, अर्ध तांगें इ. तांब्याचीं नाणीं पाडीत असत. सन १७३९ त वसई मराठ्यांकडे जातांच ही बंद केली. सन १८४२ त ती पुन्हां सुरू केली पण अल्प कालच चालून ती पुन्हां बंद पडली ती कायमचीच.

दिवची टांकसाळ:— ही टांकसाळ सन १६८५ सालीं सुरू झाली होती. गोव्याच्या टांकसाळीप्रमाणें या टांकसाळींतहि सोनें, चांदी, तांबें वगैरे धातूंचीं नाणीं पाडण्यांत येत असत. ही सन १८५९ मध्यें बंद करण्यांत येऊन तिचें सर्व सामान गोव्याच्या टांकसाळींत आणलें. (Contribuições para o estudo da numismática Indo-Portugueza-Cunha).

मलाका, कोलंबो, कोचीन, वसई, चौल या ठिकाणींहि फिरंगी टांकसाळी होत्या. तथापि पहिल्या तीन ठिकाणच्या ते प्रदेश डचांकडे जातांच बंद झाल्या आणि स. १६६४ त सुरू केलेली चोलची व वसईची १७३९ त बंद करण्यांत आली. त्याच सालीं वसई मराठ्यांनीं जिंकली.

- २२ -

मराठ्यांचीं नाणीं - १

आदिलशाही सत्तेतील महाराष्ट्राचा बराच भाग शिवाजी महाराजांनीं घेतल्यावर कोंकण भागावर त्यांनीं हल्ला केला आणि कुडाळ प्रांत घेतला, त्यामुळें कुडाळचा देसाई लखम सावंत घाबरला. त्यानें लागलीच मराठयांशीं दोस्ती करून आपली देशमुखी टिकविण्या-साठीं सन १६५९ सालीं तह केला. पण कांहीं महिने गेले नाहींत तोंच तो मराठयांवर उलटला. त्यामुळें श्रीशिवाजींनीं स. १६६० च्या फेब्रुवारींत कुडाळ किल्ल्याचा ताबा घेतला.

सन १६५८ पासून कुडाळ, मणेरी, पेडणें, डिचोली, सांखळी व फोंडें हे भाग श्रीशिवाजींच्या ताब्यांत होते. पण पुढें लखम सावंत विजापुरकरास मिळून त्यानें कुडाळ किल्ला परत घेतला आणि विजापूरचा सरदार रुस्तुमजूम याला लढाईत जय मिळाल्यामुळें मराठयांकडील सदरील भाग पुन्हां आदिल-शाहींत आले.

लखम सावंताजवळ बारा हजार लोक होते व त्याला आदिलशहाचें सहाय्य होतें. तरी पण मराठयांचें त्याला भय वाटे; त्यामुळें स. १६६१ सालीं त्यानें फिरंग्यांशीं सख्य केलें आणि मराठयांनीं कुडाळवर पुन्हां हल्ला केल्यास गोव्यांत आपणास आश्रय मिळावा अशी विनंति केली.

स. १६६३ च्या जूनमध्यें श्रीशिवाजींनीं कुडाळवर पुन्हां स्वारी करून तो प्रांत घेतला. त्यामुळें लखम सावंत ६०० शिपायांनिशीं घाटाच्या आसमंतातील अरण्यांत वास्तव्य करूं लागला. आणि सांखळी डिचोली भागांतील आदिलशहाचे सुभेदार मराठयांच्या भीतीनें पळून गेले. यावेळीं फक्त फोंडें वगळून कोंकणच्या दक्षिणेकडील आदिलशहाचे सर्व प्रांत शिवाजींनीं पादाक्रांत केले.

आदिलशहांशीं विनंति करून लखम सावंतानें पुन्हां गडबड केली, व खवासखान १५ हजार फौजेनिशीं मराठयांवर चालून आला. पण मराठयांच्या माऱ्यामुळें खवास-खानाला पळतां पुरे वाट झाली. आपल्या सरदाराचा हा मोठा अपजय पाहून आदिल-शहासहि खेद वाटला. मराठयांच्या या विजयामुळें पूर्ववत सर्व भाग मराठयांकडे आला.

सन १६६६ च्या नोव्हेंबरांत आग्र्याहून आल्यावर श्रीशिवाजींनां कोंकणची सर्व बातमी समजून आली. ते रायगडला जाऊन कांहीं दिवसांनीं परत आले आणि पोर्तुगीजांकडील गोवें व आदिलशहाचें फोंडें हे भाग खेरीज करून दक्षिण कोंकणचा सर्व मुलुख त्यांनीं काबीज केला. फोंडें किल्ल्याच्या कक्षेंतील कांहीं गांवेंहि घेतलीं.

मराठयांच्या भयानें डिचोलीचे देसाई पनवेल येथें, पेडणेचे कोलवें येथें व कुडाळचे

सावंत कांदोळीं येथें फिरंगी हद्दींत गेले. फिरंगी हद्दींत आश्रयार्थ आलेल्या व पुन्हां पुन्हां आपल्या लोकांस त्रासणाऱ्या या देसा-यांनां पकडण्यासाठीं १६६७ च्या नोव्हेंबरांत श्रीशिवाजींनीं बार्देशावर हल्ला केला. तेथील कित्येक गांवें घेतलीं व १६०० लोकांस पकडून नेलें.

गोव्याच्या व्हिसिरैनें श्रीशिवाजीच्या सर्व अटी मान्य केल्यानें मग तह झाला.

स. १६७५ च्या एप्रिलमध्यें श्रीशिवाजीनें विजापुरकराचा फोंडें किल्लाहि घेतला. त्यामुळें सबंध दक्षिण कोंकण म्हणजे कुडाळ, मणेरी, पेडणें, डिचोली, सांखळी, फोंडें व जांबावली पंचमहाल हा प्रदेश मराठयांच्या सत्तेंत आला. फक्त साष्ट, बार्देस व तिसवाडी हा जुन्या काबिजादीचा भाग तेवढा फिरंग्यांकडे राहिला व सबंध नवीन काबिजादीचा प्रदेश मराठयांकडे आला.

मराठयांकडे आलेल्या प्रदेशाची राज्यव्यवस्था श्रीशिवाजींनीं नीट लावून दिली. शिवाजी महाराजांची माफी मागितल्यानें कुडाळ प्रांताची देशमुखी पुन्हां लखम सावंतास मिळाली. शरण आलेल्या इतर देसायांनांहि पूर्ववत त्यांच्या जागा दिल्या आणि नीटस कारभार सुरू झाला.

छत्रपति शिवाजी महाराज हे आतां गोमंतकाचे राज्यकर्ते झाल्यानें त्यांचीं अर्थात् मराठयांचीं नाणीं गोव्यांत सुरू झालीं. त्या शिवाय इतरहि अनेक नाणीं चालू होतीं.

रायगडावर या हिंदु सम्राटाचा राज्याभिषेक समारंभ झाल्यानंतर राज्याभिषेक शक, 'प्रतिपदचंद्ररेखेव' ही राजमुद्रा इ. जे नवीन उपक्रम सुरू झाले त्याचप्रमाणें श्रीशिवाजी महाराजांनीं आपल्या मुद्रेचीं सोन्यांचीं व तांब्याचीं नवीं नाणीं पाडण्यासहि सुरवात केली.

नाणीं पाडण्याचा अधिकार फक्त सरकारचा असून अन्य कोणी तसा प्रयत्न केल्यास तो गुन्हेगार ठरतो असा कायदा त्यावेळीं नव्हता; त्यामुळें त्यावेळीं सरकारी टांकसाळी फारशा नव्हत्या. लोक आपल्या जरूरीप्रमाणें खासगी टांकसाळींतून नाणीं पाडून घेत व हा उपद्व्याप विशेषत: सावकार लोक करीत. अशा टांकसाळी निरनिराळ्या ठिकाणीं होत्या. त्यावरून त्या त्या टांकसाळींत पाडल्या गेलेल्या नाण्यांला जुन्या कागदपत्रांतून गांवांचीं नांवें दिलेलीं आढळतात. चिंचवडी, तळेगांवीं, चांदवडी, गिरजीं, सुरती, हुकेरी, राजापुरी, बागलकोटी, बडोदी, भातवडी, इटाव, गांजीकोट, अरकाटी, वेलापुरी, फुलचरी, पांडिचरी अशा नांवांच्या नांवावरून हें स्पष्ट कळून येतें.

सदरील नांवांत इटाव हें उत्तर हिंदुस्थानांतील व पॅांडिचेरी व अर्काट हीं दक्षिणेंतील नांवें आहेत. पॅांडिचेरीस फ्रेंचांची व अर्काटला इंग्रजांची टांकसाळ असे.

छत्रपति शिवाजी महाराजांनीं रायगडावर स्वतंत्र टांकसाळ सुरू करून त्या टांकसाळींत आपलीं नवीं नाणीं पाडलीं. या टांकसाळींत पांच प्रकारचे कारागीर असून त्यांतील सुवर्णकारागीर हा मुख्य होता. सोनार, लोहार, शिक्केकरी, भातेकरी व घणकरी या पांच कारागिरांकडून नाणें तयार होई. नाणीं तयार झाल्यानंतर तीं तपासून कोषागारांत येत असत. या टांकसाळींत पाडलेल्या सोन्याच्या पहिल्या नाण्यांचें नांव 'छत्रपति' हें असून तें राज्याभिषेकाच्या कालापासूनच सुरू झालें. यांचें वजन पाव, अर्धा, पाऊण तोळा असें असून किंमतहि निरनिराळी होती. या नाण्यांच्या एका बाजूनें 'राजा शिव' अशीं अक्षरें असून दुसऱ्या बाजूनें 'छत्रपति' अशीं अक्षरें होतीं. या अक्षरांशिवाय त्या नाण्यांवर शमीपत्र, बेलपत्र, सूर्य, चंद्र, तरवार यांपैकीं एक चित्र असे. हीं नाणीं सन १६७४ सालीं पाडण्यांत आलीं.

याच्या पूर्वीं श्रीशिवाजी महाराजांनीं अन्य टांकसाळींतून आपलें पहिलें नाणें पाडून घेतलें तें सन १६६४ त. त्याचें नांव 'शिवराई' असें होतें. शिवराई होन हें नाणें सोन्याचें व अंडाकृति असून त्याच्यावर एका बाजूनें 'श्री' व दुसऱ्या बाजूनें 'शि' 'वा' अशीं अक्षरें होतीं. तांब्याच्या शिवराईचें वजन सुमारें १० मासे असून तें साधारणपणें पैशासारखें होतें.

निरनिराळ्या वेळीं निरनिराळ्या सावकारांनीं निरनिराळ्या टांकसाळींतून छत्रपति शिवाजी महाराजांच्या नांवचीं जीं नाणीं पाडून घेतलीं त्यांत अनेक प्रकारचे फरक आढळतात. नाण्यांच्या पाठी पोटावर छापलेल्या मजकुरावरूनहि पुष्कळ अंतर दिसतें.

श्रीशिवाजी महाराजांच्या होनावर व शिवराईच्या एका बाजूस 'श्रीराजा शिव' व दुसऱ्या बाजूवर 'छत्रपति किंवा श्रीराजा' असें एका बाजूला व 'छत्र' असें दुसऱ्या बाजूला लिहिलेलें आहे. नाण्याचें बारकाईनें निरीक्षण केल्यास मजकुरांत अनेक प्रकार आढळतात. कित्येक नाण्यांवर अक्षरें ऱ्हस्व तर कित्येकांवर दीर्घहि दिसतात. नाण्यांवरील मजकुरांत दिसणारे ठळक फरक असे आहेत :—

श्री राजा शिव छत्रपति

श्री राजा शिव छत्रपती

श्री राजा शीव छत्रपति

श्री राजा शीव छत्रपती

श्री राजा सिव छत्रपती

श्री राजा सीव छत्रपति

श्री राजा सीव छत्रपती

सदरील नाण्यांचा आकार ठीकठाक नसला

तरी ठशांची लिपी व मजकूर त्यांतल्या त्यांत ठीक आहे.

छत्रपति शिवाजी महाराजांचा होन आकारानें ठीकठाक असून त्याचें वजन सुमारें पाउणेतीन ते साडेतीन मासे किंवा अंदाजें ५८ ग्रेन होतें.

सोन्याची मोहोर एक तोळा दोन मासे पाउणेपांच गुंजा अशा वजनाची असे.

कित्येक जुन्या कागदपत्रांत तेरा रुपयांस मोहोर घेतली, सव्वा तीन रुपयांत होन मिळाला असे उल्लेख आढळतात, त्यावरून दिसून येतें कीं, मराठेशाहींत सोन्याची किंमत अंदाजें चौदा रुपये तोळा व चांदी एका रुपयाला साडेबारा मासे याप्रमाणें विकत मिळे.

तत्कालीन नाण्याचें रुपयाशीं खालील प्रमाणें प्रमाण दिसतें :—

होन— तीन ते साडेतीन रुपये.

मोहर— तेरा ते साडेतेरा रुपये.

पुतळी— ही वेगवेगळ्या वजनाची असल्यानें त्या त्या प्रमाणें तिची किंमत होई.

छत्रपति फल व **छत्रपति चक्र** यांचे अनेक प्रकार असून त्या मानानें त्यांची किंमत असे. ‘फलम्’ (फल) या नाण्यांचे निरनिराळे बारा प्रकार सभासद बखरींत आढळतात. फलम् नाण्याला पण असेंहि म्हणत.

श्रीशिवाजी महाराजांच्या खजिन्यांतील मोजदादींत पंचवीस लक्ष चक्र नाण्यांचा उल्लेख आहे. एका छत्रपति चक्राची किंमत दहा छत्रपति फलम् असा जुन्या पत्रांत उल्लेख आहे. सोळा छत्रपति फलम् दिले तर एक होन मिळे.

साडेतीन रुपयांचा होन असें प्रमाण धरलें तर एक फलम् म्हणजे अंदाजें साडेतीन आणे आणि एक चक्र म्हणजे अंदाजें दोन रुपये तीन आणे असा मेळ बसेल.

मराठेशाहींत विविध नाणीं चालू असलीं तरी सरकारी खजिन्यांत भरतांनां त्यांचें रूपांतर छत्रपति चक्र किंवा छत्रपति फलम् यांतच करावें लागे.

—२३—

मराठ्यांचीं नाणीं — २

छत्रपति शिवाजी महाराजांच्या निधनानंतर ता. २१-४-१६८० रोजीं संभाजी ऐवजीं राजाराम गादीवर आला. तथापि संभाजीनें त्याला कैद करून ता. १८ जून रोजीं मराठी राज्याचे अधिकार स्वतःकडे घेतले. १६ जानेवारी स. १६८१ रोजीं स्वतःला राज्याभिषेक करून घेऊन संभाजी मराठी राज्याचा पद्धतशीर राजा झाला.

पन्हाळा येथें असतांनांच फिरंग्यांकडे त्याचा मित्रत्वाचा संबंध जुळला होता. मैत्रीच्या तहासाठीं आलेले मराठ्यांचे वकिल रामोजी नाईक ठाकुर यांकडून संभाजीसाठीं फिरंग्यांनीं सुवर्णकटी बंदुक व इतर वस्तु भेटीदाखल पाठविल्या. स्नेहामुळें शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर फिरंगी गव्हर्नरनें मराठ्यांच्या प्रांतावर चढाई न करण्याची साष्टीच्या कॅप्टनला वर्दी दिली.

स. १६८१ च्या आरंभीं संभाजी डिचोली येथें असतांना अपुरीं राहिलेलीं तहाचीं बोलणीं पुरीं करण्यास त्यानें आपला वकील येसाजी गंभीरराव याला फिरंग्यांकडे पाठविलें पण त्याहि वेळीं तो तह अपुराच राहिला.

ता. १९ एप्रिल १६८२ या दिवशीं डिचोलीचा मराठ्याचा सुभेदार जिवाजी विनायक फौजेसह चोडण बेटांत प्रवेशला. तथापि फिरंगी गव्हर्नरनें त्याच्या आगळिकीबद्दल स्नेहांत फरक न येण्यासारखा ओझरताच आपल्या पत्रांतून उल्लेख केला.

सदर सालच्या डिसेंबरांत फिरंग्यांनीं आपल्या उत्तरेकडील मुलखांतून मराठी हद्दींत जाण्यास मोंगलांना वाट दिल्यानें संभाजीनें फिरंग्यांविरुद्ध लढाई पुकारली व १५ एप्रिल १६८३ रोजीं डहाणू, तारापूर, चौल यांवर हल्ला चढवला. इकडे फिरंग्यांनीं फोंडा किल्ल्यावर छापा घातला. त्यामुळें मराठे मोठ्या सैन्यानिशीं फिरंग्यांवर चाल करून आले. साष्ट, बार्देस काबीज करून एकदम गोवा बेटावर यावे असा संभाजीचा बेत होता; पण प्रचंड पुरामुळें तें न साधल्यानें त्यानें जुवें येथील किल्ल्यालाच वेढा दिला. २६ नोव्हेंबरला मोंगल सैन्य मराठी प्रदेशावर येत असल्याच्या बातमीनें त्यानें तो वेढा उठविला व फिरंग्यांच्या इच्छेप्रमाणें त्याकडे तहाची बोलणीं चालविलीं. पण तींहि पुरी न झाल्यानें मोंगल येण्यापूर्वींच तिसवाडी, साष्ट, बार्देस हस्तगत करण्याचा संभाजीचा विचार झाला.

त्याप्रमाणें स. १६८३ च्या डिसेंबरांत मराठ्यांचें सैन्य साष्टींत घुसून तो सर्व प्रांत काबीज केला. बार्देस व तिसवाडीवरहि हल्ला केला. साष्टींतील रायतुरचा किल्ला, बार्देसचे आग्वाद व रेइजमाग किल्ले आणि गोवा बेटांतील मुख्य भाग इतकेंच फिरंग्यांकडे राहिलें. अखेरीस बार्देसचे किल्ले घेऊन मराठ्यांनीं रायतुरच्या किल्ल्यास वेढा दिला आणि आतां गोवें बेटहि मराठ्यांच्या ताब्यांत जाणार हें पाहून फिरंगी व्हिसि रै कोंदि द आल्व्होर यानें घाबरून तडकाफडकी सँ. झेव्हियरची शव पेटी उघडून

त्याच्या हातांत आपला राजदंड दिला व गोव्याचें रक्षण करण्याची प्रार्थना केली.

इकडे फिरंग्यांचीं तहाचीं बोलणींहि सुरू होतींच. त्याप्रमाणे ७ जाने. १६८४ रोजीं भीमगड येथें तहाचा आराखडा तयार होऊन पक्का तह फोंडें येथें लिहिण्यांत आला. तहाचा करारनामा लिहिल्यानंतर मराठ्यांनीं रायतूर किल्ल्याचा वेढा उठवून साष्ट व बार्देस मधूनहि आपलें सैन्य बाहेर काढलें.

संभाजीच्या गोव्यावरील स्वारीचा दरारा फिरंगी सरकार व ख्रिस्ती लोक यांच्यावर इतका मोठा बसला कीं, मराठ्यांचें नांव ऐकलें म्हणजे घाबरून त्यांना दरदरून घाम सुटूं लागला. ख्रिस्ती लोकांनीं या स्वारीला 'व्हडलें राजीक' म्हणजे मोठी स्वारी असें नांव दिलें.

पुढें संभाजीच्या दरबारांत फिरंग्यांनीं आपला वकील पाठविण्याचें ठरवून पाद्रि फ्रे आंतोनियु द सा जोजेफ याची त्या जागीं नेमणूक केली. त्याच्या सोबत रामकृष्ण नाईक बरवे हाहि होता.

यानंतर संगमेश्वर येथें बेसावध स्थितींत मोंगल सेनापतीकडून पकडला जाऊन ११ मार्च १६८९ रोजीं संभाजीचा कठोरपणें अंत झाला.

छत्रपति संभाजींचें आरंभापासून अखेर पर्यंतचें सारेंच जीवन गडबडींत गेल्यानें त्याला आपल्या नांवचें स्वतंत्र नाणें पाडण्याची संधि मिळाली नाहीं असें दिसून येतें.

संभाजीच्या निधनानंतर औरंगजेबानें मराठ्यांवर सारखा मारा चालविला आणि मराठी प्रदेश घेत घेत तो पुढें सरकला. राज्याचा मालक संभाजीचा अल्पवयीं मुलगा व त्याची आई येसूबाई रायगडावर असून राजारामहि तेथेंच कैदेंत होता. मराठी राजकारणी सरदारांच्या बैठकींत पुढील कारभाराचीं बोलणीं होऊन येसूबाईनें शाहूसह रायगडावर रहावें व राजारामानें रायगड व विशाळगड यामध्यें फिरतें रहावें असें ठरलें.

तथापि मोंगलांनीं संधि साधून एके दिवशीं रायगडास वेढा दिला. कित्येक महिनेपर्यंत गडावरील लोकांनीं त्यांना दाद दिली नाहीं पण घरभेदी सूर्याजी पिसाळानें त्यांचा किल्ल्यांत प्रवेश होऊं दिला आणि येसूबाई व शाहू मोंगलांच्या कैदेंत सांपडली.

महाराष्ट्रांत मोंगलांचा जोर असल्यानें राजारामानें कर्नाटकांत जिंजी येथें जावें व महाराष्ट्रांतील कारभार रामचंद्रपंत अमात्य यानें पहावा असें ठरलें व त्याप्रमाणें राजाराम जिंजीस जाण्यास निघाला. त्याला पकडण्यासाठीं मोंगली फर्मानें सुटलींच होती. गोव्याच्या फिरंगी सरकारलाहि त्याबद्दल पत्र आलें. तथापि मोंगलांची खटपट फुकट जाऊन राजाराम सुरक्षित जिंजीस पोंचला आणि तेथें त्यानें अष्टप्रधानांच्या नेमणूका करुन मराठी कारभार सुरू केला.

राजारामाचा कारभार जिंजीला सुरू झाल्यावर मोंगलांचें बरेंच सैन्य कोंकणांतून माघारीं गेलें, त्यामुळें मोंगलाविरुद्ध लढण्यास इकडील मराठ्यांना जोम आला व मणेरी, सांखळी, फोंडें, चंद्रवाडी येथील देसाई मराठ्यांच्या सैन्यांत सामील झाले. यावेळीं फिरं-

ग्यांचें राजकारण मात्र दुटप्पी होतें. एकीकडून मोंगलांशीं स्नेह दाखवावयाचा व दुसरीकडून मराठ्यांशीं मैत्री टिकवावयाची. तथापि फिरंग्यांची ही कृत्रिमता मराठी मुत्सद्यांच्या लक्षांत येऊन फिरंग्याकडे त्यांची दृष्टि वक्र होतीच.

जिंजीहून परत आल्यावर रामचंद्रपंताच्या सल्ल्यानें राजारामानें सातारा येथें मराठी राज्याची राजधानी थाटली आणि शाहूचा प्रतिनिधि म्हणून राज्यकारभार चालविला.

यांनंतर ता. २ मार्च सन १७०० रोजीं एका असाध्य आजारानें राजारामाचा अंत झाला. राजाराम स्वभावानें शांत, राजकारण कुशल व करारी वृत्तीचा होता. याच्या मृत्यूनंतर दोन वर्षेंपर्यंत मराठे व फिरंगी यांचे संबंध मैत्रीचे होते.

मराठ्यांच्या नाण्यांत छत्रपति श्रीशिवाजी महाराजांच्या नाण्यानंतर राजारामाचें नाणें दिसून येतें. हें नाणें त्याच्या राज्याभिषेक कालीन असावीं. त्याच्या उपलब्ध नाण्यावर शक दिसत नाहीं. या नाण्याचें वजन ७.९४ असून आकार २.०२ असा आहे. बिंदुमय कड्यांत एका बाजूस पुढील अक्षरें एकाखालीं दुसरें अशीं उभीं आहेत—‘श्री राजा राम’ दुसऱ्या बाजूनें ‘छत्र पति’ अशीं अक्षरें आहेत. हें नाणें भारत इतिहास संशोधक मंडळाच्या नाण्याच्या संग्रहांत आहे.

राजारामाच्या मृत्यूनंतर, राज्याचा खरा वारस शाहू मुक्त होऊन परत येईपर्यंत कारभार मंत्रिमंडळाने चालवावा असें ठरलें असतां ताराबाईनें आपला पुत्र शिवाजी याला गादीवर बसवलें. तथापि शाहू मुक्त होऊन आल्यावर त्याचा सलोख्याचा निरोप तिनें धिःकारल्यानें साताऱ्यावर हल्ला करून शाहूनें राजधानी हस्तगत केली व स्वतःस पद्धतशीर राज्याभिषेक करून घेतला.

सातारा शाहूच्या ताब्यांत गेल्यावर ताराबाईनें कोल्हापूरला नवीन गादी स्थापन केली व तेथें शिवाजीला राज्याभिषेक केला.

सन १७१३ सालीं बाळाजी विश्वनाथ याला शाहूनें आपले पेशवे नेमले आणि त्याच्या मतानें इतर प्रधानांच्या नेमणुका केल्या. पुढें पंतप्रधान पेशवे यांनीं आपली राजधानी पुणें येथें करून मराठी राज्याची मोठी भरभराट केली.

साताऱ्याच्या गादीवर शाहूनंतर रामराजा, दुसरा शाहू, प्रतापसिंह, शहाजी असे राजे आले, पण मुख्य कारभार पेशव्यांकडेच असल्यानें ते राजे नुसते नांवाचेच होते.

पेशवाईचा मूळ पुरुष बाळाजी विश्वनाथ हा सन १६९९ सालीं मराठेशाहींत प्रवेशला. यानंतर १७२० सालीं पेशवाईच्या गादीवर बाजीराव आला. या पहिल्या बाजीरावानंतर बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब, माधवराव, नारायणराव, सवाई माधवराव, दुसरा बाजीराव असे पेशवे होऊन गेले.

पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ याच्या कारकिर्दींत उत्तरेकडील महत्वाच्या राजकारणामुळें फिरंग्यांशीं लक्ष देण्यास सवड नव्हती; पण पुढें दुसरे पेशवे पहिले बाजीराव याच्या आमदनींत उभयतांत हालचाली सुरु झाल्या.

सन १७३७ मध्यें उत्तर कोंकणांत पेशव्यांनीं फिरंग्यांशीं लढाई सुरू केली आणि गोव्यांतून जाणारी रसद तोडण्यासाठीं गोव्यावरहि हल्ला केला.

मराठ्यांचे सैन्य दिगी घाटांतून उतरून पारोडेच्या बाजूनें ता. २३ जानेवारी १७३९ रोजीं रात्रीं साष्टींत शिरले, आणि ता. २६ रोजीं मडगांव घेऊन त्यानीं साष्टीवर आपला अंमल बसवला. रायतूर व मुरगांव हे दोन किल्ले फक्त फिरंग्यांकडे राहिले. मार्चच्या ५ तारखेस तिकडून बार्देसवर हल्ला केला. प्रथम थियेचा किल्ला घेऊन मग त्यांनीं सर्व बार्देस व्यापले, आग्वाद व रेइजमाग हे दोनच किल्ले फिरंग्यांकडे राहिले.

आतां राजधानीवर हल्ला करून मराठे गोवें (तिसवाडी) काबीज केल्यावांचून राहणार नाहींत या विचाराने फिरंग्यांनीं मोठ्या घाईनें आपली संपत्ति व बायका मुलें यांना मुरगांव किल्ल्यांत पाठवून दिलें.

फिरंगी व्हिसिरै यानें तडकाफडकी तहाची विनंति केली तहाची बोलणीं सुरू झालीं. दुसरीकडून सरदार नरगुंदकर यांना लांच देऊन कार्यभाग साधण्याचा डाव सुरू झाला.

ता. २ मे १७३९ रोजीं उभयपक्षीं तह होऊन सात लाख रुपये फिरंग्यांनीं मराठ्यांस द्यावे या अटीवर तह होऊन मराठ्यांनीं साष्ट व बार्देस हे प्रांत फिरंग्यांच्या स्वाधीन केले.

तहांतील कलमाप्रमाणें दिवाणी वसुलांतील ४० टक्के रक्कम पेशव्यांस देण्याची अट फिरंग्यांनीं न पाळल्यानें पेशव्यांचे सरदार गोविंदपंत ठाकुर यानें पुन्हां फिरंगी प्रदेशावर हल्ला केला. एक पंधरवडा साष्टींत करवसुली करून सांगें येथें जाऊन त्यानें तेथील किल्ल्यास वेढा दिला. लगेच फोंडें किल्लाहि घेतला. पण लगेच फिरंग्यांनीं ते मुक्त करून सांग्याचा मोडून टाकला व फोंडें किल्ला पूर्ववत सौंदेकरांच्या स्वाधीन केला.

दुसरीकडील महत्वाच्या कामगिरीमुळें पेशव्यांना फिरंग्यांशीं लढत बसण्यास सवड नव्हती. पुढें स. १७५६ सालीं खंडणीच्या थकबाकीसाठीं फोंड्याचा किल्ला सौंदेकरांनीं पेशव्यांकडे गहाण ठेवला. पण पुन्हां १७६३ त फिरंग्यांनीं तो परत घेतला. पेशवाई फौजेनें तो काबीज करण्याची पुन्हां तयारी चालविली. फिरंग्यांनीं हें पाहून अनेक मध्यस्था व अखेरीस माधवराव पेशव्यांचे डॉक्टर पाद्री फ्रेइ लेयांद्र याला सांगून फिरंग्यांवर हल्ला करूं नये असें पेशव्यांचें आज्ञापत्र त्याच्या सरदारास आणलें. अशा रीतीनें हल्ल्याचा बेत रहित झाला.

माधवराव पेशवे आजारी असतांना अनेक वैद्यांचे औषधोपचार केले, पण गुण मिळाला नाहीं. अशा वेळीं फिरंगी सरकाराकडील सदरील पाद्री डॉक्टरची माहिती मिळून पेशवे सरकारनें त्याला फिरंगी सरकारकडून मागणी करून पुण्यास नेलें होतें. या डॉक्टरच्या औषधानें गुण दिसूं लागल्यानें त्याच्यावर माधवरावाची बहाल मर्जी होती.

मराठ्यांचीं नाणीं—३

मराठ्यांच्या सातारा येथील गादीचे सत्ताधीश छत्रपति श्रीशाहू, यांच्या राज्याभिषेकाच्या वेळीं त्यांच्या नांवचीं नाणीं पाडण्यांत येणें साहजिक होतें. तथापि तीं पाडण्यांत आलेलीं कुठें दिसत नाहींत किंवा त्यांचा उल्लेखहि आढळत नाहीं: शाहूनंतरचे साताऱ्याचे राजे रामराजा, दुसरा शाहू यांची नाणीं तर निघालींच नाहींत. त्यांच्या नंतरचे प्रतापसिंह किंवा शहाजी हे तर कंपनी सरकारचे मांडलिक बनले होते.

छत्रपति श्रीशिवाजी महाराज व छत्रपति राजाराम अशा मराठेशाहींतील दोघां राज्यकर्त्यांनंतर उपलब्ध असलेलीं मराठी नाणीं म्हणजे पेशव्यांचीं. शिवाजी महाराजांचीं सोन्याचीं, रुप्याचीं व तांब्याचीं नाणीं असलीं तरी त्यांचीं तांब्याचींच नाणीं विशेष उपलब्ध आहेत. तीं म्हणजे शिवराया. त्यांचीं सोन्याचीं नाणीं पहिल्या प्रथम वेस्टर्न सर्कलच्या आर्किऑलॉजीच्या खात्यानें लोकांपुढें आणलीं. या सर्कलच्या १९१८–१९ च्या प्रोग्रेस रिपोर्टांत शिवाजीच्या होनांची ठीक माहिती आली आहे.

पेशवाईत कित्येक ठिकाणीं टांकसाळी होत्या. त्यांच्या स्वतःच्या हुकमतीखालीं ज्या टांकसाळी होत्या त्यांत पाडल्या गेलेल्या नाण्यांत निरनिराळे चार प्रकार दिसून येतात. मुहियाबाद पूनह असें टांकसाळीचें नांव असलेला एक प्रकार असून त्यांतहि एका नाण्यावर दोन्ही बाजूंस फारसी अक्षरें व दुसऱ्या फारसीबरोबर १२३२, १२४२ असा नागरी आंकडा. या दुसऱ्या नाण्याची म्हणजे रुपयांची घडण व अक्षरवाटिका अगदींच सामान्य असल्यानें हे दोन्हीं रुपये पेशव्यांच्या राजधानींत खुद्द पुण्यांत पेशव्यांच्या टांकसाळींत पाडले गेले कीं, दुसरे दुसरीकडे पाडण्यांत आले याबद्दलचा प्रश्न उभा राहातो. आणि बारकाईनें पाहिल्यास दुसऱ्या जातीचे रुपये, दुसऱ्याच टांकसाळींत पाडण्यांत आल्याचें दिसतें.

सदरील पहिल्या प्रकारांतील पहिल्या जातीच्या रुपयाचें वजन ११.१५० असून आकार २.१५ आहे.

दुसऱ्या प्रकारच्या रुपयाचें वजन ११.२०८ असून, आकार २.२० आहे. याच्या एका बाजूच्या कड्यांत नागरी लिपींत 'श्रीगणपती' व फारसी लिपींत 'आलम बहादर शाह बादशाह गाझी १२२' असा मजकूर असून दुसऱ्या बाजूस नागरी लिपींत कड्यांत 'श्री पंतप्रधान' व फारशी लिपींत 'मैमनत सनह ४—जुलूस मानूस जरब' अशीं अक्षरें आहेत. या जातीच्या नाण्याचें वर्णन वेस्टर्न सर्कलच्या आर्किऑलॉजीच्या सन १९१८–१९ सालच्या रिपोर्टांत आहे.

पेशवाईच्या नाण्याचा तिसरा प्रकार चांदवडी रुपयांचा. या नाण्यांवर फारसी अक्षरें असून टांकसाळीचें नांव चांदोर असें आहे. वाई किंवा बागलकोट येथील 'अंकुश'

नांवाच्या टांकसाळींत पाडलेलीं चौथ्या प्रकारचीं नाणीं होतीं त्यांना अंकुशी नाणीं म्हणत. यांपैकीं कित्येक निव्वळ फारसी अक्षरांचीं व कित्येकांच्या पाठीवर फारसी मजकुराशिवाय नागरी लिपींत १२३१ व कित्येकांवर १२३३ असा आंकडा दिसतो. याशिवाय आणखी एक नाणें असून त्याच्या पोटाच्या बाजूवर 'आलम गाझी बाद्शाह द–दीन सिक्कह' असा फारसी मजकूर असून इंग्रजींत १८१९ असा आंकडा आहे. पाठीवर 'मैमनत मा ूस' अशीं फारसी अक्षरें आहेत. सदरील रुपयांशिवाय पेशवाईतील जीं तांब्याचीं नाणीं उपलब्ध आहेत तीं श्रीशिवाजी महाराजांच्या शिवराई पैशांसारखींच असून त्यांच्यावर १२३४ व कित्येकांवर १२४४ असा नागरी लिपींतील आंकडा व फारसी मजकूर दिसतो.

पेशवाईतील सोन्याचीं नाणीं उपलब्ध नाहींत आणि सोन्याच्या नाण्यांचा उल्लेखहि कोठें आढळत नाहीं, त्यावरून पेशव्यांची सोन्याचीं नाणीं नव्हतीं कीं काय असा संशय येतो. तथापि रामचंद्र नाईक नांवाच्या एका सावकारानें नाणीं पाडून घेण्यासाठीं परवानगी मागितलेल्या एका अर्जावर "सोन्याचीं नाणीं दरबारनेंच पाडावयाचीं असल्यानें परवानगी देतां येत नाहीं" असा शेरा असल्यानें दरबार सोन्याचीं नाणीं पाडित असणें शक्य आहे.

थोरले माधवराव पेशवे यांच्या कारकिर्दींत पुण्यांत सदाशिव नाईक, विष्णु महादेव गद्रे, रामचंद्र नाईक वगैरे मोठमोठे सावकार होते. ते आपल्या पेढ्यांवर रुपयांच्या तोड्यांचे घट लावून ठेवीत. रुपये ठिक्यांत भरलेले असून वेगवेगळ्या शिक्यांच्या रुपयांच्या वेगवेगळ्या ठिक्या असत. त्यांतील रुपये उपसण्यास रुप्याचींच खोरीं असत. हे रुपये कित्येक वेळां ते स्वत: टांकसाळींतून पाडून घेत, असें दिसतें.

सावकारांनीं पेशवे दरबारला वेळोवेळीं कर्जेंहि दिलेलीं होतीं. एकदां रामचंद्र नाईक परांजपे सावकारानें दरबारची एक कोट रुपयांची जामीनकी घेतली. त्या इसमानें नाईकाकडे अकस्मात् रुपये मागण्यास पाठविले. त्यावेळीं त्यानें "कोणत्या शिक्याचे रुपये पाहिजेत हें कळवा म्हणजें पाठवूं. कारण येथें अनेक शिक्के चालत आहेत" असा निरोप पाठविला. आणि चालू शिक्याचे मागतांच ते रुपये लागलेच देऊन टाकले.

पेशवे दरबारांत रामचंद्र नाईक सावकाराचें वजन मोठें होतें. आणि त्याची दरबारबद्दल निष्ठाहि तशीच होती. नाईक म्हणजें मुख्य, विशिष्ट दर्जाच्या सावकारास लावली जाणारी मोठेपणाची पेशवेकालीन पदवी होय.

पेशव्यांप्रमाणेंच पेशव्यांचे सरदार शिंदे, होळकर, गायकवाड यांचींहि नाणीं उपलब्ध आहेत. त्यांच्या नाण्यांवरहि बिंदुयुक्त कड्यांत शाह आलम सिक्कह मुबारक इंदूर, ग्वाल्हेर, बडोदें अशीं अक्षरें दिसतात.

पेशवे, शिंदे, होळकर वगैरेंची नाणीं मोंगल बादशहाच्या नांवानें पाडलेलीं दिसतात हें मात्र मोठें आश्चर्य आहे. मोंगल बादशहाविषयीं मराठ्यांच्या मनांत कोणत्या भावना वसत होत्या व कां याचा मात्र पत्ता लागत नाहीं !

दिल्लीहून मोंगल बादशहाकडून स्वराज्याच्या सनदा आणणें व महादजी शिंद्यांनीं बादशहाकडून पाठविलेल्या वस्त्रांचा पेशव्यानें मोठ्या अभिमानानें स्वीकार करणें यांत मोंगलांच्या सार्वभौमत्वाचा अभिमान दिसून येतो.

शिवाजी महाराजांनीं मराठ्यांच्या स्वतंत्र राज्याची स्थापना केली. स्वातंत्र्याच्या सळसळत्या रक्ताच्या मराठा वीरांच्या अपूर्व शौर्यानें महाराष्ट्राचें वैभवसंपन्न साम्राज्य महाराजांनीं उदयाला आणलें, आणि स्वातंत्र्य निदर्शक मराठी नाणीं पाडलीं. पेशव्यांनीं व त्यांच्या शिंदे, होळकर सारख्या शूर सरदारांनीं मराठ्यांचा भगवा झेंडा उत्तरेकडे फडकावला आणि मराठी साम्राज्य हिंदुस्थानभर पसरविण्या ी मोठी आकांक्षा धरली. तथापि त्यांनीं आपलीं स्वतंत्र नाणीं पाडून मराठ्यांच्या स्वतंत्र सत्तेचें अस्तित्व दाखवूं नये हेंच मोठें नवल आहे. त्यांचा समज काय होता कळत नाहीं. नाणीं हें एक स्वतंत्र राज्याचें स्वातंत्र्य निदर्शक िन्ह आहे असें त्यांना कसें वाटलें नाहीं ?

पेशवे, शिंदे, होळकर, भोसले वगैरे सरदार एकाच मराठी साम्राज्याचे पुरस्कर्ते व ऋणानुबंधी असतांना त्यांच्या नाण्यांवर तसें चिन्ह कां असूं नये ? मोठी मेहेरबानी हीच कीं, त्यांनीं कुलदेवतेचें नांव किंवा कुलाचें चिन्ह तरी नाण्यांवर घालण्याची व्यवस्था केली. कांहीं नाण्यांवर तरवार, कांहीं नाण्यांवर नंदी व कांहीं आडव्या शिवलिंगाचीं दिसतात. तथापि सगळ्यांवर एका बाजूनें बादशहाचें नांव आहेच.

पेशव्यांच्या चांदवडी रुपयाचें एक नाणें फोंडें येथें एका मुल्लाजवळ होतें व तें गोमंतकांत फोंडें येथें असतांना इ. सं. आपटे यांनीं घेऊन आपल्याकडे ठेवलें होतें. त्या नाण्यांवर एका बाजूला फारसी मजकूर व दुसऱ्या बाजूला 'पंतप्रधान' हीं अक्षरें असून टांकसाळीचें नांव 'चांदोर' असें होतें. खालीं 'बाणमुख' होतें. हें टांकसाळीचें चिन्ह समजण्यांत येई.

पानपतवर मराठ्यांचा पराभव झाला हें ऐकून हैदरअल्लीस राक्षसी हांव उत्पन्न झाली व त्यानें आपल्या राज्याची सरहद्द चौफेर वाढविण्यास सुरवात केली. बिदनूरचा किल्ला घेऊन होनावर बंदर ताब्यांत घेतलें आणि बिद ूरच्या वायव्येस असलेलें सोंदे संस्थानहि घेतलें. तुंगभद्रा ही त्याच्या राज्याची सरहद्द; पण त्यानें ती नदी उतरून उत्तरेला कृष्णा नदीपर्यंत हल्ले करून मराठ्यांचा कांहीं मुलुख घेतला. त्यामुळें मराठ्यांचें वार्षिक पन्नास लाखांचे उत्पन्न तुटलें.

ही बातमी कळतांच माधवराव पेशव्यानें

हैदरावर स्वारी करण्याच्या तयारीनें सैन्य पाठविलें. या युद्धांत हैदर जेरीस येऊन त्यानें तहाची याचना केली. या तहांत तुंगभद्रेच्या उत्तरेचा मुलुख देऊन हैदरनें मराठ्यांना तीस लाख रुपये खंडणी द्यावी असें ठरलें. ही खंडणी मराठी नाण्यांत द्यावयाची होती; तथापि कमतरतेमुळें त्यांत थोडीं नाणीं म्हैसुरी घालावीं लागलीं. हीं नाणीं हैदरचीं असून सोन्याचीं होतीं. त्यांच्यावर हैदरचें नांव व मुसलमानी सन होता.

म्हैसुरी नाण्यांत टिपूपासून विशेष सुधारणा झाली. त्यानें आपल्या नाण्यांवर मव्लूदी काल सुरु केला. या सनाचे आंकडे त्यानें फारसी अक्षरांप्रमाणें उजवीकडून डावीकडे लिहिण्याची प्रथा पाडली. आपल्या राज्यारोणाचें वर्ष आंकड्यांत न सांगतां अरबी अक्षरांनीं दाखविण्याचा प्रघात त्यानें सुरू केला. त्याच्या एका नाण्याच्या पोटच्या बाजूस 'सारा सनह ६१२१' अशीं अक्षरें आहेत. यांपैकीं सारा हें मव्लूदी १२१६ या वर्षाशीं जुळणाऱ्या संवत्सराचें नांव असून ६१२१ हा आंकडा १२१६ ही संख्या दर्शवीत आहे. याच्या पाठीवरील 'सख' हा शब्द टिपू गादीवर आलेल्या संवत्सराचा असून 'बहारी' हें त्या महिन्याचें नांव आहे.

सदरील नाण्याचें वजन ११.२६५ असून आकार २.५१ व काल १२१६ आहे. हें श्रीरंगपट्टनहून निघालें. याच्या पुढच्या बाजूनें विंदुमय दुहेरी कड्यांत 'मुहम्मद अहमद दीन दर जहान अस्त रोशन झ फतह हैदर इमामी जर्ब प. सा. सनह ६१२१' अशीं अक्षरें असून पाठीवर 'हुव अस–सुल्तान अल–व हीद अल–आदिल ता. जु. सा. सनह सी सूयम बहारी ६ स. जुलू' अशीं आहेत. १२१६ च्या त्याच्या तांब्याच्या नाण्यावर सव्यमुख ऊर्ध्वपुच्छ हत्ती व त्यावर १२१६ सन पुढच्या बाजूनें, व मागच्या बन्गलूर जर्ब अशीं अक्षरें आहेत. याचें वजन २.७१ व आकार २.३२ आहे. टिपूचीं अशीं दुसरीं निरनिराळीं नाणीं उपलब्ध आहेत.

टिपूनें सुवर्ण नाणेंहि पाडलें होतें. श्रीरंगपट्टण येथें त्याची स्वतंत्र टांकसाळ होती.

-२५-

मोंगली चलन

मराठ्यांच्या कोंकण प्रदेशावर चाल करून आलेलें मोंगल सैन्य ता. १५ जानेवारी सन १६८४ रोजीं डिचोली येथें पोंचलें. या सैन्याचा सेनापति बादशहाचा मुलगा शहा आलम हा होता. सैन्यांत ४० हजार घोडेस्वार, ६० हजार पायदळ, १९०० हत्ती आणि २० हजार उंट होते. मोंगल सैन्य डिचोलीला येतांच त्यानें पहिल्या प्रथम तेथील छत्रपति संभाजीचा वाडा लुटला, व इतरहि बरीच नासाडी केली.

सैन्य बरेंच असलें, तरी मराठ्यांशीं दोन हात करणें सोपें नाहीं असें वाटून अवरंगजेबानें शहा आलमला मराठ्यांचा प्रदेश गनिमी काव्यानें घातकीपणानें घेण्यास पुन्हां पुन्हां बजावून सांगितलें होतें आणि बापाच्या आज्ञेबरहुकूम शहा आलमनें त्याच पद्धतीनें डिचोलीकडील प्रदेश घेतला.

पुढें ता. ४ डिसेंबर १६८८ रोजीं मोंगलांनीं फोंडें किल्ला घेऊन इकडील प्रदेशावर आपला हक्क प्रस्थापित केला.

सन १६७५ च्या मे महिन्यांत श्रीशिवाजी महाराजांनीं आदिलशहा विजापुरकर याकडून फोंडें किल्ला घेतला होता, व त्या प्रांतावर त्रिंबक पंडिताची सुबेदार म्हणून नेमणूक केली होती. त्यानंतर धर्माजी नागनाथ त्या जागेवर आला. तो ४ डिसेंबर १६८८ पर्यंत मोंगली सुभेदार येईपर्यंत होता. मोंगलांच्या अमदनींत तेथें सुबेदार म्हणून सरबाजखान याची नेमणूक झाली.

अशा रीतीनें मोंगल हे गोमंतकाचे नवीन काबिजादीकडील प्रदेशाचे राज्यकर्ते झाले.

बाबर हा दिल्लीच्या मोंगल सिंहासनावर बसणारा पहिला राजा असून तो मूळचा काबूलचा होता. याचा काल सन १५२७ ते १५३० आहे. याच्यानंतरच्या कालांत सिंहासनावर हुमायुन, अकबर, जहांगीर, शहाजहान, औरंगजेब, बहादूरशहा, सय्यदबंधु, महमदशहा, अहमदशहा, अलमगीर, शहा आलम, अकबरशहा व दुसरा बहादुरशहा असे चौदा राजे येऊन गेले. स. १८५७ त मोंगली सत्ता नष्ट झाली.

सन १५७२ त मोंगलांचा महाराष्ट्राशीं पहिला संबंध आला. आजचा कुलाबा जिल्हा व कल्याण, भिवंडी हा भाग निजामशहाकडे होता, तो घेऊन पुढें एका तहांत त्यानें विजापुरकरास दिला. निजामशहाच्या वेळीं त्याला निजामशाही कोंकण म्हणत.

मोंगली सत्तेच्या वेळीं इकडे बरींच जुनीं नाणीं चालत असत. त्याचप्रमाणें आसपासच्या राज्यकर्त्यांचींहि चालू होतीं. मोंगलांच्या सत्तेस आरंभ झाल्यावर कांहीं दिवसांनीं त्यांचींहि नाणीं इकडे आलीं. इकडील देवालयांतून दिसणाऱ्या अकबरी मोहरा मोंगलांच्याच आहेत.

मोंगलांचीं जीं नाणीं उपलब्ध झालीं आहेत त्यांत कांहीं सामान्य अशीं आणि कांहीं नीटस आहेत. जीं व्यवस्थित आहेत तीं फ्रेंच, इंग्रज यांनीं पाडलेलीं व इतर मोंगलांनीं आपल्या टांकसाळींत पाडलेलीं.

स. १६९६ च्या सुमारास डिचोली येथें मोंगलांची एक टांकसाळ असून तींत रुप्याचीं नाणीं पाडीत. (L. das moções no. 60, pg. 129).

प्राचीन कालीं भारतांत ग्रीक लोकांनीं जशीं सुबक व रेखीव नाणीं पाडलीं तशींच फ्रेंच व इंग्रज कंपन्यांनीं मोंगलांच्या नांवानें पाडलेलीं नाणीं जास्त सुबक, रेखीव व उठावदार आहेत.

ज्या टांकसाळी मोंगलांच्या प्रत्यक्ष देखरेखीखालीं नव्हत्या किंवा अयोध्येचे नबाब, इंग्लिश व फ्रेंच कंपन्या, मराठे सरदार यांच्या ताब्यांत होत्या, त्या टांकसाळींत पाडलेल्या नाण्यांवरील जुलूस सनाचे व हिजरी सनाचे आंकडे बरोबर जुळत नाहींत.

मुर्शिदाबादच्या इंग्रजांच्या टांकसाळींत पाडलेल्या एका नाण्यांवर हिजरी सन १२०२ आहे व जुलूस १९ आहे. मुहम्मदाबाद—बनारसच्या इंग्रजांच्या टांकसाळींतील हिजरी सन १२२२ च्या एका नाण्यांवर १७ व ४९ जुलूस आहे. सुरतच्या इंग्लिश टांकसाळींत पाडल्या गेलेल्या एका नाण्यावर हिजरी सन १२१५ व जुलूस ४६ आहे.

त्याचप्रमाणें अर्कोट येथील फ्रेंच टांकसाळींत पाडण्यांत आलेल्या एका नाण्यावर १२२१ हिजरी सन असून जुलूस ४३ आहे. शाह आलम हिजरी सन ११७३ त गादीवर आल्यानें जुलूस १९ ला ११९१-९२, जुलूस ४९ ला १२२०-२१, जु. ४६ ला १२१८-१९ व जु. ४३ ला १२१५-१६ अशीं वर्षें येतात. त्यावरून सदरील कालाचे उल्लेख जुळते नाहींत.

सन १७६५ (जु. ६ हिजरी सन ११७८) पासून मुर्शिदाबादच्या टांकसाळीची व्यवस्था ईस्ट इंडिया कंपनीकडे गेल्यानें पुढील कालांतील नाण्यांवरील जुलूस व हिजरी सन जुळते नसणें संभवनीय आहे. मुहम्मदाबाद—बनारस टांकसाळीची व्यवस्था ईस्ट इंडिया कंपनीकडे आल्यावर त्यांनीं मोंगल बादशहाच्या नांवें पाडलेल्या रुपयांवर जु. १७ आहे.

शाह आलम हि. स. १२२१ त जुलूसच्या ४९ व्या वर्षी मृत्यु पावल्यावर ई. इं. कंपनीनें हि. स. १२२९ पर्यंत शाह आलमच्या नांवानें जे रुपये पाडले त्यांच्यावर १७ व ४९ हे आंकडे घालून कालाबद्दल हि. स. घातला आहे.

हि. स. १२१५ सालीं ईस्ट इंडिया कंपनीला सुरतच्या टांकसाळींत बादशहाच्या नावांनें नाणीं पाडण्याचा अधिकार मिळाला. त्यावेळीं कंपनीनें तेथें बादशाही रुपये पाडले.

जु. ४६ हिजरी स. १२१८-१९ या

सालचें जें एक नाणें उपलब्ध आहे त्यावरील ठसा बरोबर उठलेला नाहीं.

मोंगलांचें हिजरी सन १२२१ चें जें नाणें उपलब्ध आहे त्याच्यावर चंद्रकलेची एक खूण आहे त्यावरून तें नाणें फ्रेंच कंपनीनें आपल्या टांकसाळींत पाडलें असें दिसतें. त्यावरील १२२१ हा हिजरी सनाचा आंकडा शाह आलमच्या निधनाचें वर्ष दर्शवितो.

इ. स. १८१७ नंतर फ्रेंच कंपनीनें जे रुपये आपल्या टांकसाळींत पाडले त्याच्यावर हिजरी सन १२२१ व जुलूस ४५ असे आंकडे आढळतात. पं. मू. कॅ. मध्यें एका नाण्याची नोंद आहे. असलीं मोंगलीं नाणीं जशीं फ्रेंच कंपनीनें पाडलीं, त्याचप्रमाणें ईस्ट इंडिया कंपनीनें देखील पाडलेलीं आहेत. सन १७९३ ते १८०२ पर्यंत पाँडिचेरी इंग्रजांच्या ताब्यांत होती. अर्थात् तेथील टांकसाळहि त्यांच्याच सत्तेखालीं व त्यांच्या देखरेखीखालीं आली होती. त्यामुळें फ्रेंच कंपनीनारखींच नाणीं इंग्रजांनींहि पाडलीं असण्याचा संभव आहे.

ईस्ट इंडिया कंपनीनें पाडलेल्या मोंगली नाण्यांत रुपयाप्रमाणेंच अर्धा रुपया आणि चार आणे किंमतीचें, दोन आणे किंमतीचें व एक आणा किंमतीचें अशीं समजतां येणारीं नाणीं आहेत.

हि. स. ९८७ च्या रुप्याच्या नाण्याचें वजन ११.११५ असून आकार २.४१ आहे. याच्या पुढच्या बाजूस 'ला इलह इल-लिल्लह मुहम्मद रसूल इल्लह' अशीं अक्षरें असून पाठच्या बाजूनें 'अक्बर बादशाह ९८७ मुहम्मद जलाल-उद-दीन' अशीं आहेत.

हिजरी सन ९९३ च्या नाण्यावर एका बाजूस 'ला इलह इल-लिल्लह मुहम्मद रसूल इल्लह' हीं अक्षरें असून दुसऱ्या 'मुहम्मद अक्बर बादशाह ९९३ जलाल-उद्-दीन गाझी' अशीं आहेत.

इलाही ३५ च्या एका नाण्याचें वजन १०.९२० असून पुढच्या बाजूनें '३५ इलाही ७ व मागच्या बाजूनें अल्लहु अक्बर जल्ल जलालहु' अशीं अक्षरें आहेत.

हि. स. १०५३ च्या अकबराबादच्या टांकसाळींत पाडलेल्या नाण्याच्या पुढच्या बाजूवर 'अबी बक्र अदल उमर बा रहम उस्मान इल्म अली १०५३' आणि मागच्या 'बादशाह गाझी शाह जहान. सिहाब-उद-दीन मुहम्मद साहिब किरान सानी जर्ब अक्बराबाद' अशीं अक्षरें आहेत. या नाण्याचें वजन ११.१८५ असून आकार २.२५ आहे.

हि. स. १११२ च्या सुरतच्या टांकसाळींत पाडलेल्या नाण्यावर 'औरन्ग १११२ झेब आलमगीर शाह झद चू बद्र मुनीर. सिक्क दर जहान' अशीं अक्षरें पुढच्या बाजूनें आणि पाठीवर 'मानूस मैम-

नत सनह ४४ जुलूस जर्ब सुरत' हीं अक्षरें आहेत.

जु. ४ च्या सुरतला पाडण्यांत आलेल्या नाण्यावर 'मुहम्मद शाह ई बादशाह गाझी सिक्कह मुबार' अशीं अक्षरें एका बाजूवर असून दुसऱ्या 'सनह ४' अशीं आहेत.

हि. स. ११७२ च्या अर्काटच्या टांकसाळींत पाडण्यांत आलेल्या नाण्यावर पुढच्या बाजूनें 'बादशाह सिक्कह आलमगीर' आणि पाठच्या बाजूनें '६ सनह व जर अर्कात' अशीं अक्षरें आहेत.

हि. स. १२०२ च्या नाण्यावर पुढच्या बाजूनें 'अल्लह' व माग या 'सनह १९ जर्ब' हीं अक्षरें आहेत. या नाण्याचें वजन १०.३३० व आकार २.६७ आहे.

हि. स. १२२२ च्या नाण्यावर पुढच्या बाजूनें 'अल्लह हामी दीन मुहम्मद फज्ल शाह आलम बादशाह' इ. अक्षरें असून मागच्या बाजूनें 'मुहम्मदाबाद १७ मैमनत जुलूस सनह मानूस ४९ जर्ब बनारस' अशीं आहेत. हें नाणें बनारसच्या टांकसाळींत पाडण्यांत आलें असून त्याचा आकार २.३१ व वजन ११.२ आहे.

सुरतच्या टांकसाळींत हि. स. १२१५ सालीं पाडण्यांत आलेल्या नाण्यांवर '१२१५ शाह आलम ई पादशाह गाझ क सिक्कह मुबार' अशीं अक्षरें पुढील बाजूवर असून पाठीवर 'मानूस मैमनत सनह ४६ जुलूस जर्ब सुरत' हीं अक्षरें आहेत. या नाण्याचा आकार २.७८ व वजन ११.५६० आहे.

हिजरी सन १२२१ च्या अर्काट येथील टाकसाळींत पाडण्यांत आलेल्या नाण्यावर पुढच्या बाजूस 'अल्लह हामी दीन मुहम्मद शाह सायह फज्ल शाह आलम सिक्कह झद बर हफ्त किश्वर' अक्षरें पुढील बाजूस असून पाठच्या 'मानूस मैमनत सनह ४३ जुलूस जर्ब अर्कात' अशीं अक्षरें आहेत.

गोमंतकांतील कित्येक सधन देवालयांतून सुवर्णाच्या मोंगली मोहोरा आणि त्यांच्या माळा किंवा सर दिसतात त्या मोहोरांत बहुतेक अकबरकालीन आहेत.

सदरील मोहोरांपैकीं एका सुवर्ण मोहरेवर पुढच्या बाजूनें 'ला इलह इल-लिल्लह मुहम्मद रसूल इल्लह' अशीं अक्षरें असून पाठच्या बाजूवर 'अकबर बादशाह मुहम्मद जलाल-उद-दीन' अशीं आहेत.

फोंडें महालांतील श्रीरामनाथ देवस्थानच्या सुवर्ण मोहोरांच्या सरांत एक अकबरी मोहोर सदर प्रकारची असून तिजवरील अक्षरें उर्दू लिपींत आहेत.

रिवण येथील श्रीविमलेश्वर देवस्थानांत एक सुवर्ण मोहोरांचा सर होता. त्यांत फिरंगी सुवर्ण मोहोरांबरोबरच आदिलशाही व अकबरकालीन मोंगली सुवर्णमोहोराहि दोन होत्या. या दोहोंपैकीं एक मोहोर बरीच झिजलेली असल्यानें तिजवरील अक्षरें वाचतां येत नव्हतीं, पण दुसरी मोहोर सदरील-सारखीच होती.

—२६—

सावंतवाडकर भोंसले

विजापुरकर आदिलशहा यानें कुडाळ प्रांताची देशमुखी सावंतवाडकर भोंसले यांस दिली होती. हा प्रांत श्रीशिवाजींनीं घेतल्यावर वाडकरांनीं त्यांच्याशीं दोस्ती करून सन १६५९ सालीं तह केला व आपली देशमुखी कायम राहाण्यासाठीं त्याकडून सनद मिळविली.

पुढें आदिलशहाशीं संगनमत करून वाडकर मराठ्यांवर उलटले. आदिलशहाचा सरदार खवासखान पंधरा हजार सैन्य घेऊन मराठ्यांवर चाल करून आला आणि त्याला बारा हजार लोकांसह वाडकर मिळून त्यांनीं मराठ्यांवर हल्ला केला. मराठ्यांनीं या सैन्याशीं निकराचा सामना दिल्यानें खवासखानाचा पराभव होऊन तो पळून गेला आणि वाडकरालाहि पळ काढावा लागला.

सन १६६५ च्या मध्यकालांत श्रीशिवाजी जयसिंगाशीं युद्धांत गुंतलेला पाहून महंमद इकलासखान हा आदिलशाही सेनापती मराठ्यांच्या कोंकणवर आला व त्यानें बराच भाग बळकावला. श्रीशिवाजींना ही बातमी लागल्यावर त्यांनीं सदर सालच्या नोव्हेंबरांत चढाई करून तो प्रदेश परत मिळविला. फक्त वेंगुर्लें व कुडाळ आदिलशहाकडे राहिला. तथापि रायगडावरून परत इकडे आल्यावर त्यांनीं तोहि प्रदेश घेतल्यामुळें वाडकराला फिरंगी हद्दींत कांदोळी येथें जाऊन रहावें लागलें.

बार्देसमध्यें कांदोळीला राहून पुन्हां पुन्हां मराठी प्रदेशावर किरकोळ हल्ले करून जनतेला सतावणाऱ्या वाडकराला आश्रय दिल्याच्या सबबीवर श्रीशिवाजींनीं फिरंग्यांच्या बार्देस प्रांतावरच हल्ला केला आणि वाडकराला हद्दीबाहेर घालविल्यानंतरच त्यांनीं फिरंग्यांकडे तह केला.

यानंतर फोंडें किल्लाहि घेतल्यावर संबंध दक्षिण कोंकण म्हणजे कुडाळ, मणेरी, पेडणें, डिचोली, सांखळी, फोंडें, जांबावली, पंचमहाल इ. सर्व प्रदेश मराठ्यांकडे आला.

परिस्थिति पाहून वाडकर लखम सावंत भोंसलें यांनीं श्रीशिवाजींची सपशेल माफी मागितल्यानें त्यांनीं पुन्हां त्यांची नेमणूक कुडाळ प्रांतावर केली. (सभासद बखर).

लखम सावंताच्या मृत्यूनंतर त्याचा बंधु फोंड सावंत हा अधिकारावर आला आणि त्याच्यामागें त्याचा मुलगा खेम सावंत याकडे स. १६७५ सालीं देशमुखीचे अधिकार आले.

आदिलशाही सत्ता संपुष्टांत येत चालली आणि श्रीशिवाजीनंतरचे मराठ्यांचे राजे छत्रपति संभाजी हे महाराष्ट्रांत एका महत्वाच्या राजकारणांत गुंतले असतां सन १६८९ च्या जानेवारींत फिरंग्यांच्या संगनमतानें मराठ्यांच्या अधिसत्तेखालील सारें दक्षिण कोंकण मोंगलांनीं काबीज केलें. मराठे व विजापुरकर यांच्यापेक्षां मोंगल अधिक दूरचे असल्यानें आपला हेतू ठीक साधेल अशा विचारानें खेम सावंतानें अवरंगजेबाशीं सख्य जोडले आणि मोंगलांनीं मराठ्यांविरुद्ध चालविलेल्या लढाईत आपणहि भाग घेतला.

सदर कामगिरीमुळें खेम सावंतानें मोंगलांच्या सरदारीचा मान मिळवून कुडाळ प्रांत त्यांच्या अधिसत्तेखालील राज्य बनवलें.

पुढें कांहीं कालानें मोंगल सत्ता नष्ट होण्याच्या पंथास लागल्यावर सन १६९७ सालीं खेम सावंत स्वतंत्र होऊन त्यांनीं आपणास 'राजा' ही पदवी घेतली, आणि सुंदरवाडी ही आपली राजधानी केली. हीच पुढें सावंतवाडी झाली.

छत्रपति राजारामांच्या राजवटींत वाडकरांनीं पुन्हां मराठ्यांची अधिसत्ता मान्य केली. सातारा आणि कोल्हापूर या उभय सत्तांच्या संघर्षांत पुढें वाडकरांना करवीर सत्तेशीं नमावें लागल्यान करवीरकरांकडून त्यानें सरदेशमुखीची सनद मिळविली आणि पेशव्यांच्या सत्ताकालांत त्यानें पुणें दरबाराशीं मैत्री जोडून त्यांची सत्ता मान्य केली व त्यांच्या मदतीच्या जोरावर पोर्तुगीजांशीं लढाई देऊन यश मिळविलें.

बाजीराव पेशवे यांच्या निधनानंतर मराठ्यांचें बल कमी झालें. करवीरकरांतहि विशेष जोम नव्हता आणि मोंगल तर हलवल झालेले अशी अनुकूल परिस्थिती पाहून वाडकरांनीं पुन्हां स्वातंत्र्य पुकारलें. बक्षीबहाद्दर जिवबादादा केरकर यांच्या मध्यस्थीनें दिल्लीपतींकडून राजेबहाद्दर पदवी व मोरचलांचा मान मिळविला आणि स्वतंत्र रीतीनें स्वतःला राज्याभिषेक करून आपल्या नांवचीं नाणीं पाडण्याचीहि व्यवस्था केली.

मोर्चलें वापरण्याची तयारी व इतर स्वातंत्र्यनिदर्शक हालचाल ऐकून पेशवे व छत्रपति कोल्हापुरकर यांना राग आला आणि वाडकरांना वठणीवर आणण्यासाठीं कोल्हापुरकरांनीं आपला सरदार दुगल यांना त्यांच्यावर पाठविलें. त्यांच्या फौजेनें सावंतवाडींत शिरून राजवाड्यास वेढा दिला. पण वाड्यांतील मंडळी गुप्त वाटेनें निघून पेडण्याकडे गेली. यावेळीं वाडकरांनीं फिरंग्यांकडे मदत मागितली. फिरंग्यांनीं सावंताला सलोखा राखण्याचे व मदतीचें अभिवचन दिलें व स्नेहाचा तह केला. या ता. २९ जानेवारी १७८८ रोजीं झालेल्या तहान्वयें **पेडणें, डिचोली, सांखळी** या पंचमहालांचा सारा प्रदेश पुढें पोर्तुगीजांना मिळाला. मात्र अभिवचन दिल्याप्रमाणें फिरंग्यांनीं सावंताला सदर प्रसंगीं मुळींच मदत दिली नाहीं.

अशा प्रसंगीं वाडकरांनीं शिंदे दरबारशीं धांव घेतली आणि दरबारचे सरसेनापती बक्षीबहाद्दर जिवबादादा केरकर यांनीं कोल्हापुरकरांना एक खलिता रवाना केला. त्यांत त्यांनीं असें लिहिलें कीं—"सावंतवाडींतील आपलें सैन्य परत न आल्यास निरुपायानें मला ससैन्य तिकडे यावें लागेल."

शिंदेशाहीचा दरारा आणि जिवबादादांचें सामर्थ्य यांची कोल्हापुरकरांना चांगली जाणीव असल्यानें त्यांनीं वाडकरांना आदरानें बोलावून आणून त्यांचें राज्य त्यांच्या स्वाधीन करण्याची व्यवस्था केली. तथापि घाईनें केलेल्या तहामुळें **पेडणें, डिचोली, सांखळी** हे तीन महाल फिरंग्यांनीं घशांत घातले ते घातलेच!

स्वातंत्र्य निदर्शन प्रसंगीं पाडण्याची

व्यवस्था करण्यांत आलेली नाणीं पुढें कधीं प्रचारांत आलीं याचा मात्र पत्ता लागत नाहीं. वाडकरांचें कोणतेंच नाणें उपलब्ध नसल्यानें त्यांबद्दलची खात्रीची माहिती मिळत नाहीं. तथापि होन नावांचें त्यांचें छोटें सुवर्ण नाणें, टका नावांचें रुप्याचें व रुका नावांचें तांब्याचें होतें अशी ऐकीव माहिती मिळते; पण ती विश्वासार्ह वाटत नाहीं.

—२७—

सोंदेकर

पेडणें, डिचोली, सांखळी हे नवीन काबिजादींतील तीन महाल पोर्तुगीजांनीं वाडकर सावंत यांकडून मिळविले तसेच फोंडें, सांगें केपें व काणकोण या महालांचा सबंध फोंडें प्रांत त्यांनीं सोंदेकर यांकडून बळकावला.

सोंदेकर राजे हे मूळचे उत्तर कर्नाटकांतील सोंदे संस्थानचे नरेश. सोंदे हें आजच्या सिर्सी तालुक्यांत असून तेथें सोंदेकरांच्या जुन्या राजवाड्याचे अवशेष अजून आहेत. विजयनगर साम्राज्याच्या इतर मांडलिकांप्रमाणेंच सोंदेकर हेहि एक मांडलिक होते. विजयनगरच्या अखेरच्या कालांत त्यांचे ठिकठिकाणचे मांडलीक स्वतंत्र झाले त्याचप्रमाणें कर्नाटकांतील मिरजन, होनावर, गेरसप्पा, सोंदे वगैरे राज्येंहि स्वतंत्र झालीं. त्यावेळीं सोंदे राज्यांत सिर्सीपासून कारवारपर्यंतचा मुलूख अंतर्भूत होता आणि काली नदीच्या अलिकडील सदाशिवगड, माजाळी, काणकोणकडील कांहीं भाग वगैरेंचा समावेश असलेला शिवेश्वर महालहि सोंदे राज्यांत होता.

सदाशिवगड हा किल्ला सोंदेकर यांचा असून तो त्यांनीं सन १५६० च्या सुमारास बांधला होता.

राजे आरसप्पा राजेंद्र वडियार यांपासून राजे सवाई वीर सदाशिव वसवलिंग राजेंद्र वडियार या हल्लीच्या राजांपर्यंत एकंदर चौदा नरेश सोंदेकरांच्या गादीवर आले. यांपैकीं सन १६७४ पासून १६९७ पर्यंत ज्यांची राजवट चालली त्या सदाशिव राजेंद्र वडियार नांवाच्या पांचव्या राजानें फोंडें किल्ला व त्याच्या कक्षेंतील सारा प्रदेश दरसाल ऐंशीं हजार रुपये खंडणी देण्याच्या अटीवर मोंगलांकडून घेतला.

पुढें मोंगल आणि मराठे यांच्या संघर्षात फोंडें किल्ला व तो प्रांत मराठ्यांनीं पुन्हां घेतांच सोंदेकरांनीं तीच खंडणी मराठ्यांना देण्याचें ठरवून त्यांच्याकडूनहि किल्ल्याचे अधिकार स्वतःकडे घेतले.

कांहीं कालानें उत्पन्न कमी व खर्च जास्त होऊं लागल्यानें फोंडें किल्ल्याबद्दल मराठ्यांना देण्याच्या खंडणीची बरीच रक्कम थकली आणि त्यामुळें त्या किल्ल्यासह फोंडें प्रांत त्यांनीं मराठ्यांकडे गहाण ठेवला. ही थकलेली बाकी आठ लाख रुपये होती.

अशा स्थितींत सोंदेकरांवर हैदराची स्वारी आली आणि त्यानें त्यांना बरेंच सतावलें. हा हैदर मूळचा एक निरक्षर उपटसुंभ होता. म्हैसूरचा दलवैकालीन काराकुरी नंदराजय्या याच्या हाताखालीं त्यानें शिपायाची नोकरी धरली. पुढें हुशारीनें तो लष्करांत नाईक होऊन वाढत वाढत अंमलदार झाला. देवण-

हळ्ळीच्या वेढ्यांत आणि अर्काट व त्रिचनापल्लीच्या लढाईंत यानें पराक्रम गाजविल्यानें सन १७६१ सालीं लष्करी गव्हर्नर म्हणून त्याची दिंडिगल येथें नेमणूक झाली. त्याला पुढें स्वतंत्र राज्याची अनावर इच्छा झाल्यानें तो त्या प्रयत्नास लागला आणि धन्याशीं विश्वासघात करून त्यानें स्वतंत्र राज्याची स्थापना केली. म्हैसूर, श्रीरंगपट्टण, काडूर, बेंगलूर, तुमकूर, कोइमतूर, सालेम, मदुरा, दिंडीगल वगैरे विस्तीर्ण प्रदेश त्याच्या राज्यांत आले. त्यानें आसपासचीं अनेक लहान लहान राज्यें घशांत घातलीं आणि अखेरीस सोंदे राज्यावर हल्ला केला.

आरंभीं सोंदेकरांनीं त्याला बराच प्रतिकार केला पण त्याच्या कडव्या सैन्यापुढें सोंदेकरांचा निभाव न लागून आपल्या राजधानीची सोंदे नगरी सोडून त्यांना शिवेश्वरच्या किल्ल्यांत यावें लागलें.

त्यावेळीं फिरंगी शस्त्रास्त्रांनीं युक्त असून त्यांचें आरमारहि प्रभावी असल्याची प्रसिद्धी होती. शिवाय शेजारचें मित्रराष्ट्र म्हणून फिरंग्यांकडे त्यांनीं लष्करी मदत मागितली. ती देण्याचें त्यांनीं अभिवचन दिलें; पण सैन्य किंवा दारुगोळ्याचीहि मदत न गेल्यानें हैदरवरील चढाईचा बेत रद्द तर झालाच; व शिवेश्वर किल्ल्यावर येणाऱ्या धाडीचाहि प्रतिकार करणें अशक्य वाटल्यानें सोंदेकर राजे सवाई इमोडी सदाशिवराव ता. २३ जानेवारी सन १७६४ रोजीं सहकुटुंब गोव्यांत आले.

पहिल्या प्रथम त्यांचा मुक्काम मोळें येथें झाला आणि त्यानंतर ते बांदिवडें येथें आपल्या राजवाड्यांत राहाण्यास आले. तेथेंच आजला हल्लीच्या राजांचा मुक्काम येथें आल्यानंतर त्यांना बारा हजार असर्फ्या फिरंग्यांकडून खंडणी मिळूं लागली. पुढें तींत आठ हजारांची वाढ होऊन वीस हजार झाली आणि स. १७८५ त ती तेवीस हजारांवर आली; पण सध्याच्या राजांना सालीना फक्त रु. ५६६१–११–० एवढीच रक्कम मिळते.

मराठ्यांकडे गहाण असलेल्या फोंडे किल्ल्यावर त्याच्या उतरत्या काळांत हल्ला करून तो फिरंग्यांनीं घेतला आणि दुसरीकडून ता. १७ जानेवारी सन १७९१ च्या तहानें किल्ल्यासह सारा फोंडें प्रांत सोंदेकरांकडून परस्पर घेऊन आपल्या राज्यास जोडला. अशा रीतीने फिरंगी गोव्यांतील नवीन काबिजादीचेहि राज्यकर्ते झाले.

फिरंगी व सोंदेकर यांचा पहिला तह सन १६९७ सालीं झाला. हाच रहस्यमय आहे. यानंतर १७९१ पर्यंत आणखी दहा तह झाले.

सोंदेकरांचें मूळच्या राजवटींतील नाणें सोन्याचें, रुप्याचें व तांब्याचें असून त्यांच्यावर एका बाजूला शिवलिंग व नंदी आणि खालीं श्रीमधुकेश्वर अशीं कानडी अक्षरें आणि दुसऱ्या बाजूस दोन सिंहांच्या मध्यें उभी तरवार असून खालीं सोंदें अशीं कानडी अक्षरें होतीं. असलें एक छोटें सुवर्णनाणें सन १९१२ सालीं सिर्सी येथील एक दैवज्ञ महाजनानें दसऱ्याच्या दिवशीं रिवण येथील

आपला कुलदेव विमलेश्वर याला अर्पण केल्याचें स्मरतें. पुढें जीर्णोद्धार प्रसंगीं इतर सुवर्ण नाण्यांसोबत हेंहि विकलें गेलें असावें.

फोंडें येथें मोंगलांच्या उतरत्या कालांत कांहीं दिवस सोंदेंकरहि स्वतंत्र झाले होते, पण त्यांनीं नाणीं पाडल्याचें ऐकिवांत नाहीं.

गोव्यांत सोंदेंकरांच्या हद्दींत फिरंगी. आदिलशाही, मोंगली अशीं अनेक प्रकारचीं नाणीं चालत होतीं. त्यांत मराठ्यांचीं अधिक होतीं. मराठ्यांचीं नाणीं पुढील प्रकारचीं होतीं:— ३ मासे वजनाचा तांब्याचा रुका, ९ मासे वजनाचा पैसा (शिवराई), १२ तोळे वजनी व १६ पैशांचा (चांदीचा) टका, चार टक्कयांचा रुपया व ३ रुपयांचा (सोन्याचा) होन.

—२८—

पोर्तुगीज चलन (उत्तरार्ध)

सन १७६३ च्या ५ जूनच्या जाहीरनाम्यानें फोंडें प्रांतांतील नागरिकांना त्यांच्या चालीरीतींचें संरक्षण करण्याचें फिरंगी सरकारनें अभिवचन दिलें आणि स. १७८१ च्या २७ ऑगस्ट रोजीं काढलेल्या जाहीरनाम्यानें पेडणें, डिचोली व सांखळी महालांतील जनतेला अभय दिलें. नवीन काबिजादीचा सारा प्रदेश पोर्तुगीजांकडे आल्यामुळें अर्थात् तेथें सर्वत्र त्यांची सत्ता व हकानें त्यांचें चलन सुरू झालें. आरंभीं दिलेलीं अभिवचनें पुढें फिरंग्यांनीं कितपत पाळलीं याचा जनतेला अनुभव आहेच.

नवीन काबिजादीच्या प्रदेशांत पोर्तुगिजांच्या सुरवातीच्या कालांत चलनांत पुढील प्रमाण होतें:— ५ कवड्यांचा पांच डुझ, २ पांचडुझांचा एक साडेबारा डुझ, २ साडेबारा डुझांचा १ रुब, २ रुबांचें १ अर्ध तांग, दोन अर्ध तांगांचें एक तांग, अडीच तांगांची १ अर्धी, २ अर्ध्या म्हणचे असर्फी, सहा तांगें–बांधीव असर्फी, दोन बांधीव असर्फ्या किंवा बारा तांगें–एक रुपया.

एक तांग कनवटीस लावून बाजारांत गेलेला इसम त्यावेळीं सगळा बाजार व्यवस्थित करून घरीं परतत असे. इतकें तत्कालीन तांगाचें मूल्य असे. त्याचप्रमाणें तांग्याचें वजनहि ९ द्राम ३५ ग्रेन होतें. त्यामुळें तांग नाणें भलें भक्कम वाटे. १२ तांगांची रक्कम बरोबर घेऊन प्रवास करणारास तें बरेंच वजन होई.

माशादु सांतुस् याच्या प्रभुत्वाखालीं झालेल्या प्रजासत्ताक वाद्यांच्या क्रांतीनंतर ता. ५ ऑक्टोबर १९१० रोजीं पोर्तुगाल देशाची बादशाही राजवट नष्ट होऊन प्रजासत्ताक राज्यपद्धति सुरू झाली. या नवीन राज्यपद्धतीचा तात्पुरता अध्यक्ष म्हणून दो. तिओफिलु ब्राग याची नेमणूक झाली; आणि त्यानंतर रीतसर निवडणुका होऊन मानुयेल द आन्हियाग, तिओफिलु ब्राग, बेर्नादिनु माशाद, सिदोनियु पाइश्, कास्त्रु, आंतोनियु जुझे द आल्मैद, तैशैर गोमिस्, बे. माशाद वगैरे गृहस्थ अध्यक्षपदीं आले.

प्रजासत्ताक राज्यपद्धति सुरू होतांच १९११ सालीं जो रुपया पाडण्यांत आला त्यावर पुढच्या बाजूनें हातांत विळा असलेल्या स्वातंत्र्यवादी बाईचें चित्र असून सभोंवतीं Republica Portuguesa अशीं

अक्षरें व खालीं सन आणि पाठच्या बाजूनें दोन वेलींमध्यें Uma rupia व खालीं India Portuguesa अशीं अक्षरें होतीं. अधेल्या व पावल्याहि तशाच शिक्क्याच्या होत्या.

सन १९२६ मधील २८ मे च्या क्रांतीनंतर पोर्तुगीज प्रजासत्ताकचे अध्यक्ष म्हणून जनरल कार्मोन यांची निवड झाली आणि त्यांनीं अर्थमंत्रिपद दो. ओलिव्हैर सालाझार याकडे दिलें. त्यानें शिकस्तीच्या प्रयत्नानें ढांसळत चाललेली पोर्तुगीज राष्ट्राची आर्थिक बाजू सांवरली.

याच्याच कारकिर्दींत गोव्यांत अडीच रुपये, एक रुपया, अर्धा रुपया व पाव रुपया अशा किंमतीच्या नोटा चलनांत सुरू झाल्या.

या नोटांचा आकार लहान असून किंमतीप्रमाणें रंगहि भिन्न भिन्न होते. शेतकरी कामकरी लोकांच्या हातांत वरचेवर घोळल्यानें पुढें पुढें या नोटांची झालेली दैनावस्था बघवत नव्हती.

सन १९३० सालीं सालाझार यानें मुख्य प्रधान या नात्यानें राज्यसूत्रें हातांत घेतलीं व डिक्टेटरशीप सुरू केली. सर्वाधिकारी सालाझारनें राष्ट्राची आर्थिक बाजू सांवरली व सुधारली; पण लोकशाहीचा सर्वस्वी खून केला. सत्तामदानें धुंद होऊन नागरिक हीं माणसें आहेत हेंहि पुढें पुढें तो विसरत चालला आणि आपल्या मनाला येईल तेंच करूं लागला. अशा वृत्तीमुळें त्याच्या आड येणाऱ्या पोर्तुगालच्या व वसाहतींतील अनेक पुढाऱ्यांना त्यानें बेपत्ता करून टाकलें. अशा रीतीनें १९३० पासून दीर्घकाल चालू असलेल्या त्याच्या हडेलहप्पी राजवटीचे १९६२ पासून तडे जाऊं लागले आणि गोमंतक मुक्त झाल्यापासून तर त्यांत विशेष भर पडत चालली. आतां त्याची राजवटच नव्हे; तर जीवन देखील धोक्यांत येण्याची चिन्हें दिसत आहेत!

प्रधान मंडळाचा अध्यक्ष झाल्यानंतर त्यानें राष्ट्रांत कित्येक सुधारणाहि केल्या याबद्दल दुमत नाहीं. यानें आपल्या अर्थमंत्र्याच्या वेळच्या चार आणे, आठ आणे व दोन रुपयांच्या नोटा रद्द करून एक रुपयाची नवी नोट प्रचारांत आणली आणि ती इस्कूद या नव्या नाण्याच्या आरंभकालापर्यंत चालली.

पांच रुपये, दहा रुपये, वीस रुपये, पन्नास रुपये या नोटांतहि फरक होत जाऊन पुढें वीस व पन्नासची नोट रद्द झाली आणि शंभर व पांचशेंची चलनांत आली. अशा रीतीनें रुपयांच्या नाण्यांत व नोटांत विविध फरक होत होत अखेरीस पोर्तुगीज रुपयाच्या चलनाचा सालाझारनें अंत केला.

सन १९५३ सालीं पोर्तुगीज सरकारनें पोर्तुगीज हिंदुस्थानमधील रुपयाचा भारतीय रुपयांशीं असलेला संबंध अजिबात तोडला. गोमंतक हा भारताचा भाग किंवा पोर्तुगिजांची वसाहत नसून तो पोर्तुगालचाच सागरोत्तर भाग आहे असें सालाझार सरकार म्हणूं लागलें. आणि त्याचे बगलबच्चेहि Aquí é Portugal असें नाना प्रकारांनीं ओरडत नाचूं लागले! वसाहत म्हटली कीं, राष्ट्रसंघाच्या कायद्याप्रमाणें स्वातंत्र्याचा विचार करावा लागेल म्हणून रिपब्लिकच्या सुरवातीपासून कागदोपत्रींहि वसाहत म्हणून उल्लेख करण्यांत येणाऱ्या गोमंतकाला पोर्तु-

गालचा तुकडा बनवला आणि त्याचसाठीं सर्व तऱ्हेनें भारताचा संबंध तोडण्याचा चंग बांधलेल्या सालाझार सरकारनें भारताच्या चलनाशीं असलेलें गोमंतकीय चलनाचें साम्यहि राहूं दिलें नाहीं. अर्थात् रुपया, आणा, पै हें चलन अजिबात नष्ट करून इस्कूदचें चलन गोव्यांत सुरू केलें. हें नवीन चलन सुरु करण्याचा ठराव १९५३ अखेर घेतला; तथापि प्रत्यक्षांत हें नवीन चलन गोमंतकांत दि. ३ नोव्हेंबर सन १९५९ पासून अस्तित्वांत आलें.

ता. २० ऑक्टोबर १९५९ ला बांकु नासियोनालच्या नाण्यासंबंधींच्या जाहिराती प्रसिद्ध झाल्या. त्यांतून जाहीर करण्यांत आलें कीं, ता. ३ नोव्हेंबरपासून इस्कूदचें नवीन चलन सुरू होणार आहे. त्याचप्रमाणें ता. ३१ मे १९६० पर्यंत रुपयाचें चलन बदलून देण्याची मुदत ठरविण्यांत आली असल्यानें या मुदतींत जुनें चलन देऊन बांकु नासियोनालकडून त्याच्या बदलांत इस्कूदचें नवीन चलन लोकांनीं घ्यावें.

पोर्तुगीज सरकारनें पन्नास हजार कोंतुस्‌ची म्हणजे अंदाजें ८३ लक्ष २५ हजार रुपयांचीं धातूचीं इस्कूदचीं नाणीं पाडलीं आणि चार लक्ष पन्नास हजार कोंतुस म्हणजे अंदाजें साडेसात कोटी रुपयांचें कागदी चलन अर्थात् नोटा काढण्याचा अधिकार बांकु नासियोनाल या बँकेस दिला. त्याप्रमाणें त्या बँकेनें आफोंसु द आल्बुकेर्कच्या मुखवट्याच्या पुढील किंमतीच्या सहा प्रकारच्या नोटा चलनांत सुरू केल्या :— १००० इस्कूद, ६०० इस्कूद, ३०० इस्कूद, १०० इस्कूद, ६० इस्कूद व ३० इस्कूद.

प्रत्येक नोटीचा रंग व आकार मूल्यास अनुसरून भिन्न भिन्न असे. या नोटा चलनांत आल्यावर त्यांची जनतेनें व्यवहारांत बरोबरी करतांना ३० इस्कूदची ५ रुपयांशीं, ६० इस्कूदची १० रुपयाशीं, ३०० इस्कूदची ५० रुपयांशीं व ६०० इस्कूदची १०० रुपयांशीं केली व जुळवून घेतलें.

चलनांत आलेलीं इस्कूदचीं नाणीं अशीं होतीं :— सहा इस्कूद, तीन इस्कूद, दिड इस्कूद, ८० सेंताव्हुस्, ४० सें., २० सें. व १० सें.

चालू असलेल्या मूळच्या रुपयाचा संबंध कांहीं दिवस ठेवणें जनतेच्या अडचणीच्या दृष्टीनें अपरिहार्य असल्यानें सरकारनें सहा इस्कूदचा एक रुपया असें मूल्य ठरवून टाकलें.

जुनीं व नवीं नाणीं यांचा संबंध अल्प काळच टिकावयाचा असला, तरी इस्कूदची रुपयांशीं होणारी जुळणी सेंताव्हची आण्याशीं होणार नव्हती. कारण चार आण्याचे १५० सेंताव्ह धरले तर दोन आण्याला ७५ सेंताव्ह मिळणें शक्य नव्हते. दोन आण्यासाठीं ८० सेंताव्ह द्यावे लागत. त्यामुळें लोकांचा बराच घोटाळा झाला.

ही इकडील इस्कूदची भानगड गोवा-दमण-दिव यांपुरतीच होती. पोर्तुगालच्या इस्कूदचें मूल्य निराळें होतें. पोर्तुगीज इस्कूदचें प्रमाण डॉलरला २८ इस्कूद ६० सेंताव्ह व पौंडाला ८० इस्कूद असें आहे.

व्यवहारांत गडबड होऊं नये व थोड्या दिवसांसाठीं कां असेना रुपयांचें इस्कूदशीं मिळतें असावें म्हणून सरकारनें जुन्या चलनाचें

नव्या चलनाशीं प्रमाण खालीलप्रमाणें ठरविलें होतें:—

एक रुपया = सहा इस्कूद; अर्धा रुपया = तीन इस्कूद; पाव रुपया किंवा चार आणे = दीड इस्कूद; दोन आणे = ऐंशीं सेंताव्ह; एक आणा = चाळीस सेंताव्ह; अर्धा आणा किंवा दोन पैसे = वीस सेंताव्ह; पाव आणा किंवा एक पैसा = दहा सेंताव्ह.

पोर्तुगीज सरकारनें इस्कूदच्या नोटा काढण्याची बांकु नासियोनाल बँकेस परवानगी दिली; तथापि कोणत्याहि प्रामाणिक राष्ट्रांत नोटा चलनांत सुरू करतांना जी रक्कम किंवा सुवर्ण नोटांच्या गंगाजळीसाठीं ठेवावें लागतें ती गंगाजळी ठेवण्याचा दंडक पोर्तुगाल सरकारनें स्वतःला किंवा बँकेला लागूच केला नाहीं, त्यामुळें या इस्कूदच्या नोटांना खरें म्हटलें तर मूल्यच नव्हतें. फक्त सरकारी धाकावर या नोटा चालू होत्या. त्याबद्दल सरकारलाहि कांहीं वाटत नव्हतें; कारण गोव्याविषयींची कोणतीहि गोष्ट करतांना पोर्तुगालनें गोमंतकीय जनतेची कधीं कदरच केली नाहीं. दिखाऊ फार्स कांहीं गोष्टींत केले असतील इतकेंच.

इस्कूदचें चलन गोव्यांत सुरू झाल्यावर आतां गोमंतक हा नाण्याच्या दृष्टीनेंहि पोर्तुगालचा भाग ठरला अशा समाधानाचा सालाझार सरकारनें सुस्कारा सोडला; पण घडलें निराळेंच व हें गोव्यांतील फिरंगी नवीन नाणें सालाझारच्या दुर्दैवानें अखेरचें ठरून त्याला अंतःकालची मूठमाती मिळाली.

सन १९४६ च्या १८ जूनला गणेश पूजन झालेल्या सत्याग्रहाला सन १९५४ त ऊत आला आणि जुलै ऑगस्ट मध्यें उत्तरेकडील चळवळ नेटांत येऊन आझाद गोमंतक दलानें दादरा नगर हवेलीचा प्रदेश मुक्त केला.

सन १९६१ मध्यें ऑगस्ट महिन्यांत गोमंतकीय राष्ट्रवाद्यांच्या चळवळीस व भूमिगत कार्यास विशेष नेट येऊं लागला आणि क्रांतिकारकांच्या पंधराव्या वर्धापनाच्या दिवशीं आशादायक वातावरण निर्माण झालें.

अखेरीस सलोख्याचे सर्व प्रयत्न निष्फळ झाल्यावर भारतीय लष्करानें १८ डिसेंबर रोजीं गोमंतकाच्या मुक्तीसाठीं गोव्यांत प्रवेश करून १९ डिसेंबर रोजीं गोमंतकाच्या राजधानीवर अशोक चक्रांकित तिरंगी झेंडा चढविला. अशा रीतीनें सालाझारच्या मगरमिठींतून गोमंतक मुक्त झाला आणि साडेचार शतकें दुरावलेला भारताचा भाग पुन्हां भारताला मिळाला.

सालाझारनें गोवा गेल्याबद्दल फार शोक केला. गोव्याचें संरक्षण करतां न आल्यास हिरोशिमाप्रमाणें ॲटमनें नसला, तरी इतर अनेक साधनांनीं तो जाळून साऱ्या जनतेसकट भस्म करून टाका हा त्याचा निर्वाणीचा हुकूमहि लष्कराला न बजावतां आल्यानें सालाझार हुंदक्यावर हुंदके देऊं लागला आणि अत्यंत दुःखी झाला. पण आतां त्याचा काय उपयोग होता?

ता. १९ डिसेंबर १९६१ रोजीं भारतीय सेना गोव्यांत प्रवेशल्यावर पणजी येथील बांकु नासियोनालच्या मुख्य कचेरींत आणि मुर्गाव, मडगांव व म्हापशें येथील शाखा कचेरींत अनेक नोटा रद्दीकागदासारख्या जाळण्यांत आल्या. त्यापूर्वी कित्येक दिवस, बँकेमध्यें तारणावर असलेले लोकांचे दागिने, सोनें, चांदी व तत्सम बँकची चीजवस्त लिस्बनला रवाना झाली होती. कित्येक गिनी बँकेच्या ट्रेझरींत होत्या त्याहि गेल्या होत्या. घाईनें जाळतांना ज्या कांहीं नोटा अग्निदिव्यांतून निसटल्या त्या उपटसुंभांनींहि लांबवल्या.

—२९—

स्वातंत्र्यपूर्व हिंदी चलन

पोर्तुगीज निजधामास जाऊन, साडेचारशें वर्षें विलग असलेला भारताचा गोमंतक भाग पूर्ववत भारताला मिळाला आणि गोमंतक भारतीय संघराज्यांत सामील होऊन त्याच्या-वर भारतीय संघराज्यसत्ता सुरु झाली. या संघराज्य-सत्तेपूर्वी भारतांत नाणीं किंवा टांक-साळी यांच्या बाबतींत अनेक घडामोडी होऊन गेल्या असून ती माहिती उपयुक्त असल्यानें या प्रकरणांत देण्यांत येत आहे.

प्राचीन भारताच्या इतिहासाकडे पाहतां वेदकालीन व आर्षकालीन माहिती योग्य पुरा-व्यांच्या अभावीं ठीक मिळत नाहीं. रामायण व महाभारत हे काव्यग्रंथ ऐतिहासिक असले तरी त्यांवरून त्या कालांतील सुसंगत माहिती मिळत नाहीं. तथापि रामायण कालांत व महाभारत कालांत चलन अस्तित्वांत अस-ल्याचे उल्लेख मिळतात.

शिलालेख, धातुलेख, ताम्रपट इ. साध-नांच्या आधारानें जो अल्प इतिहास मिळतो त्यांतील प्रथमभाग म्हणजे मगध (बिहार) देशाची माहिती. मगधाचा इतिहास सनपूर्व सहाव्या शतकापासून सुरू होतो. आर्यांच्या प्रथम वसाहतींत मगधाची वसाहत महत्वाची होती.

विंध्य पर्वतामुळें भारताचे दोन भाग पड-तात. उत्तर भारत व दक्षिण भारत. आर्यांनीं प्रथम उत्तर भारत व्यापला. आणि मग ते दक्षिणेकडे सरकत चालले. प्रथम वसाहती अर्थात् उत्तरेकडे स्थापन केल्या व त्या वसाहतींचीं पुढें राज्यें झालीं. सनपूर्व सहाव्या शतकांत उत्तर भारतांत आर्यांचीं एकंदर ८० राज्यें होतीं. त्यांत काश्मीरच्या उत्तरेकडील कंबोज, सिंधु नदीच्या कांठचा सिंध-सौवीर व गंगा यमुना तीरावरील मगध हीं मोठीं राज्यें होतीं. मगधावर राज्य करणारे सहा राजवंश झाले. शिशुनाग घराणें (सनपूर्व ६४२–४७०), नंद (४७०-३२२), मौर्य (३२२ -१८४), शुंग (१८४-७३), कण्व (७३-२८), गुप्त (इ. सन ३२०-४९०).

तीन शतकें पर्यंत माळवा, सौराष्ट्र, सिंध या भागावर उज्जयनी राजधानींत राहून राज्य करणाऱ्या शकांना सिंधु नदीच्या पलीकडे हांकलून लावून गुप्तवंशीय चंद्रगुप्तानें तें राज्य आपल्या राज्यांत समाविष्ट केलें व राजधानी उज्जयनीला आणली. त्यानें या विजयानंतर 'विक्रमादित्य' ही पदवी धारण केली. विक्र-माच्या अनेक गोष्टी प्रसिद्ध आहेत त्या याच्याच.

सन ४५५ च्या सुमारास हूण आले. त्यांनाहि चंद्रगुप्तानें परतून लावलें. पुन्हां ५२८ त ते परत आले. त्यावेळीं माळव्याचा राजा यशोधर्मन यानें त्यांना घालवून दिलें.

गुप्तांच्या उतरत्या कालांत वर्धन वाढूं लागले. प्रभाकर वर्धन हा यशोधर्मनचा जांवई. याच्या तीन मुलांपैकीं हर्षवर्धन हा कनोजच्या गादीवर आल्यावर त्यानें सन ६१२ त दिग्विजयास आरंभ केला व तो सम्राट झाला. हा सन ६४७ त मृत्यु पावल्यावर त्याच्या सरदारांनीं स्वतंत्र राज्यें स्थापिलीं व तेच पुढें राजपूत म्हणून उदयास आले. राजपुतांच्या

प्रसिद्ध छत्तीस घराण्यांत गुहिलोत, चाहमान, प्रतिहार, परमार, चंदेल इ. प्रमुख होत. या सर्व घराण्यांनीं मुसलमानाची आक्रमणें थोपवून धरण्यांत पराकाष्ठेचे प्रयत्न केले. स्वातंत्र्य व स्वधर्म यांसाठीं सतत ५०० वर्षें परकीयांशीं झगडणाऱ्या राजपुतांची कामगिरी और आहे. राजपूत राजांचींहि नाणीं अस्तित्वांत होतीं. पुढच्या बाजूवर राजचिन्ह व मागच्या राज्याचा निर्देश; शिवाय मेवाडच्या नाण्यावर मागच्या बाजूनें सात टिपके होते. जोधपूरच्या नाण्याच्या पाठीवर स्वस्तिक चिन्ह व त्यांत चार टिपके, बिकानेरच्या मध्यें अब्दागीर व भोंवतीं नऊ टिपके अशीं वेगवेगळीं चिन्हें असत.

दिल्लीच्या अनंगपाळाचें राज्य त्याच्या मागें त्याचा भाचा अजमीरचा राजपूत राजा पृथ्वीराज चव्हाण याला स. ११७० त मिळालें. पुढें महंमद घोरीनें स. ११९२ सालीं विश्वासघातानें त्याला ठार करून तो दिल्लीच्या तक्तावर आला. अशा रीतीनें राजपुतांच्या इच्छेबाहेर पुढें मुसलमानांनीं भारतांत आपलें बस्तान बसविण्यास आरंभ केला. पुढें स. १२०६ पासून स. १५२६ पर्यंत दिल्लीच्या तक्तावर कित्येक मुसलमान राजे आले. यांपैकीं लोदी हे अफगाण किंवा पठाण व इतर पठाणेतर होते. इतिहासकारांनीं त्यांच्या राजवटीला सुलतानशाही असें म्हटलें आहे. स. १५२६ त दिल्ली मोंगलांनीं घेतली व ता. २७ एप्रिल १५२७ रोजीं बाबरानें बादशहा म्हणून द्वाही फिरविली.

खलजी जलाल-उद-दीन, अला-उद-दीन, कुत्ब-उद-दीन, तुगलक गियास-उद-दीन, मुहम्मद वगैरे सुलतानांचीं जीं नाणीं उपलब्ध आहेत तीं ठराविक पद्धतीचीं विशेष फरक नसलेलीं व सहज ओळखतां येणारीं आहेत. यांची माहिती पृ. १७ वर आली आहे. सुलतानाचीं हिजरी सन ६८९ पासून ७३५ पर्यंतचीं ५० प्रकारचीं नाणीं उपलब्ध आहेत. दिल्लीच्या सुलतानशाहींतून बहमनशाही उदयास आली. यांच्या नाण्यांची माहिती पृ. २० वर आली आहे. मुसलमानी अरेरावीनें गांजलेल्या परिस्थितीनें विजयनगर साम्राज्यास जन्म दिला. याची माहिती पृ. २१ वर आहे.

विंध्याद्रीच्या दक्षिणेस चालुक्य, राष्ट्रकूट, यादव, होयसळ, चोल, चेर, पांड्य, पल्लव इ. राज्यें उदयास आलीं; तथापि उत्तरेंतील मगध राज्याप्रमाणें दक्षिणेंत फक्त आंध्र राजवटीनेंच पराक्रमानें मोठें साम्राज्य स्थापन करून अद्वितीय कामगिरी बजावली. या राजवटीचे राजे सातवाहन यांची माहिती पृ. ८ वर आली आहे.

बहमी राजवटींतून वऱ्हाडची इमादशाही, विजापूरची आदिलशाही, नगरची निजामशाही, बेदरची बरीदशाही व गोवळकोंड्याची कुतुबशाही अशीं राज्यें जन्म पावलीं.

सन १६४६ सालीं श्रीशिवाजी महाराजांनीं मराठी राज्याची स्थापना केली आणि पेशव्यांनीं उत्तरेंत भगवा झेंडा फडकावून मराठी साम्राज्याचा दरारा बसविला. पुढें व्यापारानिमित्त आलेल्या इंग्रजांनीं भेद पाडून, कर्जे लावून भारतीय राजांमध्यें कटकटी

उत्पन्न केल्या. आणि निरनिराळे निमित्त काढून एकेक राज्य घशांत घालीत त्यानें सारा भारत पचविला. स. १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धांत सामील असल्याच्या निमित्यानें दिल्लीची गादीहि बळकावली.

आरंभीं हिंदुस्थानांत इंग्रजांच्या ज्या व्यापारी वखारी होत्या त्या चालविणाऱ्या ईस्ट इंडिया कंपनीकडेच राजसत्ताहि होती. कंपनी राजमान्य अतएव राज्यकर्त्यांचीच असल्यानें कंपनीला सर्व प्रकारचे पूर्ण अधिकार होते.

ता. ३१ डिसेंबर सन १६०० या दिवशीं ईस्ट इंडिया कंपनीच्या स्थापनेला मंजुरी मिळालेलें फर्मान निघालें. या कंपनीचा हेतु पूर्वेकडील देशांशीं व्यापार करण्याचा होता. त्या दृष्टीनें कंपनीनें पहिल्या प्रथम भारताच्या किनाऱ्यावर वखारी उभारण्याचा प्रयत्न केला.

सन १६१२ त दिल्लीच्या बादशहाकडून सुरत येथें वखार उभारण्याची परवानगी मिळविली. पुढें मसुलीपट्टम्, पिपली (ओरिसा) व मद्रास येथें वखारी स्थापन करण्यांत आल्या.

सन १६०१ मध्यें ईस्ट इंडिया कंपनीनें आपल्या व्यवहारासाठीं इंग्लंडच्या राजाच्या परवानगीनें इंग्लंडमध्यें आपलें पहिलें नाणें पाडून घेतलें. या नाण्यावर राणी येलिझाबेथ हिचा शिक्का होता. राणीनें जाहीरनामा काढून या नाण्याची देशाबाहेर निर्यात करण्याची परवानगी दिली.

कंपनीच्या ताब्यांत वखारी व अन्य दृष्टीनें जरी कांहीं प्रदेश होता तरी तो प्रदेश स्थानिक राजांकडून मिळालेली देणगी म्हणून समजण्यांत येत होता. कंपनीचा दर्जा त्यामुळें त्यांच्या खालच्या मांडलिकांप्रमाणें होता. अशा परिस्थितीमुळें कंपनीला आपलीं आरंभीची नाणीं भारतीय राजांच्या नाण्यांच्या धर्तीवर काढावीं लागलीं.

चंद्रगिरीच्या राजाकडून कंपनीला मद्रास येथें वखारीला जी जागा मिळाली तिच्या संबंधीच्या करारांत स्थानिक नाण्यांवर कंपनीनें हिंदु देवतेचें चित्र वापरावें असें एक कलम होतें. ईस्ट इंडिया कंपनीच्या आरंभ कालांत मद्रासला पाडण्यांत आलेल्या नाण्यावर विष्णु, वराह यांच्या प्रतिमा आढळतात, त्याचें कारण हेंच होय.

कंपनीच्या मुंबईच्या नाण्यांवर मात्र ही हिंदु देवांच्या प्रतिमांची पद्धत नाहीं. मुंबईला कंपनी आपल्या इच्छेप्रमाणें नाणीं पाडीत असे याचें कारण मुंबई बेट खुद्द इंग्लंडच्या राजाकडून मिळालें होतें.

इ. स. १६६२ मध्यें इंग्लंडचा राजा दुसरा चार्लस् याचा विवाह पोर्तुगालची राजकन्या इं. कातारीन हिच्याशीं झाला. या विवाहाप्रित्यर्थ मुंबई बेट व बंदर संपूर्ण हक्कासह पोर्तुगीज राजानें इंग्लंडच्या राजास आंदण म्हणून दिलें. त्यावेळीं मुंबई ही कुलाबा, द. कुलाबा, अपोलो बंदर, माझगांव, माहीम, शींव, वरळी अशा सात बेटांचा खाड्यांनीं विलग असलेला प्रदेश असून त्याला 'माहीम-मुंबई' असें म्हणत. कुलाब्यापासून वांद्र्याच्या खाडीपर्यंत साडे अकरा मैल लांबी व तीनेक मैल रुंदी एवढेंच त्याचें क्षेत्र होतें. सात बेटांच्या या समूहाला स. १५०८ मधील

पोर्तुगीज प्रवासी गास्पार कुन्है यानें Bombaim 'बोंबाई' असें नांव दिलें. या भागाचें मूळ नांव 'मुंबादेवी'. तेथील मुंबादेवी ही तिथल्या मूळच्या रहिवाशांची देवता होती. हे मूळचे रहिवासी कोळी होते. आजहि मुंबईला हें देवस्थान प्रसिद्ध आहे. या मुंबादेवीवरूनच 'मुंबई' असें नांव प्रचारांत आलें. मुंबई नांवावरूनच पोर्तुगीजांनीं बोंबाई म्हटलें व त्याचेंच पुढें इंग्रजींत Bombay बॉम्बे असें रूपांतर झालें.

पोर्तुगिजांपूर्वीं मुंबई मुसलमानाकडे आणि त्यापूर्वीं फार काल पर्यंत हिंदु राजांच्या ताब्यांत होती.

इ. स. १६७१ मध्यें इ. ई. कंपनीच्या कोर्ट ऑफ डायरेक्टर्सनीं मुंबईला टांकसाळ काढण्याचा ठराव घेतला व १६७७ मध्यें दुसऱ्या चार्लसनें नवें राजपत्र काढून ईस्ट इंडिया कंपनीला मुंबई येथें आपलीं नाणीं पाढण्याचा अधिकार दिला. त्या नाण्यांत रुपया व पैसा अशा जातींचा उल्लेखहि करण्यांत आला.

इ. स. १६७७ मध्यें मुंबईच्या टांकसाळींत जो पहिला रुपया पाडण्यांत आला त्या रुपयावर एका बाजूला मध्यभागीं Rupee of Bombaim अशीं अक्षरें व खालीं दोन फुल्या असून सभोंवतीं By authority of Charles the second, 1677 हीं अक्षरें आहेत. दुसऱ्या बाजूस मध्यभागीं इंग्रजी राजचिन्ह असून भोंवतीं King of Great Britain, France and Ireland अशीं अक्षरें आहेत.

यानंतर भारतांत कंपनीनें सुरत, बेंगाल व मद्रास (अर्काट) येथें जे चांदीचे रुपये पाडले ते तेथील राजांच्या नाण्यांच्या धर्तीवर व कांहीं मोंगल बादशहाच्या नांवानें पाडले. वरील तिन्हीं ठिकाणीं कंपनीच्या टांकसाळी होत्या.

ईस्ट इंडिया कंपनीचें आयुष्य इ. स. १६०० पासून स. १८५८ पर्यंत म्हणजे २५८ वर्षें होतें. त्यांत स. १७६५ पर्यंतच्या पूर्वार्धांत कंपनीची दृष्टि व्यापाराकडे होती; पण पुढें १७६५ ते १८५८ पर्यंत सत्ता मिळविण्याकडेच तिचे सारें लक्ष वेधलें!

स. १८५७ पर्यंत कंपनीनें आपली सर्व शक्ति खर्च करून कंपनी हिंदुस्थानची सार्वभौम बनली! तथापि कंपनीचा अंतस्थ कारभार मात्र असमाधानकारकच होता.

सन १८५८ त कंपनीची अंतर्गत गडबड न मानवल्यानें इंग्लंडच्या पार्लमेंटांत खळबळ उडाली आणि Act for the Better Government of India हा कायदा करून इंग्रज सरकारनें कंपनीचा कारभार संपुष्टांत आणला. अर्थात् त्यावेळीं इंग्लंडच्या गादीवर असलेल्या व्हिक्टोरिया राणीनें तो आपल्याकडे घेउन त्याच्यासाठीं 'सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया' याची नेमणूक केली. हिंदुस्थानांत राहून प्रत्यक्ष कारभार पहाण्यासाठीं त्या वेळेपासून व्हाईसरॉयची नेमणूक होऊं लागली.

इ. सन ४१० त इंग्लंडवरील रोमन लोकांचा अंमल नष्ट झाल्यावर स. ४१० ते

१०६६ पर्यंत अँगल, सॅक्सन व डेन्स यांची कारकिर्द चालली. पुढे १०६६ ते ११५४ पर्यंत नॉर्मन घराण्यानें सत्ता चालविली. ११५४ ते १४८५ पर्यंत अँग्लो लँकेस्टर व यॉर्क घराणें यांचा अंमल चालला. स. १४८५ ते १६०३ पर्यंत ट्यूडर घराण्याची कारकिर्द चालली. पुढें स. १६२५ पर्यंत स्टुअर्ट घराण्याकडे सत्ता राहिली आणि चार्ल्सच्या मृत्यूनंतर ऑलिव्हर क्रॉमवेल या राजकारणी अंमलदारानें सत्ता हातीं घेऊन ती स. १६५८ पर्यंत चालविली. पुढें दोन वर्षांच्या आंतच लोकांनीं दुसऱ्या चार्लसला सन्मानपूर्वक बोलावून इंग्लंडांत पुन्हां राजसत्ता सुरू केली.

यानंतर दुसरा जेम्स, तिसरा विलियम, राणी ॲन, पहिला जॉर्ज, दुसरा जॉर्ज, तिसरा जॉर्ज, चौथा जॉर्ज व चौथा विलियम यांची कारकिर्द संपल्यावर स. १८३७ त राणी व्हिक्टोरिया इंग्लंडच्या गादीवर आली आणि स. १८५८ पासून हिंदुस्थानच्या सार्वभौमत्वाचे अधिकार तिजकडे गेले. तिची राजवट १९०१ पर्यंत चालली.

त्यानंतर सातवे एडवर्ड, पंचम जॉर्ज, आठवे एडवर्ड व सहावे जॉर्ज असे राजे इंग्लंडच्या तक्तावर येऊन गेले आणि सध्या राणी एलिझाबेथचा अंमल सुरू आहे.

सहावे जॉर्ज यांच्या राजवटींत हिंदुस्थान स्वतंत्र झालें. अर्थात् स. १८५८ मध्यें ईस्ट इंडिया कंपनीचा अंमल जाऊन भारतांत स्थापन झालेली बादशाही सत्ता १४ ऑगस्ट १९४७ पर्यंत टिकली.

ईस्ट इंडिया कंपनीच्या टांकसाळी हिंदुस्थानांत मुंबई, सुरत, कलकत्ता, अर्काट (मद्रास), वगैरे ठिकाणीं होत्या. कंपनीच्या पहिल्या रुपयाची माहिती मागें आलीच आहे. त्यानंतर दोन बाजूंना सिंह व मध्यें इंग्लिश राजचिन्ह अशा रीतीचीं कंपनीची निरनिराळीं नाणीं प्रचारांत आलीं.

कंपनीची सुधारलेल्या पद्धतीचीं पहिली टांकसाळ म्हणजे कलकत्त्याची. ही १ ऑगस्ट १८२९ रोजीं सुरू झाली. या टांकसाळींत पुढें पुढें दिवसास बारा लाखपर्यंत नाणीं तयार करण्याची व्यवस्था झाली. दुसऱ्या महायुद्धाच्या सुरवातीस तें प्रमाण ४० लाखापर्यंत वाढलें. या टांकसाळींत इतर देशांचींहि नाणीं पाडून देत असत.

मुंबईच्या टांकसाळीची योग्यता तर झपाट्यानें वाढत गेली. हल्लीं या टांकसाळींत सर्व प्रकारची आधुनिक मशिनरी बसवली आहे. येथें चांदी शुद्ध करण्याची एक भव्य संशोधनशाळा आहे. या शाळेंत दर रोज ५० हजार औंस चांदी शुद्ध करतां येते. सुवर्ण संशोधन विभागांत दर रोज सात मण सोनें शुद्ध करतां येतें.

हैद्राबादच्या टांकसाळींत पूर्वी निजामी नाणीं तयार होत. आतां तीं भारत सरकारकडे असून मुंबईच्या टांकसाळीची शाखा म्हणून चालते. तीमध्यें रोज साडेतीन लाख नाणीं पाडण्याची व्यवस्था होते.

जगांत सर्वांत मोठ्या अशा ज्या तीन टांकसाळी आहेत त्यांमध्यें पहिली अमेरिकेंतील फिलाडेल्फियाची, दुसरी कलकत्त्याची व तिसरी मुंबईची असें मानीत. हल्लीं मुंबईचीच

प्रमुख समजण्यांत येते. नवीन साधनांनीं परिपूर्ण असल्यानें हल्लीं अलिपूरचीहि मुंबईच्या तोडीची ठरली आहे. प्रक्रिया शाखा हें अलिपूरच्या टांकसाळीचें वैशिष्ट्य आहे. कलकत्त्याची टांकसाळ हल्ली बंद होऊन तिचा दर्जा अलिपूरच्या टांकसाळीस देण्यांत आला आहे. मद्रासकडील अर्काटची व सुरतची या टांकसाळी कंपनीनेंच बंद केल्या होत्या.

सिंह छापाच्या कंपनीच्या चांदीच्या नाण्यांत रुपया, अधेली, पावली व चवली अशीं नाणीं असून ब्रॅांझच्या नाण्यांत ढब्बू, पैसा, अर्धा पैसा व पै हीं नाणीं होत.

सदरील चांदीचीं नाणीं गांठलीं वगैरे रूपानें गतकालीन धनगर लोक फार वापरीत असत. ते चांदीच्या आंगठ्यांना देखील वरच्या बाजूनें चवली बसवून घेत असत.

ईस्ट इंडिया कंपनीच्या चलनानंतर भारतांत व्हिक्टोरिया राणीचें चलन अस्तित्वांत आलें. पुढें सातवे एडवर्ड व पंचम जॉर्ज यांचीहि नाणीं निघालीं. हीं बहुतेक सर्व एकाच पद्धतीचीं म्हणजे रुपया, अधेली, पावली, चवली अशीं रुप्याचीं आणि ढब्बू, पैसा, अर्धा पैसा व पै हीं ब्रॅांझचीं अशीं होतीं. इंग्लंडांत व्हिक्टोरिया राणीचीं गिनी, अर्ध गिनी, पाव गिनी अशीं सुवर्ण नाणीं निघालीं होतीं व तीं हिंदुस्थानांत फार येत असत. यांचा वापर हिंदी स्त्रियांच्या गळसरींत बराच होत असे.

अठराव्या शतकांत इंग्लंडचा व्यापार जगभर पसरून त्याची भरभराट झाल्यानें इतर देशांतून इंग्लंडमध्यें सोन्याची आयात फार झाली. त्यामुळें सोन्याचेंच चलन सुरु करावें व चांदीचें नाणें उपनाण्यांत काढावें अशी इंग्लंडला इच्छा झाली. त्याप्रमाणें इंग्लंडनें १८१६ सालीं सुवर्णचलन सुरू केलें. पुढें १८७१ च्या सुमारास जर्मनी, फ्रान्स इ. दुसऱ्याहि कित्येक राष्ट्रांनीं सुवर्ण चलन चालू केलें. पण पुढें त्यांना तें बंद करावें लागलें.

कंपनी सरकारच्या अमदानींत प्रत्येक प्रांतांत निरनिराळ्या वजनाचे रुपये चालत असल्यानें देवघेवींत त्यांचीं वजनें करावीं लागत. खुद्द कंपनीच्या टांकसाळींतील कलकत्ता, मुंबई, मद्रास, सुरत येथील रुपयांची वजनेंहि भिन्न होती.

सन १८३५ सालीं ईस्ट इंडिया कंपनीनें मद्रास येथें चालू असलेला एक तोळा म्हणजे १८० ग्रेन वजनाचा रुपया हाच सर्व देशभर प्रमाणभूत नाणें म्हणून चालावा असें ठरविलें आणि अशा रीतीनें पुढें एक तोळा वजनाचा रुपया हाच हिंदुस्थानचें कायदेशीर चलन झालें.

हिंदुस्थानचा संबंध १८५८ पासून इंग्लंडचे राजसत्तेशीं जोडला गेल्यानें पुढें १८६४ मध्यें एका जाहिरनाम्यानें दहा रुपयांस एक सॉव्हरीन असा हुंडणावळीचा दर ठरविण्यांत आला व कागदी चलनासहि सुरवात झाली.

सन १८६२ पासून भारतांत कागदी चलन सुरू झालें. कलकत्ता, मुंबई, मद्रास या ठिकाणीं निघालेल्या नोटा फक्त त्या त्या प्रांतांतच चालत असत.

सन १८६६ मध्यें मेन्सफील्ड कमिशननें नोटा हें कायदेशीर चलन मानण्यांत येऊन तें सर्वत्र चालावें अशी शिफारस केली. अर्थात् कोणत्याहि प्रांतांतील नोट हिंदुस्थानच्या कुठल्याहि भागांत चालावी असा त्या शिफारशीचा हेतु होता. पुढें सन १९१० सालच्या

कायद्यानें तशी सुधारणा घडून आली.

सन १८६८ च्या जाहीरनाम्यानें सरकारी तिजोरींत सॉव्हरिन्स वटविण्यास एका सॉव्हरिनला दहा रुपये चार आणे देण्याची हमी देण्यांत आली.

फौलर कमिटीच्या शिफारशीवरून सन १८९९ सालीं ब्रिटिश सुवर्णचलन म्हणजे सॉव्हरिन हिंदुस्थानचें मुख्य नाणें ठरविण्यांत येऊन त्याचा व रुपयाचा परस्पर संबंध म्हणजे हुंडणावळीचा दर सोळा पेन्स कायम केला.

सन १९१३ सालीं चेंबरलेन कमिशननें मत दिलें कीं, हिंदी लोकांना सोन्याच्या नाण्याची जरूर नाहीं. तें आपणास मिळावें अशीहि त्यांची इच्छा नाहीं. नोटा व रुपये हेंच चलन त्यांना सोयीचें असल्यानें सोन्याचें नाणें प्रचारांत येणें हिंदुस्थानच्या हिताचें नाहीं.

सन १९३१ च्या सप्टेंबरांत बँक ऑफ इंग्लंडला नोटांच्या मोबदला सोनें देण्याची आपली जबाबदारी पार पाडणें कठिण झाल्यानें ब्रिटिश सरकारनें त्या जबाबदारींतून त्या बँकेस मुक्त केलें; त्यामुळें पौंडाचें स्थिर व निश्चित सुवर्ण परिमाण बंद झालें. तेव्हांपासून पौंडाची सोन्यांतली किंमत औंसास ८४ शिलिंग होती ती १४० ते १४८ शिलिंगांपर्यंत गेली. ब्रिटिश चलनाचा सोन्याचा आधार सुटला त्याच दिवशीं हिंदुस्थान सरकारनें ऑर्डिनन्स काढून आपल्या रुपयाचा सोन्याशीं असलेला संबंध सोडल्याचें जाहीर केलें! तथापि भारतमंत्र्याच्या हुकुमाप्रमाणें हिंदुस्थान सरकारास तो ऑर्डिनन्स रद्द करून रुपयाचा संबंध पौंडाशीं १८ पेन्सचे दरानें असल्याचें दुसऱ्या ऑर्डिनन्सनें जाहीर करावें लागलें.

सन १८६१ च्या कायद्यानें कागदी चलन काढण्याचा अधिकार हिंदुस्थान सरकारनें आपलेकडे घेतला होता. १८९८ चा कायदा होईपर्यंत हा निधि रुपयांतच होता. या नवीन कायद्यानें या निधींत सोन्याचें नाणें ठेवण्याचें ठरलें. यानंतर हिंदुस्थानांत सोनें जमा होऊं लागलें तोंच १९०० च्या कायद्यानें तें सोनें विलायतेंत ठेवण्यांत येऊं लागलें; त्यामुळें दहा कोटींपर्यंतचें सोनें इंग्लंडांत राहूं लागलें. हें सोनें इंग्लंडांत कां? असा प्रश्न केल्यास सोन्याची जरूरी हिंदुस्थानापेक्षां तेथेंच अधिक असून रुपये पाडण्यासाठीं चांदी घेण्यास त्याचा हवा तेव्हां उपयोग होतो असें उत्तर मिळे.

कागदी चलन निधीमध्यें १९१४ मार्च अखेर पर्यंत इंग्लंडमध्यें रोख सोनें व स्टर्लिंग रोखे मिळून १३ कोटी १५ लक्ष रुपयांचें व हिंदुस्थानांत २२ कोटी ४४ लक्ष रुपयांचें सोनें होतें; तें १९२० जानेवारींत इंग्लंडमध्यें ९४ कोटी १२ लक्ष व हिंदुस्थानांत ३५ कोटी १० लक्ष रुपये किंमतीचें असें वाढलें. या सहा वर्षांत इंग्लंडमध्यें सुमारें ७५ कोटि रुपयांनीं व हिंदुस्थानांत सुमारें १२॥ कोटि रुपयांनीं सोन्याची वाढ झाली.

कागदी चलननिधीविषयक ७ जानेवारी १९३८ रोजीं रिझर्व बँकेनें काढलेल्या पत्रकावरून एकूण २१२ कोटी ९४ लक्ष १० हजार रुपयांच्या कागदी नोटा काढल्या असें दिसतें. या चलनी नोटास तारण म्हणून ४१ कोटी ५४ लक्ष ५३ हजार रुपयांचें सोनें हिंदुस्थानांत व २ कोटि ८६ लक्ष ९८ हजार रुपयांचें सोनें इंग्लंडमध्यें ठेवण्यांत आलें. याशिवाय ६२ कोटि ३० लक्ष ९४ हजार रुपयांचें नाणें बँकेच्या तिजोरींत ठेवण्यांत आलें. तसेंच सरकारी कर्जरोख्यांपैकीं २७ कोटि ४० लक्ष

९५ हजार रुपयांचें कर्जरोखे हिंदुस्थानांत व ७८ कोटि ८० लक्ष ७० हजार रुपये किंमतीचे स्टर्लिंग रोखे इंग्लंडमध्यें घेतले होते.

ईस्ट इंडिया कंपनीच्या टांकसाळीपूर्वी हिंदुस्थानांत बऱ्याच कालापासून टांकसाळी सुरू होत्या. भारतीय प्राचीन राजे आपापली नाणीं पाडून घेण्यासाठीं त्यांचाच उपयोग करून घेत. मात्र त्या प्राचीन टांकसाळींतील नाणीं ओबडधोबड असत. एखादी दुसरी टांकसाळ व्यवस्थित असे व तिच्यांतील नाणीं ठीक असत. पण सर्वसाधारण टांकसाळी ओबडधोबड नाणींच पाडणाऱ्या होत्या. याचें कारण त्या टांकसाळी जुन्या पद्धतीच्या असत व नाणीं पाडणारे कारागीरहि जुनेच.

ईस्ट इंडिया कंपनीच्या टांकसाळी तेव्हांच्या दृष्टीनें जरा सुधारलेल्या होत्या. त्यामुळें त्या टांकसाळींतील नाणीं व्यवस्थित असत. या टांकसाळीची सर्व साधन सामुग्री कंपनीनें इंग्लंडमधून आणण्यांत आली होती. युरोपांतील पहिली टांकसाळ बोल्टन नांवाच्या कारागिरानें सुरू केली. तो फक्त तांब्याचीं नाणीं पाडी. अनेक राजांचीं नाणीं पाडून देण्याचे तो मक्तेहि घेई. पुढें अनेक टांकसाळी अस्तित्वांत आल्या. आणि सुधारलेल्या पद्धतीच्या टांकसाळीच्या साधनांसारखींच साधनें कंपनीनेंहि हिंदुस्थानांत आपल्या टांकसाळीसाठीं आणलीं.

कंपनीच्या टांकसाळींत प्रथम धातूचे पत्रे घेऊन ते दाबून जरूर तितके पातळ करून त्यांच्या पट्ट्या कापीत. पट्ट्या यंत्रांत घालून त्यांच्या वर्तुळाकार चकत्या पाडीत. नंतर त्या प्रमाणशीर मऊ करून पोलादी पंचनें दोन्हीं बाजूंनीं ठोकीत म्हणजे त्यांवर राजचिन्ह व मूल्य उमटून नाणें तयार होई. प्रत्येक नाण्याचें वजन झालें म्हणजे तीं बाहेर पाठवीत. अशी कंपनीची व्यवस्था असे.

व्हिक्टोरिया राणी, सातवे एडवर्ड व पंचम जॉर्ज यांच्या राजवटींतील रुपये चांदींत अल्प तांबे मिश्रण करून पाडीत. त्याचप्रमाणें खालील किंमतीचें रुप्याचें नाणेंहि असे. आणि ढब्बूपासून पै पर्यंतचीं नाणीं ब्रॉंझचीं पाडीत. पंचम जॉर्जकालीन आण्याचें नाणें निकलचें होतें.

आठव्या एडवर्डच्या रुपयांत ११ भाग चांदी व १ भाग तांबें होतें; आणि तांब्याच्या नाण्यांत ७५ टक्के चांदी व २५ टक्के निकल होतें. आण्याचें नाणें निकलचेंच होते.

चांदी फार महागली तेव्हांपासून नाण्याच्या धातूंत ५० टक्के चांदी व ५० टक्के इतर धातु असे प्रमाण होते. या धातूचे रुपये, अधेल्या व पावल्या पाडण्यांत आल्या. दुणेल्या व आणेल्या कपोनिकलच्या व कांहीं वेळा क्युओनिकलच्या पाडल्या. त्यानंतर २ पैसे, १ आणा, २ आणे कपोनिकलचे व पावली, अधेली व रुपया हीं नाणीं शुद्ध निकलचीं पाडण्यांत आलीं. पैशाचे रूप अनेकदां बदललें. प्रथम तो ७५ ग्रेन वजनाचा होता. नंतर त्याला छिद्र पाडण्यांत येऊन रिंगाचा आकार आणला. त्याचे वजन ३० ग्रेन होतें. पुढें ते छिद्र बंद करण्यांत येऊन पैसा ६० ग्रेन वजनाचा झाला आणि कांहीं कालानें त्याचें वजन पुन्हां घटून तो ४५ ग्रेनवर आला.

नोटा पूर्वी ५, १०, ५०, १०० अशा रुपयांच्या होत्या. नंतर १, २, ५, १०, १००, १००० अशा रुपयांच्या चलनांत आल्या. आकार रंग इ. बाबतींत त्यांत ठळक फरक होताच.

भारतीय चलन (१)

दीडशें वर्षेपर्यंत पारतंत्र्यांत पिचत पडलेल्या भारतानें सन १९४७ च्या १४ ऑगस्टच्या मध्यरात्रीनंतर पारतंत्र्यांतून मुक्त होऊन स्वातंत्र्याच्या आवारांत पदार्पण केलें. १५ ऑगस्टचा हा दिवस भारताच्या आयुष्यांत सुवर्णाक्षरांनीं लिहिण्याच्या योग्यतेचा ठरला.

राजकीय, औद्योगिक, आर्थिक व सामाजिक क्षेत्रांत सर्व तऱ्हेनें भारताची पिळवणूक झाल्यानें भारत अगदीं हतबल झाला होता. अशा स्थितींत देखील भारताला स्वातंत्र्याचें पूर्व-वैभव प्राप्त व्हावें या इच्छेनें प्रयत्न करणारे महात्मे राष्ट्रसभेच्याद्वारें खटपट करण्यास उद्युक्त झाले आणि त्यागाची परमावधि करून स्वातंत्र्य संपादण्याचा त्यांनीं निश्चय केला.

दे. दादाभाई नौरोजी, लो. टिळक, रानडे, गोखले, सुरेंद्रनाथ बानर्जी, फिरोजशहा मेथा इ. दिवंगत पुढाऱ्यांनीं आरंभलेल्या प्रयत्नांस पुढें अधिक फल दिसूं लागलें आणि कारावास पत्करून हालअपेष्टा सोसून देशासाठीं रक्त देण्यासहि आपले तरुण वीर उद्युक्त झाले. सन १९१४ च्या पहिल्या महायुद्धांत भारतीयांच्या अपूर्व पराक्रमानें इंग्रजांना यश मिळालें होतें; तथापि १९३९ चें दुसरें महायुद्ध सुरू झाल्यानंतर त्या युद्धांत भाग घ्यावयाचा नाहीं असा आदेश देऊन शेवटीं १९४२ सालीं तर म. गांधीजींच्या नेतृत्वाखालीं राष्ट्रसभेनें 'चलेजाव'ची घोषणा केली. या घोषणेमुळें राजकर्त्यांनीं दडपशाहीच्या धुमाकुळांतून अनेक भारतीय देशभक्तांची आहुति घेतली व कित्येकांना कारावासांत दीर्घकाल पिचत राहावें लागलें.

देशत्याग करून गेलेले नेताजी सुभाषचंद्र बोस यांनीं परदेशांत आझाद सैन्याची उभारणी करून आपल्या हालचालींना सुरवात केली व १९४३ च्या जुलैमध्यें त्यांनीं सिंगापूरला 'स्वतंत्र हिंद सरकार'ची स्थापना केली. या वेळीं म. गांधी पुणें येथें आगाखान वाड्यांत अटकेंत होते. त्यांची प्रकृति बिघडल्यानें १९४४ त त्यांची सुटका झाली. १९४५ त कॅांग्रेस वर्किंग कमिटीच्या व इतरहि सर्व पुढाऱ्यांची मुक्तता करण्यांत आली. महायुद्ध संपतांच इंग्लंडमध्यें नव्या निवडणुका होऊन मजूर पक्ष अधिकारारूढ झाला.

हिंद राजकारणाचा प्रश्न सोडविण्यासाठीं ब्रिटिश मंत्रिमंडळानें ता. १८ मार्च रोजीं क्रिप्स प्रभृति त्रिमंत्र्यांना हिंदुस्थानांत पाठविलें. त्यांनीं कॅांग्रेस, लीग, हिंदुमहासभा व इतर अनेक, पुढाऱ्यांच्या भेटी घेऊन त्यांना आपली योजना समजावून दिली. पुढें ता. १६ जून १९४६ रोजीं हंगामी सरकारच्या स्थापनेसंबंधीं त्रिमंत्री व व्हॉइसरॉय यांनीं घोषणा केली. तथापि कॅांग्रेस व लीग यांच्यांतील वादामुळें २४ जूनला कॅांग्रेसनें त्रिमंत्र्यांची हंगामी सरकारसंबंधींची योजना फेटाळल्यानें ता. २६ ला ती योजना रद्द केल्याचें मंत्री व व्हॉइसरॉय यांनीं जाहीर केलें आणि ता. २९ जून १९४६ रोजीं त्रिमंत्री इंग्लंडला परतले.

पुढें मुंबई येथें ता. ७ व ८ जुलै रोजीं ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचें अधिवेशन होऊन त्यांत त्रिमंत्री-योजना स्वीकारण्याचा ठराव २०४ विरूद्ध ५१ मतांनीं पास झाला.

ता. १८ रोजीं ब्रिटिश पार्लमेंटांत भारत-मंत्र्यांनीं शिष्टमंडळाच्या कार्याबद्दल निवेदन केलें कीं — " अमेरिकेची लोकसंख्या, रशियन लोकसंख्या, ब्रिटिश बेटांतील जनसंख्या व ब्रि. साम्राज्यांतील सारे गोरे या सर्वांच्या लोकसंख्येची बेरीज केली तरी हिंदुस्थानांतील लोकसंख्येची बरोबरी होणार नाहीं. या विशाल देशांत नुसती लोकसंख्या मोठी आहे असें नाहीं तर जाती, धर्म, याचे संबंधांतहि परस्परविरोधी मतप्रवाह आहेत. त्यामुळें देशाची राज्यघटना व देशाचें भवितव्य यांच्या बाबतींत भारतीय मुत्सद्यांत आपल्या जबाबदारीची जाणीव असूनहि त्यांना मनाप्रमाणें कार्य करतां येत नाहीं. काँग्रेसला अखंड हिंदुस्थान हवा तर हिंदुस्थान व पाकिस्तान असे दोन तुकडे पाडले जावे असा मुसलमानांचा दावा आहे ! "

" त्रिमंत्र्यांच्या शिष्टाईकार्यात दोन गोष्टी प्रमुख होत्या. ब्रिटिश कॉमनवेल्थ अंतर्गत वा बाहेर राहूनहि हिंदुस्थानला संपूर्ण स्वातंत्र्य मिळविण्याचा हक्क आहे आणि त्याबाबत ब्रिटिश जनता पूर्ण सहमत आहे हें भारतीयांना पटवून देणें व हिंदुस्थानांतील या दोन पक्षांमध्यें अंतर आहे तें सांधणें. आणि याबद्दल भारतीय जनतेची आतां खात्री झाली आहे. "

हंगामी मंत्रिमंडळांत शिरण्याचें काँग्रेसनें ठरविल्यावर ता. २ सप्टेंबर १९४६ रोजीं पं. जवाहरलाल नेहरू प्रभृतींनीं शपथविधीनंतर अधिकारस्वीकार केला. ता. ७ रोजीं पंडितजींनीं आपल्या धोरणाबद्दल असें निवेदन केलें —

" हिंदुस्थान सरकारच्या कारभाराचीं अधिकारसूत्रें मी व माझ्या सहकाऱ्यांनीं हातीं घेतलीं. या आपल्या प्राचीन भूमींत नवें सरकार स्थापन झालें. यालाच आम्हीं हंगामी सरकार म्हणतों. संपूर्ण स्वातंत्र्याच्या मार्गावरील हा एक महत्वाचा टप्पा होय. संपूर्ण स्वातंत्र्याच्या ध्येयमार्गानें आमचें आक्रमण चालू आहे. अजून ध्येयसिद्धी झालेली नाहीं. ज्या स्वातंत्र्यासाठीं आपण खटपट करीत आहोंत व ज्यासाठीं इतकीं वर्षें खस्ता खात आहोंत तें कोणा एका जमातीसाठीं नाहीं; तर भारताच्या सर्व जनतेसाठीं आहे. "

मिरत येथें नोव्हेंबरमध्यें काँग्रेसचें अधिवेशन झालें. त्यांतहि काँग्रेसनें नवीन योजनेस मान्यता दिली. यानंतर पं. नेहरू व सरदार बलदेवसिंग यांना ब्रिटिश मंत्रिमंडळानें लंडन येथें बोलावलें व घटनासमितीसंबंधानें वाटाघाटी झाल्या. ते परत आल्यावर ता. ९ डिसेंबर रोजीं डॉ. सिन्हा यांच्या अध्यक्षतेखालीं घटनासमितीची प्रथम बैठक सुरू झाली. पुढें डॉ. राजेंद्रप्रसाद यांची अध्यक्ष म्हणून निवड झाली. या बैठकींत हिंदी स्वातंत्र्याचा असा ठराव झाला —

" भारत देश हें एक स्वतंत्र, सार्वभौम व

पूर्ण लोकसत्ताक राष्ट्र आहे असें ही घटनासमिति जाहीर करीत असून ब्रिटिश हिंदुस्थानांत आज सामील असलेला प्रदेश हिंदी संस्थानांत समाविष्ट असणारा मुलूख, या दोहोंमध्यें अंतर्भूत न झालेले भारताचे विभाग आणि स्वतंत्र भारतांत सामील होऊं इच्छिणारे इतर घटक या सर्वांचें एक ' संघराज्य ' बनून त्याचा राज्यकारभार चालविण्यासाठीं राज्यघटना तयार करण्याचा निर्धार ही समिति जाहीर करीत आहे. या स्वतंत्र सार्वभौम संघराज्याच्या, घटक प्रांतांच्या किंवा त्यांच्या शासन-यंत्राच्या सत्तेचें अधिष्ठान व उगमस्थान भारताची जनता आहे. या सर्वभौम लोकसत्ताक संघराज्याचें अखंडत्व कायम राखलें जाईल, आणि इतर सुधारलेल्या स्वतंत्र देशांप्रमाणें कायदा व न्याय यांवर आधारलेली त्याची सत्ता भूभाग, समुद्र व आकाश यांवर निरंकुश चालेल. जगाच्या राष्ट्रमालिकेंत भारत आपलें मानाचें स्थान प्राप्त करील आणि जगांत शांति नांदवावी, मानव्याचें कल्याण साधावें म्हणून यथाशक्ति प्रयत्न करील. "

काँग्रेसनें योजना संमत करून हंगामी मंत्रिमंडळ तयार केलें. त्यांत मुस्लीम लीगनें भाग घेण्याचें प्रथम नाकारलें; पण पुढें आपले प्रतिनिधि मंत्रिमंडळांत पाठविले. तथापि त्यांनीं द्यावें तसें सहकार्य न देतां विरोधच केला व घटनासमितींत भाग घ्यावयाचा नाहीं असें ठरविलें. तडजोडींत अपयश येऊन लॅार्ड वेव्हेल गेल्यावर व्हॅाइसरॅायपदीं लॅार्ड मौंटबॅटन आले. त्यांनीं नवी योजना मांडली. त्या योजनेनें भारतविच्छेदन होऊन हिंदुस्थानचे भारत व पाकिस्तान असे दोन स्वतंत्र भाग करण्यांत आले व त्यांवर दोन स्वतंत्र गव्हर्नर जनरल नेमण्यांत आले.

ब्रिटिश मुख्य प्रधान क्लेमंट ॲटली यांनीं हिंदुस्थानच्या स्वराज्यदानाबद्दल कॅामन्स सभेंत भाषण केलें आणि नंतर ते नभोवाणीवरून म्हणाले — " अनेक शतकें हिंदुस्थानांत कलह माजले होते. पण इंग्रजी सत्तेखालीं सर्व देश एकत्र आला. तें ऐक्य कायम रहावें ही आमची मनःपूर्वक इच्छा ! हिंदी प्रश्न योग्य रीतीनें सुटण्याला मंत्रियोजना ठीक होती; पण ती हिंदी लोकांना पटली नाहीं. म्हणून विभाजन करावें लागलें. उभय पक्षांत सलोखा नांदावा म्हणून ही योजना करावी लागली. हिंदी लोकांना आमचें नेहमींच सहकार्य लाभेल."

भारतमंत्री लॅार्ड लिस्टोवेल यांनीं नव्या योजनेची घोषणा लॅार्डांच्या सभेंत केली. त्यानंतर वृत्तपत्रकारांना मुलाखत देतांना ते म्हणाले — " उभयपक्षीं तडजोडीनें हा मार्ग निघालेला असल्यानें तो समाधानकारक आहे. भारत स्वातंत्र्यमंदिरांत प्रवेशत असून त्याचें

दास्य आतां संपलें आहे. अशा वेळीं आमची सदिच्छा त्याच्या पाठीशीं असून यामुळें जातीय कलह बंद पडतील अशी अपेक्षा आहे."

पुढें ता. १४ ऑगस्टच्या मध्यरात्रीं हिंदुस्थान स्वतंत्र झाल्याची ग्वाही फिरली.

१४ ऑगस्टच्या रात्रीं ११ वाजतां दिल्ली येथें घटना परिषदेच्या अधिवेशनास आरंभ झाला. घटना समितीचे अध्यक्ष बाबू राजेंद्र प्रसाद यांनीं प्रास्ताविक भाषणांत म्हटलें — "आपल्या स्वातंत्र्य संग्रामांत ज्या ज्ञात अज्ञात नरवीरांनीं आपलीं शिरकमलें मातृ-भूमीच्या चरणीं अर्पण केलीं त्या सर्वांना श्रद्धांजलि अर्पण असो. आपल्या स्वातंत्र्य-दरबारांत सर्वांना योग्य न्याय व औदार्याची वागणूक मिळेल. सर्वांचा धर्म, संस्कृति, भाषा सुरक्षित राहून नागरिकत्वाचे सारे समान अधिकार मिळतील."

सत्तासंपादनानंतर पं. जवाहरलाल नेहरू म्हणाले — "भारतीय जनतेच्या आत्मक्लेशानें व त्यागानें प्राप्त होणाऱ्या स्वातंत्र्यसंपादनाच्या या महान् क्षणीं मी, भारत व भारतीय जनता यांच्या सेवेला वाहून घेण्याची, भारताला जगांत मानाचें स्थान मिळवून देण्यासाठीं व जागतिक शांतता व मानवतेचें कल्याण यांच्या पूर्तीकरतां आपला हातभार लावण्यासाठीं आजीव प्रयत्न करण्याची प्रतिज्ञा करतों. भारत नवचैतन्यानें जागृत होऊन स्वातंत्र्य-संपादन करीत आहे अशा वेळीं भारतमातेच्या सेवेंत आम्हीं आमचें जीवन वेंचू अशी प्रतिज्ञा करूं."

ता. १५ शुक्रवारीं सकाळीं ब्रिटनकडून सत्ता स्वीकारण्यासाठीं हिंदी पार्लमेंटची शेवटची सभा होऊन मतांतराच्या कार्यक्रमांतील शेवटचा कार्यभाग उरकण्यांत आला. संदेश-वाचन व लॉर्ड मौंटबॅटन आणि अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांचीं भाषणें झाल्यावर ३१ तोफांची सलामी होऊन समितीच्या इमारती-वर राष्ट्रध्वज फडकविण्यांत आला. उत्तर व दक्षिण घुमटांवरील युनियन जॅक याच वेळीं खालीं काढण्यांत आले.

स्वातंत्र्य-घोषणा झाली. हिंदुस्थान स्वतंत्र झाला. हिंदुस्थानच्या-स्वतंत्र भारताच्या स्वतंत्र राज्यकारभारास उत्सुकतेनें, उत्साहानें व स्वयंस्फूर्तीनें सुरवात झाली. घटनासमिती-कडून राज्यघटना तयार झाल्यावर ती २६ जानेवारी १९५० रोजीं भारत देशास लागू झाली.

— ३१ —

भारतीय चलन (२)

स्वतंत्र भारताचा राज्यकारभार सुरू झाल्यावर आरंभीं, इंग्रजांचें जें हिंदी चलन येथें चालू होतें तें तसेंच चालू ठेवण्यांत आलें. तें असें :—

ब्राँझचें — एक पै, दीड पै (अर्धा पैसा) पैसा, ढबू.

निकलचें — अर्धा आणा, आणा, दोन आणे, चार आणे, अधेली व रुपया.

रुप्याचें — पावली, अधेली व रुपया. या रुपयाचें वजन १८० ग्रेन असून त्यांत अकरा हिस्से चांदी व एक हिस्सा जळ असे.

कागदी — रुपया, २ रुपये, ५, १०, १००, १००० रुपये अशा किंमतीचें होतें.

स्वतंत्र भारताचें नवीन चलन सुरू झालें तें असें :—

ब्राँझचें — छोट्या आकाराचा पैसा. याच्या एका बाजूनें अशोक चक्रांकित भारताचें राष्ट्रचिन्ह व भारत व India अशीं अक्षरें आणि दुसऱ्या बाजूनें नाण्याची किंमत व खालीं सन.

निकलचें — अर्धा आणा, आणा, दोन आणे, चार आणे. यांवरहि वरील प्रमाणेंच ठसा असे.

चांदीचें — पावली, अधेली व रुपया. या नाण्यांवर एका बाजूने भारताचें सिंहमुखी राष्ट्रचिन्ह व भारत व India अशीं अक्षरें आणि दुसऱ्या बाजूनें धान्यांच्या दोन कणसांमध्यें नाण्यांची किंमत व खालीं सन आहे.

कागदी — १ रुपया, २ रुपये, ५, १०, १००, १००० रुपये अशा किंमतीचें कागदी चलन आहे. एक रुपयावर पुढच्या बाजूनें डावीकडे कागदांतच राष्ट्रचिन्ह असून उजवीकडेहि तें ठळक मुद्रणांत जांभळट रंगांत आहे. वरच्या बाजुस Government of India व त्या खालीं, मधोमध रोमन लिपींत One rupee व देवनागरींत एक रुपया अशी किंमत दिली आहे. त्याखालीं नंबर व रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरची सही आहे. मागील बाजूनें डावीकडे दोन कणसांमध्यें किंमत व त्या खालीं सन आहे. त्याच बाजूस मध्यें इंग्रजी, गुजराती, कानडी, अरबी इ. आठ भाषांत किंमत दिली आहे. आकार व तांबूस इ. रंग अशा किंचित फरकांची दोन रुपयांची नोट आहे.

यानंतर भारत राष्ट्रानें मॅट्रिक पद्धतीचें अवलंबन करून, क्षेत्रमापन, घनमापन इ. प्रमाणें नाण्यांतहि तसे नाविन्य आणलें आणि नवीं नाणीं प्रचारांत आणलीं. रुपया नवा व जुना याचें मूल्य एकच; पण रुपयाच्या ६४ पैशांऐवजीं एका रुपयास शंभर नये पैसे निश्चित केले. त्यामुळें नव्या जुन्याची सांगड घालतांना दोन दिवस अवघड दिसलें तरी दशांश पद्धतीनें व्यवहार सरळ करून टाकला.

हीं नवीं नाणीं अशीं आहेत :—

एक नया पैसा – तांबें किंवा पितळ धातूचें हें नाणें छोटें व वाटोळें आहे.

दोन नये पैसे – सफेत निकलचें हें नाणें वाटोळें निमुळतें अष्टकोनी असून आकार छोटा आहे.

पांच नये पैसे – सफेत निकलचें हें नाणें निमुळतें चौकोनी आहे.

दहा नये पैसे – सदर धातूचें हें निमुळतें अष्टकोनी असून आकार जरा मोठा आहे.

पंचवीस नये पैसे (पावली) हें नाणें वर्तुळाकार शुद्ध चांदीसारखें आहे.

पन्नास नये पैसे (अधेली) हें पावलीपेक्षां मोठें पण याचा आकार पावली सारखाच.

शंभर नये पैसे (एक रुपया) याचा आकार मोठा पण अधेली सारखाच.

पावली, अधेली व रुपया या नाण्यांच्या वाटोळ्या घेरास कंगोरे आहेत.

एक नया पैशाच्या पुढच्या बाजूस अशोक चक्रांकित सिंहमुखी राष्ट्रचिन्ह असून डाव्या बाजूस देवनागरी लिपींत 'भारत' व उजव्या बाजूस रोमन लिपींत India अशीं अक्षरें आहेत. मागच्या बाजूस वर्तुळांत 'रुपये का सौंवा भाग' अशीं अक्षरें असून मध्यें 1 असा एकाचा आंकडा व 'खालीं नया पैसा' हीं अक्षरें व सन आहे.

दोन नये पैसे या नाण्याच्या पुढच्या बाजूनें राष्ट्रचिन्हासह देवनागरींत 'भारत' व रोमनमध्यें India अशीं अक्षरें असून मागील बाजूनें वर्तुळांत 'रुपये का पचासवां भाग' व मध्य 2 असा दोनचा आंकडा, खालीं 'नये पैसे' आणि सन आहे.

पांच नये पैसे या नाण्याच्या मागील बाजूवर 'रुपये का वीसवां भाग' अशीं वर्तुळाकार अक्षरें असून मध्यें 5 असा आंकडा खालीं 'नये पैसे व सन आहे'.

दहा नये पैसे या नाण्याच्या मागच्या बाजूवर 'रुपये का दसवां भाग' अशीं वर्तुळाकार अक्षरें असून मध्यें 10 आंकडा व खालीं 'नये पैसे' अशीं अक्षरें व सन आहे.

पंचवीस नये पैसे या नाण्याचा मागच्या बाजूनें 'रुपये का चौथा भाग' अशीं अक्षरें अर्धवर्तुळांत असून खालील अर्धवर्तुळ वेलीचें, मध्यें 25 आंकडा, त्या खालीं नये पैसे व सन आहे.

पन्नास नये पैसे या नाण्याच्या मागच्या बाजूनें 'रुपये का आधा भाग' अशीं अक्षरें अर्धवर्तुळांत असून खालील अर्धवर्तुळ वेलीचें मध्यें 50 आंकडा, त्या खालीं 'नये पैसे' व सन आहे.

रुपयाच्या नाण्याच्या मागील बाजूवर वेलीचें वर्तुळ असून त्यांत वरच्या बाजूनें 'सौ नये पैसे' अशीं गोलाकार अक्षरें, डाव्या उजव्या बाजूनें दोन धान्याचीं कणसें, मधोमध 1 असा आंकडा, खालीं 'रुपया' अशीं अक्षरें व सन आहे.

पांच, दहा, पंचवीस व पन्नास पैशांच्या आणि रुपयाच्या पुढच्या बाजूवर राष्ट्रचिन्ह, 'भारत' India अशीं पहिल्या दोन नाण्यांप्रमाणेंच अक्षरें आहेत.

पांच रुपयांची नोट — या नोटीची लांबी पांच इंच व रुंदी २.७ आहे. रंग आंतून पिवळट व बाहेरून हिरवट आहे. डाव्या बाजूनें कागदांत अशोक चक्रांकित राष्ट्रचिन्ह व उजव्या बाजूस तेंच चिन्ह मोठ्या आकारांत

हिरवट रंगांत ठळक आहे आणि खालीं नंबर आहे. मध्यें वरच्या बाजूस Guaranteed by The Central Government अशीं बारकीं अक्षरें असून त्या खालीं Reserve Bank of India अशीं ठळक अक्षरें व खालीं त्यापेक्षां लहान अक्षरांत I promise to pay the bearer on demand the sum of असा मजकूर आहे. आणि त्याच्या खालीं Five rupees पांच रुपये व बारक्या अक्षरांत At any office of issue असें लिहिलें आहे. मजकुराखालीं रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरची स्वाक्षरी आहे. मागच्या बाजूनें डावीकडे 5 हा ठळक आंकडा, मध्यें वरच्या बाजूस Reserve Bank of India व खालीं आठ भाषेंत पांच रुपया अशीं अक्षरें आणि हरणाचें चित्र आहे. उजवीकडे Reserve Bank of India अशीं वर्तुळाकार अक्षरें व मध्यें झाडालगत वाघाचें चित्र आहे.

दहा रुपयांची नोट — या नोटीची लांबी इंच ५.६ व रुंदी ३.२ आहे. पुढच्या बाजूनें सर्व कांहीं पांचांच्या नोटीसारखेंच; पण रंग पिवळट, निळसर व जांभळट, नंबर डाव्या उजव्या दोन्ही बाजूनें आणि मध्यें मूल्य Ten rupees ' दस रुपये ' असा मजकूर आहे. मागच्या बाजूनें डावीकडे वर 10 आंकडा, खालीं आठ भाषांत ' दहा रुपये ' अशीं अक्षरें, मध्यें वरच्या बाजूस Reserve Bank of India हा मजकूर, खालीं जहाज व त्याखालीं रिझर्व्ह बँकेचें नांव व व्याघ्रचित्र आणि उजवीकडे 10 आंकडा, मध्यें कोरी जागा व खालीं ' दस रुपये ' अशीं अक्षरें आहेत.

शंभर रुपयांची नोट — या नोटीचा कागद जाडसर व जास्त चिवट असून नोटीची लांबी इंच ६.७ व रुंदी ४.२ आहे. रंग पिवळट जांभळट, हिरवट व पुसट इंद्रधनुष्यासारखा आहे. नंबर डाव्या उजव्या दोन्ही बाजूनें लाल रंगांत आहे. डावीकडे व उजवीकडे 100 असा आंकडा असून मधोमध One hundred rupees ' एक सौ रुपये ' असा मजकूर व खालीं रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरची सही आहे. मागच्या बाजूनें डावीकडे चौदा भाषांत शंभर रुपये असा मजकूर आहे. मध्यें वरच्या बाजूस Reserve Bank of India अशीं ठळक अक्षरें व खालीं अशाच अक्षरांच्या वर्तुळांत व्याघ्रचित्र आहे. उजवीकडे वरच्या बाजूस ' एक सौ रुपये ' मध्यें कागदांतील राष्ट्रचिन्हाची जागा आणि खालीं ' Rs.100 ' असा मजकूर आहे. शंभर रुपयांच्या नोटींत विशेष लक्षांत ठेवण्यासारखें म्हणजे तिच्या पुढच्या बाजूनें गव्हर्नरच्या स्वाक्षरीच्या एका बाजूस ' Rupees 100 ' व दुसऱ्या बाजूस R B I (रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया) या अक्षरांचा मोनोग्रॅम असतो.

नव्या-जुन्या नाण्यांचा मेळ असा होता :-

१	जुना पैसा	—	२ नये पैसे
२	जुने पैसे	—	३ नये पैसे
३	,,	—	५ ,,
१	आणा	—	६ ,,
१।	आणा	—	८ ,,
१॥	आणा	—	१० ,,
२	आणे	—	१२ ,,
२॥	,,	—	१६ ,,
३	,,	—	१९ ,,
४	,, (पावली)	—	२५ ,,
५	,,	—	३१ ,,
६	,,	—	३७ ,,
७	,,	—	४४ ,,
८	,, (अधेली)	—	५० ,,
९	,,	—	५६ ,,
१०	,,	—	६२ ,,
११	,,	—	६९ ,,
१२	,,	—	७५ ,,
१३	,,	—	८१ ,,
१४	,,	—	८७ ,,
१५	,,	—	९४ ,,
१६	,, (१ रुपया)	—	१०० ,,

इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, रशिया वगैरे परक्या देशांशीं भारतीयांचा व भारत राष्ट्राचा व्यवहार सुरू असल्यानें अशा ठळक राष्ट्रांच्या नाण्यांची माहिती भारतीयांना असणें आवश्यक आहे. ती माहिती पुढें ओझरती दिली असून भारतीय रुपयांशीं त्यांचा मेळ कसा बसतो हेंहि दाखविलें आहे. पौंड, डॉलर, फ्रँक, मार्क, रुबल यांच्या किंमती स्थिर नसून त्या वेळोवेळीं बदलूं शकतात.

देश	नाणें	बोधचिन्ह	१ रु. किती ?
अफगाण	अफगानी	A	३-६
ऑस्टेलिया	एल्	£	०-९
इंडोचायना	पियास्ट्रे	Pr.	७-३
इंडोनेशिया	रुपिया	Rp.	२-४
इराण	रिअल	Rl.	१७-९
इराक	दिनार	Dn.	०-८
पाकिस्तान	रुपी	Rs.	०-७
सियाम	भाटिकल	B	४-४
सिंगापूर	डॉलर	$	०-६
अर्जेंटाईन	पेसो	Ps	२-९
ब्राझील	क्रुझेरिओ	Cr.	१५-२
कॅनडा	डॉलर	Can	०-२
जपान	येन	J	७-६
मेक्सिको	पेसो	Ps.	२-६
फिलीपाइन्स	पेसो	Ps.	०-४
आस्ट्रिया	शिलिंग	Sc.	५-५
बेल्जम	फ्रँक	BFr	१०-५
झेकोस्लोवाकिया	कोरुना	Kcs.	१·५
फ्रान्स	फ्रँक	FF.	७३-५
जर्मनी	मार्क	DM.	०-८९
इटली	लिरा	Lr.	१३१-६
नॉर्वे	क्रोन	Kr.	१-५
पोर्तुगाल	इस्कूद	Esc.	६-०
स्पेन	पेसेता	Ptas.	८-२
स्वीडन	क्रोन	Kr.	१-१
स्विट्झर्लंड	फ्रँक	SFr.	०-९
रशिया	रुबल	Rble.	०-९

इंग्लंड — पौंड — रुपये १३-३६
अमेरिका — डॉलर — रुपये ४-७८
टोंगा (द.पॅसि.) कौला — रुपये २५०
पौंड, डॉलर व कौला हीं नाणीं सोन्याचीं आहेत.

नाणीं पाडण्याची नवी पद्धत

नाणीं तयार करण्याची प्राचीन पद्धत ठीक नव्हती. धातूचे तुकडे पाडून त्यांच्यावर अक्षरें कोरण्याची जुनी चाल होती. त्यानंतर ओतीव नाणीं तयार करूं लागले. रस ठराविक सांच्यांत ओतून नाण्यासाठीं तयार केलेली चकती गरम असतांना तिजवर ठसा उमटवीत. पुढें त्या कृतींत जास्त सुधारणा होत जाऊन आजची पद्धत अस्तित्वांत आली.

आजची टांकसाळ आधुनिक यंत्रांनीं सुसज्ज असते. या टांकसाळींत सोनें चिपांच्या अथवा विटांच्या स्वरूपांत येतें. सोन्याच्या एका विटेचें वजन चारशें औंस असतें.

चांदीची ढेप मोठी असते. तिचें वजन शंभर पौंड असतें. सोन्याप्रमाणें चांदीहि प्रथम अगदीं शुद्ध अशीच आणण्यांत येऊन नंतर त्या धातूंत आवश्यक मिश्रण करण्यांत येतें.

सोन्याचीं नाणीं हीं सोनें व तांबें यांच्या बहुधा २२.२ या प्रमाणांत तयार केलेल्या मिश्र धातूपासून बनवतात.

चांदीचीं नाणीं चांदी व तांबें यांच्या विशेषतः ३७.३ या प्रमाणांत तयार केलेल्या मिश्र धातूपासून बनवतात.

ब्रॉंझच्या नाण्यांसाठीं तांबें, टिन व जस्त यांच्या मिश्रणापासून बनवलेली मिश्र धातु वापरण्यांत येते.

निकलच्या नाण्यासाठींहि खास व्यवस्था असून प्रक्रिया शाखेंत निकलवर प्रक्रिया केली जाते. नाण्यांत निकल दोन कारणांसाठीं विशेषेंकरून वापरतात. पहिलें कारण असें कीं, ही धातु अत्यंत वरच्या उष्णता मानावर वितळली जाते, त्यामुळें बनावट नाणीं तयार करणें सहजसाध्य नसतें. निकल धातु लोहचुंबकाकडून आकर्षिली जाते, त्यामुळें खोटीं नाणीं चटकन सांपडतात हें निकल वापरण्याचें दुसरें कारण आहे.

टांकसाळींत एक मेल्टिंग विभाग असतो. त्यांत चार पोटविभाग असतात. एक सोन्यासाठीं, दुसरा चांदीसाठीं, तिसरा निकलचा व चौथा ब्रॉंझचा.

सोन्याच्या विभागांत आठ दहा भट्टया असतात. त्यामुळें जास्त सोनें एकदम उष्ण करतां येतें. प्रत्येक कुसीबलमध्यें सुमारें पांच हजार पौंड किंमतीचें सोनें मावतें. तेथील कर्मचारी हें मिश्रण अतिशय जलद व काळजीपूर्वक घुसळतात. त्या मिश्रणांत वर दिलेल्या प्रमाणांत तांबें मिसळल्यानंतर त्या मिश्रणापासून लांबट रूळ तयार करतात. त्यांची तपासणी केल्यावर ते पुढील क्रियेस तयार ठेवतात. रुळांचे कांठ मशिनमधून नीट नेटके झाल्यावर त्यांचें वजन करून ते रोलिंग रूममध्यें पाठवितात. रुळाची जाडी अर्धा इंच असते. हे रूळ शंभरांश इंचाइतके पातळ करतात. पुढें कित्येक क्रिया झाल्यावर या रुळापासून एका फीत तयार करतात. ही फीत दीड इंच रुंद व एक विसांश इंच जाड असते. या जाडीचें कसोशीनें परीक्षण करण्यांत येतें. ही जाडी अगदीं व्यवस्थित व सारखी असावी

लागते. ती सारखी नसल्यास या फितीपासून तयार झालेली नाणीं एक तर जास्त वजनांचीं किंवा हलकीं होतात. पुढें ही फीत कटिंगरूम-मध्यें पाठविण्यांत येते.

कटिंगरूममध्यें कित्येक अजस्र व मोठीं यंत्रें असतात. या यंत्रांतून त्या फितीपासून ठराविक आकाराच्या चकत्या पडतात. त्या दर मिनिटाला दीडशें असतात. चकत्या पाडून फितीचा भाग शिल्लक राहिल्यास तो पुन्हां मेल्टिंगरूममध्यें पाठविण्यांत येतो. यानंतर त्या चकत्यांवर चिन्हें उमटविण्याची क्रिया घडते. चकत्यांचे काठ जाड करण्यासाठीं त्या चिन्हांच्या क्रियेपूर्वीच एका निराळ्या यंत्रांतून त्या व्यवस्थित उतरवितात.

चकत्या अशा तयार झाल्या म्हणजे त्या खूप तापवतात व कोळशाच्या ठराविक भुकटींत ठेवतात. ही भुकटी पेट्यांत असते. ती हळूहळू एका फर्नेसद्वारें एका सांखळीवर जाते. ती सांखळी बरीच लांब असते. अशी ही क्रिया तीन तास चालते.

चकत्यांवर चिन्हें उमटविण्यापूर्वी चकत्या सौम्य गंधकाम्लांत टाकतात. यानंतर बिचवूड सॉ डस्टच्या सहाय्यानें त्या स्वच्छ करतात व कॉइनिंग प्रोसेससाठीं पाठवितात.

कॉइनिंगरूम अतिशय गजबजलेली असते. वीस यंत्रांनीं एका मिनिटांत येथें नव्वद चकत्यांवर चिन्हें उमटविलीं जातात. प्रत्येक चकतीवर या अवजड यंत्राचा तीस टन वजनाचा दाब बसून चिन्हांची क्रिया घडते. एका दिवसांत एक यंत्र चाळीस हजार चकत्यांवर चिन्हें उमटवितें. ही क्रिया झाल्यावर नाणें तयार झालें असें म्हणण्यास हरकत नाहीं; तथापि नाण्याच्या तपासणीनें मुख्य काम झाल्यावरच तें व्यवहारांत उपयोगासाठीं बाहेर घालण्यांत येतें. म्हणून नंतर त्याची तपासणी होत असते.

तपासणी विभागांत नाण्यांचें प्रथम वजन करण्यांत येतें. हें वजन अतिसूक्ष्म व नाजूक अशा ऑटोमॅटिक तराजूवर करतात. हे तराजू कांचेच्या आवरणांत असतात. वजन कमी जास्त झालें तर तें नाणें पुन्हां मेल्टिंगरूममध्यें पाठवितात.

यानंतर नाण्याच्या आवाजाची परीक्षा असते. नाण्याचा परीक्षक आपल्या विभागांत नाणीं आल्यावर तीं एकामागें दुसरें अशीं पटापट एका स्टीलच्या जाड टेबलावर वाजवीत असतो. ठीक नादाचीं नाणीं एका बाजूनें लोटलीं जातात; पण नाणें खराब, तडा गेलेलें किंवा बदनाद असलें तर तें आवाजावरून तत्काळ त्याच्या लक्षांत येतें व तें तो निराळें टाकतो. अशीं निरुपयोगी नाणीं पुन्हां मेल्टिंग-रूममध्यें पाठविण्यांत येतात. यानंतर पुन्हां एकदां तज्ज्ञाच्या तपासणीनंतर नाणीं पिशव्यांत भरून कोठीगृहांत पाठवितात. कारण तीं आतां चलनासाठीं तयार झालेलीं असतात.

मेल्टिंग खात्यांतील चांदीच्या विभागांत काम सुरु असतांना इलेक्ट्रिक क्रेनच्या सहाय्यानें एक प्लम्बॅगो मेल्टिंग पॉट भट्टीच्या एका छिद्रांतून बाहेर काढतांना दिसतो. यांत मिश्रण वगैरेनंतर द्रव स्थितींत तयार असलेली अंदाजें

३१० पौंड वजनाची चांदी असते. पुढें अनेक क्रियांनंतर ही चांदी लांबट रुळांत परिवर्तीत होते; आणि सोन्याप्रमाणेंच या रुळाची फीत तयार करण्यांत येऊन ती कटिंगरूममध्यें पाठविण्यांत येते.

कटिंगरूममध्यें त्या चांदीच्या फितीच्या ठराविक आकाराच्या चकत्या पाडल्या जातात. पुढें आवश्यक क्रिया घडल्यावर त्या कॉइनिंग-रूममध्यें पाठविण्यांत येतात आणि तेथें यांत्रिक पद्धतीनें त्यांच्यावर चिन्हें उमटविण्यांत आलीं म्हणजे चांदीचें नाणें तयार होतें.

यानंतर सोन्याच्या नाण्याप्रमाणेंच या नाण्याचेंहि वजन, नाद वगैरेची कसोशीनें तपासणी होऊन परीक्षेंत उतरलेलीं नाणीं पिशवींत भरून कोठीगृहांत पाठविण्यांत येतात आणि सदोष नाणीं पुन्हां मेल्टिंगरूममध्यें पाठविण्यांत येतात. चांदीच्या नाण्यांत रुपया हें श्रेष्ठ नाणें मानतात. रुपया या शब्दाची व्युत्पत्ति ' रूप्यम् ' या संस्कृत शब्दांत आहे. रूप्यम् म्हणजे रुपें किंवा चांदी.

सोनें किंवा चांदी या धातूंचीं जशीं नाणीं पाडतात त्याच पद्धतीनें कमी अधिक फरकानें इतर धातूंचींहि नाणीं पाडण्यांत येतात.

सोनें, चांदी, तांबें किंवा इतर धातू असो तिचें सूक्ष्म रीतीनें वजन केल्यानंतरच ती ती धातू कर्मचाऱ्यांकडे दिली जाते; आणि धातूच्या वजनाप्रमाणें ठराविक संख्येंत नाणीं तयार करून तेथेंच परत पाठवावीं लागतात. जर एखादें नाणें हरवलें गेलें तर त्याचा अत्यंत कसोशीनें तपास करून तें नाणें शोधून काढण्यांत येतें. त्याचप्रमाणें कर्मचाऱ्यांच्या काम कर-ण्याच्या ठिकाणीं जरी थोडीशीहि या धातूंची भुकटी पडलेली असली तरी ती संकलित करून मेल्टिंग पॉटमध्यें तापवून पुन्हां मूळ धातूंत परिवर्तित करतात. इतकी कसोशीची काट-कसर करावी लागते तेथील कर्मचाऱ्यांना.

नाण्यांची मोजणी देखील एका यंत्रानेंच करतात. मोजणी करण्याचीं नाणीं मोजणी – यंत्राच्या पन्हळीच्या आकाराच्या एका भागां-तून खालीं घसरतात. या पन्हळीच्या शेवटा-जवळ एक दांतेरी चाक असतें. त्याला गिअर असतात. नाणीं ठराविक दातांवरून घसरून खालीं येतात व त्यावरून नाण्यांची मोजणी करतात. ही क्रिया पहाण्यास बरीच मजेदार वाटते.

— ३३ —

चलनाचें तारण

जगांतील साऱ्या देशांच्या चलनांचें तारण आज तरी सोनें हेंच आहे आणि त्यामुळें सोन्याला आज विशेष महत्व आहे. प्रत्येक

राष्ट्राला कागदी चलनाचें तारण म्हणून गंगाजळीमध्यें सोनें ठेवावें लागतें. भारतानें आपल्या चलनी नोटांच्या तारणासाठीं गंगाजळींत एकशें सतरा कोटि रुपयांचें सोनें ठेवलें आहे. जगांतील राष्ट्रांच्या चलनाचें एकूण सुवर्ण तारण चार हजार कोटि डॉलर्सचें असून त्यांपैकीं सतराशें ऐंशीं कोटि डॉलर्सचें सोनें एकट्या अमेरिकेकडे आहे. अमेरिकेंत एक औंस सोन्याचा भाव पस्तीस डॉलर आहे. हा भाव वाढला तर डॉलरचें अवमूलन होत असल्यानें अमेरिका तो वाढूं देत नाहीं व डॉलरची पत कमी होऊं देत नाहीं म्हणून डॉलरला 'हार्ड करन्सी' म्हणतात. यासाठींच डॉलर मिळविण्यासाठीं प्रत्येक राष्ट्राची धडपड असते.

अमेरिकेंत दरसाल चाळीस कोटि रुपयांच्या सोन्याचें उत्पादन होत असलें तरी विविध व्यापारामुळें अमेरिकेचा सुवर्ण सांठा जगांत फार मोठा आहे. १९५४ ते १९६२ पर्यंत दरसाल दोन हजार कोटि डॉलर्सचें सोनें अमेरिकन गंगाजळींत आलें आहे.

जगांत सोन्याच्या उत्पादनाचा पहिला क्रमांक रशियाचा आहे. दुसरा दक्षिण आफ्रिकेचा, तिसरा कानडाचा, चौथा अमेरिकेचा, पांचवा ऑस्ट्रेलिया, सहावा साऊथ ऱ्होडेशिया, सातवा फिलिपाइन्स, आठवा कोलंबिया, नववा जपान, दहावा मेक्सिको, अकरावा भारत, बारावा चिली आणि नंतर इतर देशांचा आहे.

चलनाची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय किंमत सुवर्णसांठा व शिल्लक परकीय चलन यांवरून ठरत असते. जो देश आयातीपेक्षां निर्यात जास्त करतो, त्या देशाला परकीय चलन ठीक मिळतें. अमेरिका, पश्चिम जर्मनी, इंग्लंड, जपान, इत्यादि देश निर्यात व्यापारांत आघाडीवर असल्यानें सध्या डॉलर, पौंड, मार्क, येन या नाण्यांना व चलनाला फार किंमत आहे.

भारतांत १९६१ मध्यें चार लाख तोळे सोन्याचें खाणींतून उत्पादन झालें. त्यापूर्वीचें प्रमाण जरा कमी अधिक होतें. दागिन्यांच्या रूपांत जें सोने भारतांत आहे तें तीन हजार कोटींवर असावें असा तज्ज्ञांचा अभिप्राय आहे. भारतांत सुवर्ण दागिन्यांची हौस प्राचीनकालापासून आहे. पूर्वी सोन्याचा भावहि बराच कमी असे. सन १९२५ पर्यंतहि तो जेमतेमच होता. म्हणजे वीस रुपये तोळा. १९३५ सालीं तो वाढून पस्तीस रुपये तोळा झाला. पुढें वाढत वाढत १९४४ मध्यें बहात्तर रुपये तोळा याप्रमाणे विक्री झाली. त्यानंतरच्या दरानें तर अतिरेकच केला. सोन्याचा जागतिक भाव दर तोळयास रु. ६२-५० न. पै. असा अधिकृत आहे; पण भारतांत तो १४४ रुपये आहे. कांहीं वेळीं कमी अधिक होतो.

भारतांत परकीय चलनाची उणीव असल्यानें परदेशांतून सोनें आणण्यास बंदी आहे.

नाणक-संग्रह

मागील प्रकरणांतून नाण्यांची सर्व माहिती आलेली आहे. यापुढची माहिती म्हणजे नाणकसंग्रहांची. ठिकठिकाणच्या भारतीय नाणक-संग्रहांची माहिती देण्यापूर्वी खुद्द गोमंतकांत त्यासंबंधींची कशी काय व्यवस्था आहे हें आधीं पाहूं.

गोमंतकीय नाणक संग्रहांत सरकारी संग्रह संपन्न असेल अशी आमची कल्पना होती; पण प्रत्यक्ष पाहिल्यावर त्याबाबतींत निराशाच झाली.

पणजी येथील ' बिब्लियोतेक नासियोनाल ' मधील सरकारी नाणक संग्रहांत गोव्याच्या राज्यकर्त्यांपैकीं फक्त पोर्तुगिजांचींच तेवढीं नाणीं आहेत. इतर राज्यकर्त्यांचीं नाहींत. त्या दृष्टीनें पाहातां नाणक संग्रहाच्या बाबतींत गोमंतकांतील खासगी प्रयत्नच विशेष कौतुकास्पद आहेत. पेडणें येथील श्रीमंत रावराजे देशप्रभु, मडगांवचे श्री. काशीनाथ दामोदर नायक, कोटंबी येथील श्री. बाबू शि. प्र. देसाई यांच्या संग्रहांत निरनिराळ्या प्रकारचीं नाणीं आहेत. म्हापशें येथील डॉ. ओ. रिबैरु, रा. रुझारियु फेर्न्हांव व हळदोणचे डिसौजा नांवाचे एक गृहस्थ यांकडे कांहीं नाणीं आहेत. तिसवाडी व सासष्टींतील दोन तीन गृहस्थांकडे कांहीं किरकोळ नाणीं असल्याचें कळतें. इ. सं. डॉ. पिसुर्लेंकर यांकडेहि कांहीं नाणीं आहेत.

गोमंतकांतील बहुतेक देवस्थानांतून दागिन्यांच्या रूपानें जुनीं सुवर्ण व रौप्यनाणीं आहेत. देवदेवतांच्या सुवर्णमोहोरांच्या हारांत किंवा गांठल्यांत अकबरी मोहोरा, होन, वराह, पुतळया इ. दिसतात. कित्येक देवस्थानांच्या संग्रहांत तांब्याचींहि जुनीं नाणीं आहेत. श्रीगोकर्ण - पर्तगाळ व श्रीकवळें या मठांतूनहि दागिन्यांच्या रूपानें जुनीं नाणीं आहेत.

गोव्यांतील सरकारी नाणक-संग्रह

हा नाणक-संग्रह पणजी येथें ' बिब्लियोतेक नासियोनाल ' या सरकारी ग्रंथसंग्रहालयाच्या कक्षेत आहे. त्यांत कांहीं रौप्य नाणीं व तांब्याचीं नाणीं आरशांच्या कपाटांत दिसतात. इतर सर्व तांब्याचीं नाणी पिशव्यांत भरून आहेत. सोन्याचीं व चांदीची ठराविक नाणीं बंदोबस्तानें कपाटांत ठेवलेलीं आहेत. या नाणकसंग्रहांत सन १४९५ पासून सन १८५९ पर्यंतचीं पोर्तुगीज नाणीं आहेत. त्याचप्रमाणें त्या नंतरचींहि कांहीं अल्प नाणीं आहेत. एकंदरींत या सरकारी नाणक संग्रहांत पुढील प्रमाणें नाणीं आहेत :—

सोन्याचीं नाणीं ३०
चांदीचीं नाणीं ४३५
तांब्याचीं नाणीं २२३४
ब्रॉंझचीं नाणीं १२
इतर नाणीं ६१
या शिवाय इतिहासकालीन नोटा ८

श्री. का. द. नायक नाणक-संग्रह

गोमंतकांतील नाणक संग्रहांत महत्वाचे नाणकसंग्रह म्हणजे दोनच; एक रावराजे देशप्रभु यांचा व दुसरा का. दा. नायक यांचा. त्यांत अनेक दुर्मिळ नाण्यांचे संकलन, सर्व-साधारण मनुष्याला चटकन समजून येण्या-इतकें सुलभ पद्धतीचें वर्णन आणि सुटसुटीत मांडणी या दृष्टीनें नायक यांचा संग्रह अभ्यासूंना विशेष सोयिस्कर वाटणारा आहे.

श्री. का. दा. नायक हे इतिहासाचे अभ्यासू व संशोधक वृत्तीचे असल्यानें त्या-वरूनच त्यांचें लक्ष नाणक संग्रहाकडे वेधलें. सन १९५४ सालीं मुंबई येथें असताना त्यांनीं आपल्या नाण्यांच्या संग्रहाला सुरवात केली. त्यापूर्वीं त्यांनीं कांहीं नाणीं गोव्यांतच मिळविलीं होतीं; तथापि पद्धतशीर संग्राहाची सुरवात मुंबईलाच झाली.

नायक यांचा नाणक-संग्रहांत इ. स. पूर्व ५०० पासूनचीं पंचमार्क, इंडोग्रीक, पार्थियन, गुप्त, क्षत्रप, त्रैकुटक, वल्लभी, मैत्रप, राष्ट्रकूट, केरळ, बंगाल, पाल राजे, कलचुरी, तक्षशिला, अवंती, पांचाल, विजय नगर, कदंब, दिल्लीचे सुलतान, मोंगल, बाहमनी, आदिलशहा, जयपूर, प्रतापगड, बिकानेर, जोधपूर, मेवाड, उदयपूर, दतिया, झांशी, मराठे, म्हैसूर इ. अनेक राज्यकर्त्यांचीं सोन्याचीं, चांदीचीं व तांब्याचीं नाणीं आहेत. त्यांच्या संग्रहांत जशीं प्राचीन, तशींच अर्वाचीन व कांहीं महत्वाचीं आधुनिक नाणीं आहेत.

संग्रहांतील अनेक नाण्यांपैकीं तक्षशिला ! अवंती, पांचाल वगैरे गणराज्यांचीं नाणीं आपणास अनेक दृष्टीनें विशेष महत्वाचीं वाटत आहेत असें श्री. नायक यांचें म्हणणें आहे.

श्री. नायक यांनीं मोंगल राजवटींतील नाण्यांचा विशेष अभ्यास केलेला असल्यानें मोंगली नाण्यांची बारीक सारीक माहितीहि ते चटदिशीं सांगतात.

मोगलांच्या राजवटीपूर्वीं गुलाम, खिलजी, तघलख, सय्यद व लोदी या घराण्यांतील पुरुष सुलतान म्हणून दिल्लीच्या तक्तावर येऊन गेले. सन १४५१ ते १५२६ हा काल लोदी घराण्याचा होता. हे लोदीच तेवढे अफगाण किंवा पठाण होते व इतर पठाणेतर होते. लोदी घराण्यांतील शिकंदर लोदी याची कारकिर्द सन १४८८ ते १५१८ पर्यंत चालली. या शिकंदर लोदीनें जीं नाणीं पाडलीं त्यांत चांदी व तांबें मिश्र अशा बिलियन धातूचीं नाणीं तांब्याच्या नाण्यापेक्षांहि अधिक होतीं. तथापि आतां तीं मिळणें दुर्लभच आहेत. या नाण्यांपैकीं अजूनपर्यंत फक्त सहा नाणीं उपलब्ध आहेत. त्यांतील चार लंडन येथील ब्रिटिश म्यूझियममध्यें असून पांचवें उत्तरप्रदेश संग्रहालयांत आणि सहावें नायक-नाणक-संग्रहांत आहे.

नायक-नाणक संग्रहांतील गुप्त कदंब, विजयनगर, हैदर, टिपू, मोंगल, पोर्तुगीज वगैरे राज्यकर्त्यांच्या अनेक सुवर्ण-नाण्यांत बरींच नाणीं महत्वाचीं आहेत. त्यांत चंद्र-

गुप्ताचें एक आणि समुद्रगुप्ताचीं दोन नाणीं विशेष उल्लेखनीय आहेत. बाराव्या शतकांत चलनांत असलेलें शिवचित्त ऊर्फ परमादी या गोमंतकाच्या कदंबवंशीय राजाचें जें सुवर्ण नाणें नायक-संग्रहांत आहे त्यावर 'श्रीसप्तकोटेश्वर लब्धवीर शिवचीत वीर परमादी रेवारु मालवमारी' अशीं अक्षरें आहेत. विजयनगरकालीन नाण्यांत हरिहरराय बुक्कराय, कृष्णदेवराय वगैरे अनेक राजांचीं नाणीं आहेत. संगम वंशांतील दुसऱ्या हरिहररायाच्या वराह नाण्यावर लक्ष्मीनारायण असून त्याच्या अर्धावराह नाण्यावर उमामहेश्वर आहे. तुलुव घराण्याच्या कृष्णदेवरायाचा प्रताप, अच्युतरायाचा अर्धा वराह, सदाशिवरायाचा वराह अशीं, विविध नाणीं सदर संग्रहांत आहेत. शहाजहान व अकबर यांचींहि तीन चार नाणीं आहेत.

ईस्ट इंडिया कंपनीनें पाडलेल्या दक्षिणेंतील राजांच्या सोन्याच्या नाण्यांपैकींहि कांहीं सुवर्णनाणीं नायक-संग्रहांत आहेत. त्यांतील तामीळच्या वराह नाण्यावर विष्णु मूर्ति आहे. म्हैसूरच्या कृष्णराज वडियार यांच्या पगोड्यावर उमामहेश्वर आहे. म्हैसूरच्या कांतिराज वडियार याच्या अर्धा वराह या नाण्यावर रामसीता आहे.

नायक यांच्या नाणक-संग्रहांत चौदाशेंवर रौप्य नाणीं असून त्यांत पंचमार्क, इंडोग्रीक, पार्थियन, गुप्त, क्षत्रप, त्रैकुटक, वल्लभी, मैत्रप, राष्ट्रकूट, केरळ, बंगाल, पाल राजवट, कलचुरी घराणें, दिल्लीचे सुलतान, गुलाम वंश, खिलजी, सुलतान सुरी, माळवा सुलतान, बंगाल-सुलतान, गुजरातचे सुलतान, बाहमनी शहा, आदिलशहा, दुराणी. म्हैसूरचे हैदर व टिपू, औंधचे व अयोध्येचे नबाब, हैद्राबादचे नबाब, वगैरे राजांचीं नाणीं आहेत. त्याचप्रमाणें जयपूर, प्रतापगड, बिकानेर, भरतपूर, जोधपूर, मेवाड, उदयपूर, कोटा, दतिया, बजरंगगड, झांशी, इंदूर, ग्वाल्हेर, बडोदा, आसाम, त्रावणकोर, मदुरा, अशा ठिकाणच्या राजांचींहि नाणीं आहेत.

मराठ्यांच्या राजवटींतील सातारा, पुणें, चांदोर, बागलकोट येथील आणि गोव्यांतील कांहीं पोर्तुगीज नाणींहि सदर संग्रहांत आहेत.

नायक-संग्रहांतील रुप्याच्या मोंगली नाण्यांत अकबर बादशहाचीं नाणीं ६७, जहांगीर बादशहाचीं ६८, सलीमशहाचीं २, नूरजहानचीं ९, शहाजहानचीं ६६, मुरादबक्ष याचीं २, औरंगजेब याचीं १४३, शहाआलम पहिला याचीं २, जहांगीरचीं ७, फरीदशायरचीं ५८, रफीउद् याचीं ३, रफी-उद् दौला याचीं ३, महंमदशहा याचीं १०४, अहमदशहाचीं ५, दुसऱ्या आलमगीरचीं ४, तिसऱ्या शहाजहानचीं २, दुसऱ्या शहाआलमचीं ३४, दुसऱ्या अकबरचीं ६, बहादूरशहाचीं ४ व इतर अशीं मोंगली रौप्य नाणीं एकंदर ६०५ आहेत. याशिवाय मोंगल बादशहाच्या नांवांची अयोध्येच्या नबाबांची ३६, आदिलशाही राजवटींतील २ व बाहमनी शहाचें एक अशीं रौप्यानाणीं आहेत. त्यांच्या संग्रहांतील आदीलशहाचें

एक 'लारी' नाणें अगदीं चिमट्यासारखें आहे.

श्री. का. दा. नायक यांच्या नाणकसंग्रहांतील तांब्याच्या व ब्रॉंझच्या नाण्यांचा सांठा इतर धातूंच्या नाण्यांच्या सांठ्यापेक्षां बराच मोठा आहे. गोमंतकाच्याच राज्यकर्त्यांच्या नव्हे; तर भारतीय निरनिराळया राजवटींतील नाणीं त्यांच्या संग्रहांत हजारावर असून परदेशी नाणीं तर अनेक आहेत.

नायक-संग्रहांतील तांब्याच्या नाण्यांत १३५ वर ' शिवराई ' हीं शिवाजी महाराजांच्या राजवटींतील नाणीं आहेत. शिवराईचें वजन अंदाजें १० मासे असून तें नाणें साधारपणें जुन्या पैशाच्या आकाराचें आहे. याच्या एका बाजूस ' श्री राजा शिव ' व दुसऱ्या बाजूनें ' छत्रपति ' अशीं अक्षरें आहेत. कित्येकांवर ' श्रीराजा ' असेंहि आहे.

बाहमनी राजवटींतील निरनिराळया प्रकारचीं अडीचशेंवर तांब्याचीं नाणीं श्री. नायक यांच्या संग्रहांत आहेत. विजापूरकरांचीं शंभरवर आदिलशाही नाणीं असून त्यांतहि कांही वेगवेगळया शहांच्या कारकिर्दींतील आहेत. तांब्याच्या नाणकसंग्रहांत कदंब राजवटीचें एक नाणें आणि विजयनगरच्या राय राजवटींतील एक आहे. विजयनगर सम्राटाच्या या नाण्यावर हनुमान चित्र असून तें सम्राट कृष्णदेवराय यांचें आहे.

तांब्याच्या नाण्यांत पोर्तुगीजकालीन नाणीं शंभर पेक्षां अधिक असून त्यांत वसईचेंहि एक आहे.

कोणत्याहि नाण्याच्या संकलन कार्यांत श्री का. दा. नायक हे अल्पसंतुष्ट नाहीत, हेंच त्यांच्या झपाट्यानें वाढणाऱ्या नाणकसंग्रहाचें रहस्य आहे. गोमंतकांत, भारतांत किंवा आशियांतच नव्हे; तर युरोप अमेरिकेंत, अतएव पृथ्वीच्या पाठीवर कुठेंहि प्राचीन नाण्यांच्या अस्तित्वाचा त्यांना मागमूस लागला कीं, लगेच त्यांचा पत्रव्यवहार सुरू होतो आणि इष्ट दिशा दिसली कीं प्रयत्नांची पराकाष्ठा करून ते तीं नाणीं मिळवतात.

नाणें त्यांच्या हातांत आलें कीं, त्याचें सूक्ष्म निरीक्षण करून व त्याच्या संबंधींची संपूर्ण माहिती अभ्यासपूर्वक जमवून मग त्याला एका विशिष्ट पॅकेटमध्यें स्थान देतात. या पॅकेटवर त्या नाण्याची आवश्यक माहिती थोडक्यांत लिहिलेली असते. या व्यवस्थेनंतर तें नाणें त्या त्या वर्गांतील विशिष्ट खणांत ठराविक कपाटांत ठेऊन देण्यांत येतें.

श्री. नायक-संग्रहांतील सर्व नाण्यांची त्यांनीं व्यवस्थित यादी तयार करून ठेवलेली आहे. ही यादी, पॅकेटवरील नाण्याचें वर्णन आणि प्रत्यक्ष नाणें पाहिलें म्हणजे सर्वसाधारण माणसालाहि त्याची आवश्यक माहिती सहज मिळते. याशिवाय नाण्यासंबंधींची विशेष माहिती हवी असणारास तीहि श्री. नायक संतोषानें देतात.

रावराजे नाणक संग्रह

पेडणें येथील रावराजे श्रीमंत वासुदेव आत्माराम प्र. दे. देशप्रभु यांचा 'रावराजे - -नाणक संग्रह' त्यांच्या वाड्यांतील एका मधल्या माडीवर पुराणवस्तु संग्रहालयांत व्यवस्थित ठिकाणीं आहे.

रावराजे वासुदेवराव हे संशोधक वृत्तीचे असून इतिहासाचे अभ्यासू व लेखकहि असल्यानें त्यांच्या इतिहास वाचनांतूनच त्यांना पुराणवस्तुसंग्रह व नाणक संग्रह यांची आवड उत्पन्न झाली आणि पुढें पुढें ती बरीच वाढीस लागली. त्यांच्या पुराण वस्तुसंग्रहांत ज्या ज्या वस्तु दिसतात त्यांतील बहुतेक सर्व महत्वाच्या अशा आहेत.

हराप्पा येथील मातींचीं कांहीं प्राचीन भांडीं या संग्रहांत आहेत. त्यांतील लहान मोठे आकार प्रेक्षणीय आहेत. जुन्या इतर भांड्यांत मातीच्या दोन लहान आकाराच्या घंटा आहेत. त्या पूर्णपणें मातीच्या असूनहि वाजविल्यावर मधुर नाद येतो.

प्राचीन शस्त्रांच्या संग्रहांत लाठी, काठी, नांगर, गदा, परशु, वज्र, तोमर, अंकुश, धनुष्य, खंजीर, कट्यार, वाघनख, पट्टा, भाला, बरची, त्रिशूल वगैरे ६० वर शस्त्रें आहेत.

कपाटें, संदुका, आसनें इ. लांकडी कलावंतांच्या कित्येक सुंदर वस्तु आहेत. या संग्रहांत चिनी नमुन्याचा गोमंतकीय प्राचीन कारागिरीचा एक घडीचा पंखा असून तो कौतुकास्पद आहे. इतकें सुंदर व अप्रतिम काम गोमंतकीय कलाकारांकडून करण्यांत आल्याचें पाहून अभिमान वाटतो.

प्राचीन वल्कलांचे दोन नमुने असून एक अंतरीय व दुसरें उत्तरीय आहे. आठशें रुपयांवरील किंमतीची एक शाल असून तिच्या निऱ्या एकत्र केल्या तर आंगठींतून ती निघते. तिच्या मधोमध आंगठी घालूनच ती कपाटांत ठेवलेली आहे.

कातरकामाच्याहि कित्येक मोहक वस्तु कपाटांत मांडून ठेवलेल्या आहेत. राजे वाडकर यांकडून मिळालेला पालखी सरंजाम, पोर्तुगिजांकडील व्हायकाऊंटचीं वस्त्रें आणि स. १९१० सालीं राजे कोल्हापुरकर यांकडून लाभलेलीं रावराजेपदाचीं मानचिन्हें वगैरे अनेक वस्तु कपाटांतून दिसतात. या शिवाय निरनिराळ्या कपाटांतून व्यवस्थित मांडणीनें ठेवलेल्या अनेक लहान लहान वस्तु अशा आहेत कीं, त्यांच्याबद्दल प्रेक्षकाला सहज कुतुहल वाटावें.

रावराजे नाणक संग्रहांत जो नोटांचा संग्रह आहे त्यांतील नोटा आरशांच्या कपाटांत मांडून ठेवलेल्या असून त्यांत लहानमोठ्या कित्येक नोटा आहेत. त्यांत एक जुनी पोर्तुगीज नोट सन १८८२ सालची आहे. ही नोट मागच्या बाजूनें अगदीं कोरी आहे. पुढच्या बाजूनें वर Junta da Fazenda Publica अशीं पोर्तुगीज भाषेंतील अक्षरें असून त्याखालीं डावीकडे 'पांच रुपये' अशीं

देवनागरी व उजवीकडे cinco rupias अशीं रोमन लिपीचीं अक्षरें आहेत. कार्लुस् यौजेनियु द आल्मैद या गोव्याच्या तत्कालीन पोर्तुगीज गव्हर्नरानें ती आपल्या कारकिर्दीत चलनांत सुरू केली होती. पोर्तुगीज नोटा अस्तित्वांत आल्यानंतरची ही तिसऱ्या सालची नोट होय.

रावराजे नाणक संग्रहांत सोन्याचीं, चांदीचीं व तांब्याचीं अशा तिन्ही धातूंचीं अनेक नाणीं असून आंध्रभृत्य यांचें एक शिशाचेंहि नाणें आहे. यांकडे दुसरें एक शिशाचें नाणें कोल्हापूरच्या शिलाहारांच्या नाण्यासारखें आहे. त्यावरील अक्षरें स्पष्ट दिसत नाहींत.

शक राजा रुद्रदामन यांचें एक नाणें या संग्रहांत दिसून आलें. त्याच्या एका बाजूनें राजमुख व दुसऱ्या बाजूनें परशु आहे. पाश्चिमीय क्षत्रपांचें जें नाणें आहे त्यावर एका बाजूनें राजाचें नांव आणि दुसऱ्या बाजूनें राजमुख व संवत् आहे.

राष्ट्रकुटांच्या नाण्यापैकीं एक तांब्याचें दिसलें. त्यांचीं नाणीं गद्याण, द्राम, धरण, अशीं सोन्याचीं व कळंजू, कासू, अक्कम अशीं रुप्याचीं होतीं. त्यांच्या तांब्याच्या नाण्यापैकीं जें दिसलें तें 'मंजडी' हें असावें.

तक्षशिला नाणें एक व कुशान नाणीं या संग्रहांत दोन आहेत.

दिल्लीच्या सुलतानांचीं, बहमनी, हैदर व टिपू यांचींहि कांहीं नाणी या संग्रहांत आहेत.

मोंगली नाण्यांत हुमायुन, जहांगीर, शहा जहान, औरंगजेब, शहाआलम यांचीं निरनिराळीं नाणीं आहेत.

आदीलशाही नाण्यांपैकीं अल्ली आदिलशहा, महम्मद आदिलशहा यांचीं नाणीं प्रमुखत्वानें दिसतात.

विजयनगरच्या रायांचीं कांहीं नाणीं या संग्रहांत आहेत. त्यांत प्रताप व गद्याण हीं नाणीं आहेत. फलम् हें नाणेंहि दिसलें. फलम् याला फनम् असेंहि नांव आहे. विजयनगर कालांत मजुरांना सकाळीं भात देऊन कामाला लावीत आणि संध्याकाळीं एक फलम् रोजमुरा देऊन सुटी देत (वि. स्मा. ग्रं. पृ. ८३). हें नाणें अगदीं छोटें आहे. मोहोर, पुतळ्या याप्रमाणें फलमूच्याहि माळा दागिना म्हणून गतकालीं गळयांत घालीत असत.

गद्याण नाण्यांतहि कित्येक फरक आहेत. यांच्या संग्रहांतील कृष्णदेव रायाच्या प्रताप या सुवर्ण नाण्याच्या एका बाजूनें श्रीप्रताप कृष्णदेवराय अशीं अक्षरें असून दुसऱ्या बाजूनें लक्ष्मीनारायण व दुसऱ्या एका नाण्यावर गरुड पक्षी आहे.

मराठ्यांच्या नाण्यांत छत्रपति शिवाजी महाराजांचा होन व शिवराई हीं नाणीं दिसून आलीं. होन हें नाणें सोन्याचें व शिवराई हें तांब्याचें नाणें आहे.

मराठ्यांच्या नाण्यांपैकीं एक दोन नाणीं पेशव्यांचींहि दिसून आलीं. हीं चांदीचीं आहेत. हीं पेडणें येथेंच एका ठिकाणीं मिळाल्याचें कळतें.

सोन्यांच्या नाण्यांत ईस्ट इंडिया कंपनीचीं चार नाणीं आहेत. त्याचप्रमाणें सन १९१३ सालीं पंचमजॉर्जचें जें १५ रुपयांचें सुवर्णनाणें निघालें होतें तेंहि एक आहे. हें नाणें अलिकडचें असूनहि आतां दुर्मिळ आहे. या नाण्याचें वैशिष्ट्य म्हणजे आजपर्यंत ठराविक पंधराच रुपयांचें असें नाणें कधीं निघालें नाहीं.

गोव्याच्या पोर्तुगीज राज्यकर्त्यांचीं अनेक नाणीं रावराजे नाणक संग्रहांत आहेत. त्यांत दों जुवांव १ला, ३रा, ४था, ५वा, दों पेद्रु, दों जुझे १ला, दोन मारीअ, दों लुईज, दों कार्लु, दों मानुयेल यांचीं व इतरांचींहि अनेक आहेत.

या संग्रहांत असलेलीं व कुडाळ भागांत मिळालेलीं जीं वाडकर भोंसले यांचीं दोन नाणीं आहेत तीं दुर्मिळ नाण्यापैकींच आहेत. कारण सावंतवाडीचे खेम सावंत भोंसले यांनीं स्वतंत्र होऊन राजेबहाद्दर पदवी व मोर्चेलांचा मान मिळविला त्यावेळीं त्यांनी स्वतंत्र नाणीं पाडल्याचा उल्लेख मिळतो; तथापि त्यांचें किंवा त्यांच्या पुढील पिढीपैकींहि कुणाचें नाणें आजपर्यंत उपलब्ध झाल्याचें दिसलें नव्हतें. रावराजे संग्रहांत वाडकरांची जीं सदरील दोन नाणीं आहेत. तीं खेमसावंत यांचीं खुद्द नसली, तरी त्यांच्या पिढींतील पुढील राजपुरुषाचीं आहेत हें देखील कांहीं कमी महत्वाचें नव्हे.

खेमसावंत भोंसले यांच्यानंतर सावंतवाडीच्या गादीवर दुसरा फोंड सावंत हे राजे आले आणि त्याच्या पश्चात् गादीवर आलेल्या राजपुरुषांचें नांव जयराम सावंत असें आहे. यालाच जयदेव सावंत असेंहि नांव होतें.

रावराजे नाणक संग्रहांत वाडकर सावंत यांचीं सदरील जीं दोन नाणीं आहेत तीं जयराम सावंत यांचीं असावीं असा कयास आहे.

या नाण्याच्या एका बाजूनें तुटक अक्षरें दिसतात व दुसऱ्या बाजूनें कांहींच दिसत नाहीं. दोहोंपैकीं एका नाण्याच्या पुढील बाजूनें महाराज जयदेव सावंत अशा अक्षरांचीं चिन्हें दिसतात तर दुसऱ्या नाण्यावर जयराम सावंत अशीं अक्षरें असावीं असें दिसतें. अक्षरें स्पष्ट नसल्यानें स्वच्छ अर्थबोध होत नाहीं.

रावराजे नाणक संग्रहांत अजून व्यवस्थित मांडण्यांत न आलेलीं अनेक नाणीं असून त्यांत चांदीचीं व तांब्याचींच विशेष आहेत. हीं सर्व नाणीं पिशव्यांत भरून ठेवलेलीं आहेत.

सन १९४० च्या सुमारास श्रीमंत रावराजे वासुदेवराव यांनीं मला प्रत्यक्ष भेटींत दाखविलेलीं चालुक्य, शिलाहार व कदंब यांचीं नाणीं या संग्रहांत कुठें दिसलीं नाहींत. प्रस्तुत संग्रहाची मांडणी त्यानंतरची असल्यानें कदाचित् तीं अन्य कपाटांत असूं शकतील.

प्रभु देसाई नाणक संग्रह

गोव्यांतील केपें तालुक्यांत 'कोटंबी' नांवाचें जें गांव पारोड्यापासून दोनेक मैलांच्या अंतरावर आहे. तेथें ॲड. बाबू शिवराम प्रभु देसाई यांच्या निवासस्थानांत हा त्यांचा संग्रह आहे. ते पणजीस विद्यार्जनासाठीं असतांना विद्यार्थी दशेपासूनच त्यांना नाण्यांचा नाद लागला.

केपें येथें वकिली करीत असतांना ॲड. देसाई यांनीं कांहीं वर्षांपूर्वी आग्रहपूर्वक आपल्या निवासस्थानीं नेऊन आपल्याकडील नाणक-संग्रह मला दाखविला. त्यावेळीं त्यांनीं कांहीं नाण्यांचा अभ्यास केला होता व आपल्या नाणकसंग्रहाचा कॅटलॉग तयार करण्याचाहि ते विचार करीत होते; तथापि तें त्यांचें कार्य तसेंच राहिलें. आज उद्यां करतां करतां कित्येक वर्षें गेलीं आणि नंतर त्यांच्या दीर्घकालीन आजारामुळें तें कार्य त्यांकडून होऊंच शकलें नाहीं.

मी ज्यावेळीं त्यांचा संग्रह पाहिला त्यावेळीं त्या संग्रहांत चालुक्यांचें सुवर्ण नाणें वराह, राष्ट्रकुटांचें गद्याण, कदंबांचें पद्मटंक, विजयनगरचा प्रताप व एक मोंगली मोहोर अशीं सुवर्ण नाणीं होतीं. कदंब जयकेशी तिसरा याच्या पद्मटंक नाण्यांवर 'श्रीसप्तकोटीशलब्धवरवीर जयकेशी' अशीं नागरी अक्षरें एका बाजूवर होतीं. प्रताप हें सुवर्ण नाणें विजयनगरचे सम्राट कृष्णदेवराय यांचे असून त्याला अर्धा वराह असेंहि म्हणत. या नंतर त्यांना शिवराई होन हें छत्रपति श्रीशिवाजी महाराज यांचें सुवर्ण नाणें मिळालें. हें अंडाकृति आहे.

प्रभुदेसाई नाणकसंग्रहांत चांदीचीं जीं कित्येक नाणीं आहेत त्यांत दिल्लीचे सुलतान, बहमनी सुलतान, आदिलशहा, मराठे, पोर्तुगीज वगैरे राज्यकर्त्यांचीं अनेक नाणीं आहेत.

सदर संग्रहांत तांब्याच्या नाण्यांचाहि सांठा आहे आणि तो पिशव्यांत भरून आहे. या सांठ्यांत यादवांचें पण नाणें, शाह बहमन अशा अक्षरांचें बहमनी नाणें, विजयनगरचें 'कासू' नाणें, शिवकालीन 'शिवराई' ऊर्ध्वपुच्छ हत्तीचें टिपूचें नाणें, इंदूर, ग्वाल्हेर, बडोदा, जयपूर इ. संस्थानिकांचीं नाणीं, दिंज्यैरु व इतर अनेक प्रकारचीं पोर्तुगीज नाणीं, ईस्ट इंडिया कंपनीचीं व इतर इंग्रजी नाणीं, हैद्राबाद येथील निजामी नाणीं अशीं विविध प्रकारचीं व विविध ठिकाणचीं तांब्याचीं नाणीं या सांठ्यांत आहेत.

सरदील सर्व नाणीं पद्धतशीर लावलीं असतीं व त्यांची सुटसुटीत अशी माहितीपूर्ण यादी तयार झाली असती तर अभ्यासू लोकांची फार सोय झाली असती; तथापि तें जरी घडून आलें नाहीं तरी संग्रहाचें महत्व त्यामुळें कमी झालेलें आहे असें मुळींच म्हणतां येणार नाहीं.

---

२० भारत. इतिहास सं. मंडळ संग्रह

पुणें येथील ही संस्था स. १९१० सालीं स्थापन झाली. या संस्थेच्या संग्रहालयाचे दोन विभाग असून १ला इतिहासपूर्वकालीन पुराणवस्तूंचा व २रा अर्वाचीन ऐतिहासिक वस्तूंचा. ऐतिहासिक संग्रहांत मराठी रुमाल, पत्रें व दस्तऐवज बखरी, मराठी, कानडी व फारसी हस्तलिखितें, संस्कृत पत्रें इ. अनेक साधनें आहेत. फक्त कागद पत्रेंच दहा लक्षांवर आहेत. या संस्थेकडील नाण्यांची एक यादी प्रकाशनांत आलेली आहे.

संस्थेचें एक संपन्न ग्रंथालय असून त्यांत हजारों ऐतिहासिक ग्रंथांचा महत्वाचा संग्राह आहे. नाणक शास्त्रावरीलहि कांहीं पुस्तकें ग्रंथसंग्राहालयांत आहेत. ताम्रपट, शिलालेखहि अनेक आहेत.

दिल्लीचे सुलतान, मोंगल, राजपूत, विजापूरकर, मराठे वगैरे अनेक राज्यकर्त्यांचीं पांच हजारांवर महत्वाचीं नाणीं या संस्थेच्या नाणकसंग्रहांत आहेत. हा नाणकसंग्राह संपन्न व महत्वाचा आहे.

२१ प्रभासपट्टण संग्रहालय

या संग्रहांत अनेक शिलालेख, शिल्पाकृति आणि निरनिराळीं नाणीं आहेत.

२२ डेक्कन कॉलेज संशोधन सं. संग्रहालय

या संस्थेच्या संग्रहालयांत निरनिराळ्या राज्यकर्त्यांचीं चौदाशें वर नाणीं व्यवस्थित ठेवलेलीं आहेत.

२३ राजकोट संग्रहालय

यांत प्राचीन छिद्रांकित नाण्यांपासून आधुनिक नाण्यांपर्यंत नाणक स्थित्यंतरांचें दर्शन घडविणारीं नाणीं व हस्तलिखितें यांसाठीं निराळ्या प्रदर्शन विभागांची योजना केली आहे.

२४ वल्लभ नगर संग्रह

गुजरातमधील या संग्रहालयांत अनेक शिल्पकृति, पुतळे, शिलालेख, पुरातन वस्तु आणि नाण्यांचा व्यवस्थित संग्राह आहे.

२५ पुराण वस्तु संग्रहालय

दिल्लीच्या लाल किल्ल्यांत असलेलें हें संग्रहालय सर्व दृष्टीनें संपन्न असें आहे.

सर्वस्वी मोंगल कालीन ऐतिहासिक वस्तु-संग्राहाप्रीत्यर्थ स्थापन झालेल्या या संग्रहालयांत सुलतान व मोगलकालीन शिल्पकृति, शिलालेख, शस्त्रास्त्रें, फर्मानें, सनदा इ. जुने दस्त ऐवज, स. १८५७ च्या उठावाचे अवशेष अशा विविध वस्तु आहेत. प्राचीन अर्वाचीन अशीं अनेक महत्वाचीं नाणींहि आहेत.

नाण्यांची स्वतंत्र खोली असून त्या खोली-मध्यें भक्कम पोलादी तिजोऱ्यांत नाणीं व इतर मूल्यवान वस्तु ठेवलेल्या आहेत. नाणीं दुर्मिळ अशीं अनेक असल्यानें नाणक संग्राहांचे नादी लोक हीं नाणीं अगत्यपूर्वक पाहून जातात.

'धि कॉइनेज अँड मेट्रॉलॉजी ऑफ धि सुलतान्स् ऑफ देहली' हें महत्वाचें प्रकाशन याच संस्थेचें आहे.

२६ राष्ट्रीय संग्रहालय

भारताचें हें राष्ट्रीय संग्रहालय सर्व दृष्टीनें महत्वाचें असें आहे. याच्यासाठीं १२ मे १९५५ रोजीं सन्मान्य पंतप्रधान नेहरू यांच्या हस्तें राजपथ व जनपथ जेथें मिळतात त्या ठिकाणीं दिल्ली येथें तीन मजली अष्टकोनी इमारतीचा शिलान्यास समारंभ झाला होता. इमारत सर्व दृष्टीनें सुंदर व्हावयची असून तिच्यासाठीं दीड कोटी रुपये खर्च मंजूर झालेला आहे.

या संग्रहालयांत अनेक विभाग आहेत. त्या प्रत्येक विभागांत निरनिराळया वस्तु आकर्षक पद्धतीनें मांडण्यांत आल्या आहेत. संग्रहालयांत ३२० शिलाशिल्प कलाकृति, पश्चिम भारती, राजस्थानी, पहरी व मोगल शैलीचीं ८००० रंग चित्रें, ६१५ ब्रॉंझ धातूच्या मूर्ति इ. अप्रतिम वस्तु आहेत. सुमारें १००० कापड नमुने, ४२०० फारसी व अरबी हस्तलिखितें २५०० संस्कृत, पाली, प्राकृत व देवनागरी हस्तलिखितें, १०००० प्राचीन व अर्वाचीन शस्त्रें, विविध पुराण वस्तु इ. इ.

संस्थेचा नाणक संग्रह संपन्न असून आज-पर्यंतच्या बहुतेक सर्व भारतीय राज्यकर्त्यांचीं नाणीं या संग्रहांत आहेत. मौर्य, सुंग, कुशान, गांधार, सातवाहन, गुप्त, पाल, सेन, पश्चिम चालुक्य, दक्षिण चालुक्य, होयसळ, यादव चोल, काकती, राष्ट्रकूट, शिलाहार, सुलतान, मोंगल, बहमनी सुलतान, विजापुरकर, निजाम, हैदर, टिपू, विजयनगर, इंग्रज, फ्रेंच, पोर्तुगीज, मराठे, संस्थानिक वगैरे राजांचीं नाणीं या नाणक संग्रहांत आहेत.

नाणकसंग्रहांत गुप्त राजांनीं पाडलेल्या बयाणा सांठ्यांतील दुर्मिळ अशा मौल्यवान नाण्यांचे विविध नमुने ठेवलेले आहेत. १७०० वर सस्सेनियन नाणीं आणि सुलतान व मोगल या महंमदी राजघराण्याचीं किती तरी नाणीं त्यांत आहेत. दक्षिणेंतील बहुतेक सर्व प्राचीन व अर्वाचीन नाण्यांचा महत्वाचा सांठा या संग्रहालयानें अलिकडेच मिळविला आहे, त्यामुळें नाणकसंग्रह विशेष संपन्न झाला आहे. भारताच्या या राष्ट्रीय संग्रहालयांतील नाणक-संग्रहाइतका परिपूर्ण व महत्वाचा नाणक संग्रह भारतांत दुसरा नाहीं.

भारतीय नाणक-संग्रह

१ अलमपूर - पुराणवस्तु संग्रह

या संग्रहांत हल्लीं नाण्यांचाहि समावेश करण्यांत आला असून कित्येक नाणीं जमलीं आहेत.

२ अमरावती पुराण वस्तु संग्रह

या संग्रहांत देखील हल्लींच नाणीं दिसूं लागलीं आहेत.

३ हैद्राबाद संग्रहालय

यांत नाण्यांचा बराच मोठा संग्रह आहे. सातवाहन, यादव, विजयनगर, मोंगल, बहमनी व दक्षिणी राजांची नाणीं यांत आहेत. बारमती, सातवाहनाचें नवें नाणें, महीष नाणीं, सातवाहनांचें कथलाचें नाणें इतर दुर्मिळ नाणीं, दुर्मिळ मोंगल नाणीं, सुमहाग्रामक राजाचीं नाणीं, क्षप-क्षत्रप-त्रिकुटक नाणीं अशीं पुस्तकेंहि या संग्रहालयातर्फे प्रकाशनांत आलीं आहेत.

४ कोंडापूर संग्रहालय

या संग्रहांत सोनें, रुपें, तांबे अशा धातूंचीं अनेक राजवटींचीं नाणीं आहेत.

५ आंध्र इतिहास सं. संस्था

या संग्रहांत शालंकयान, विष्णुकुंडीन, चालुक्य, कलिंग, काकतीय, यादव, विजयनगर, मोंगल, चोल, पांड्य, सिंहल, ईस्ट इंडिया कंपनी यांचीं सोनें, रुपें, तांबें अशा धातूंचीं नाणीं आहेत.

६ श्रीव्यंकटेश्वर संग्रहालय - तिरुपति

या पुराण वस्तु संग्रहालयाला हल्ली नाण्यांचीहि जोड देण्यांत आली असून नाणकसंग्रह वाढत्या स्वरूपांत आहे.

७ आसाम राज्य संग्रहालय

नाणीं व नाणकशास्त्रविषयक विविध वस्तूंचा यांत संग्रह आहे.

८ चंद्रधारी संग्रहालय

या पुराण वस्तु संग्रहालयांत नाणक शास्त्राचा स्वतंत्र विभाग असून त्यांत जुन्या नाण्यांचा बराच संग्रह आहे.

९ गया संग्रहालय

यांत चांदी या व तांब्याच्या नाण्यांचा लहानसा संग्राह आहे. तथापि नाणक शास्त्रावरील इंग्रजी पुस्तकें यांत बरींच आहेत.

१० नालंदा संग्रह

आसपासच्या क्षेत्रांत उपलब्ध झालेल्या अनेक पुरातन वस्तूंच्या या संग्राहांत मुद्रा व नाण्यांचाहि ठीक संग्राह आहे.

११ पाटणा संग्रहालय

यांत ताम्रयुगीन वस्तु बऱ्याच आहेत. नाणकशास्त्रावरील ग्रंथ, इतर वस्तु व नाणीं

यांचाहि संग्रह असून अनेक प्राचीन शस्त्रांचाहि सांठा आहे.

१२ वैशाली संग्रह

वैशाली प्रदेशांतील शंभरेक खेड्यांतून मिळालेल्या पुरातन वस्तूंचा संग्रह करतांना नाण्यांकडेहि लक्ष दिल्यानें या संस्थेचा नाणकसंग्राहि ठीक जमला आहे.

१३ भावनगर पुरातन वस्तुसंग्रह

शिलालेख, ताम्रपट इ. वस्तूंप्रमाणेंच नाण्यांचाहि संग्रह यांत असून त्यांत विविध प्रकारचीं नाणीं आहेत.

१४ कच्छ संग्रहालय

कच्छशीं संबंध असलेल्या ऐतिहासिक महत्वाच्या इतर वस्तूंखेरीज अनेक राजवटींतील नाण्यांचाहि यांत बराच संग्रह आहे.

१५ प्रिन्सऑफ वेल्स संग्रहालय

सन १९०४ सालीं या संग्रहाची मुंबई येथें स्थापना झाली. या संस्थेचे अनेक विभाग असून त्यांत कलाविभाग व पुराणवस्तु विभाग विशेष महत्वाचे आहेत. पुराणवस्तु विभागांतील पुरातन भारतीय नाण्यांचा संग्रह समृद्ध आहे. सनपूर्व तिसऱ्या शतकापासून मोंगल राजवटीच्या अखेरपर्यंतचीं सोन्याचीं, चांदीचीं व तांब्याचीं अशीं वीस हजारांवर पुरातन भारतीय नाणीं या संग्रहांत असून त्यांपैकीं अनेक दुर्मिळ अशीं आहेत. गुजरात या सुलतानाचीं नाणीं, इंग्रजी नाणीं अशीं कांहीं नाणक विषयावरील पुस्तकेंहि या संस्थेनें प्रकाशित केलीं आहेत. दररोज ४००० प्रेक्षक या संग्रहालयाला भेट देतात.

१६ धरमपूर संग्रहालय

या संग्रहालयाच्या विभागांत चलनी नाणीं व पोस्टल तिकीटें हा विभाग विशेष महत्वाचा आहे. प्राचीन व अर्वाचीन बरींच नाणीं या संग्रहांत आहेत.

१७ राजवाडे सं. मंडळ संग्रहालय

इतिहासाचार्य राजवाडे संशोधन मंडळाच्या या संग्रहालयांत इतर पुराणवस्तूंप्रमाणेंच इतिहासकालीन अनेक नाण्यांचाहि चांगला संग्रह असून तो व्यवस्थित ठिकाणीं आहे. मोंगल व राजपूतकालीन नाणीं या नाणकसंग्रहांत विशेषत्वानें आहेत.

१८ जामनगर पुरातन वस्तुसंग्रह

या संग्रहालयांत शिल्प, पुरालेख, हस्तलिखितें, चित्रें, हस्तकला इ. विविध विभाग असून नाणकसंग्रहहि व्यवस्थित आहे. या संग्रहांत क्षत्रप, गुप्त, गाधीय, सुलतान, मोंगल, मराठे इ. राज्यकर्त्यांचीं अनेक नाणीं आहेत.

१९ जुनागड संग्रह

इतर ऐतिहासिक वस्तूंप्रमाणेंच यांत नाण्यांचा संग्राहि बराच आहे.

२७ श्रीनगर संग्रहालय

या संग्रहालयाच्या नाणकसंग्रहांत भारत--बॅक्ट्रिया, सिंथिया, कुशान, गुप्तकालीन अशीं विविध नाणीं आहेत. त्याशिवाय प्राचीन व अर्वाचीन हिंदु राजांच्या नाण्यांचाहि यांत संग्रह आहे.

२८ केरळ - संग्रहालय (त्रिचूर)

यांत पहिल्या शतकांतील छिद्रांकित चांदीचीं नाणीं, सोन्याचीं नाणीं व तांब्याचींहि आहेत. गणराज्यांचीं नाणींहि या संग्रहाच्या नाण्यांच्या सांठ्यांत बरींच आहेत.

२९ त्रिवेंद्रम संग्रहालय

दक्षिणी राज्यकर्त्यांचीं प्राचीन नाणीं आणि इतिहास कालांतील अनेक राजवटींचीं नाणीं यांत बरींच आहेत.

३० धार संग्रहालय

याच्या नाणींविभागांत सोन्याचीं, चांदीचीं व तांब्याचीं छिद्रांकित, गुप्तकालीन, नागकालीन व मुसलमान अमदानींतील अशीं बरींच नाणीं आहेत.

३१ ग्वाल्हेर संग्रहालय

यांत निरनिराळीं नाणीं व्यवस्थित मांडलेलीं असून पवया (पद्मावती) हि अनेक आहेत.

३२ मद्रास - सेंट जॉर्ज संग्रहालय

याच्या नाणक विभागांत कर्नाटकांतील हिंदु राजे व नबाब यांचीं आणि पोर्तुगीज, फ्रेंच, डॅनिश टांकसाळींतील विविध प्रकारचीं नाणीं आहेत.

३३ मद्रास सरकारी संग्रह

या संग्रहाच्या नाणक विभागांत प्राचीन व अर्वाचीन, पाश्चात्य व पौरवात्य अशीं अनेक नाणीं आहेत. त्यांत कित्येक दुर्मिळ अशींहि आहेत.

३४ मिनाक्षी - संग्रहालय

याच्या पुराणवस्तु विभागांत शिलालेख, ताम्रपट, नाणीं, प्राचीन दगडी पुतळे इ. वस्तु असून त्यांवरूनच त्रावणकोरचा प्राचीन इतिहास ग्रथित केला आहे. प्राचीन नाणीं यांत बरींच आहेत.

३५ श्रीरंगम संग्रहालय

मदुरा येथील नायक राजवटींतील अनेक उत्तमोत्तम वस्तूंचा हा संग्रह श्रीरंगनाथस्वामी आदिदेवस्थानांत प्रशस्त दालनांत असून त्यांत इतरहि विविध प्रेक्षणीय वस्तु प्राचीन व अर्वाचीन कलाकुसरीच्या आहेत. नाणकविभागांत दक्षिणच्या अनेक राजांच्या प्राचीन अर्वाचीन मुद्रा, शस्त्रें, चित्रें आणि नाणीं आहेत. नाण्यांची मांडणी ठीक असून संग्रह संपन्न आहे.

३६ म्हैसूर - संग्रहालय (बेंगलोर)

हें संग्रहालय स. १८६६ सालीं स्थापन झालें होतें. यांत पुराणवस्तुसंग्रह, सांस्कृतिक साधनें, मानववंशशास्त्र, कला, भूस्तरशास्त्र,

वनस्पतिशास्त्र, प्राणीशास्त्र इ. विषयासंबंधींच्या अनेक वस्तु आहेत. नाणकविभागहि व्यवस्थित आहे. प्राचीन दक्षिणी नाणीं यांत बरींच आहेत.

३७ विजापूर पुराणवस्तु संग्रह

हा इतिहासप्रसिद्ध गोलघुमट इमारतीच्या समोर आहे. विजापूर व आजूबाजूच्या भागांत सांपडलेल्या प्राचीन वस्तूंचा सांठा इथें ठीक आहे. अरबी, फारसी, संस्कृत, कानडी भाषेंतील शिलालेख, हिंदु व जैन शिल्पकृति, प्राचीन शस्त्रें व हत्यारें, मराठी व राजपूत चित्रें, ऐतिहासिक मुद्रा आणि कर्नाटकच्या राजांचीं प्राचीन व अनेक अर्वाचीन नाणीं यांत आहेत.

३८ कन्नड संशोधन संग्रहालय (धारवाड)

इतिहासपूर्व व ऐतिहासिक पुराणवस्तु-शास्त्रविषयक अशा अनेक वस्तु यांत आहेत. पत्ताडकलच्या ८व्या शतकांतील नटराज व इतर मूर्ति, सुपार्श्व व पार्श्वनाथ अशा जैन मूर्ति, २५० पेक्षां वर इतर मूर्ति, अनेक शिलालेख, ताम्रपट, शस्त्रें, मुद्रा यांत आहेत. यांत विजयनगर व मराठा घराण्यांच्या मालकीच्या तांब्याच्या नाण्यांचा मोठा संग्रह आहे. या प्रदेशांत चोलांचा प्रभाव कसा पडला याचा अभ्यास करण्यासाठीं ' राजाधिराज ' हें वचन ज्यांवर आहे अशा चांदीच्या नाण्यांचा एकमेव असा मोठा सांठा येथें असून तो फार महत्वाचा आहे. चुडकुलानंद व मुलानंद, पञ्चटंक वगैरे व आंध्र येथील शिशाचीं नाणींहि आहेत.

३९ हंपी संग्रहालय

विजयनगरच्या महान् साम्राज्याची राजधानी असलेल्या ' हंपी ' येथें हें पुराण-वस्तु संग्रहालय व्यवस्थित जागीं आहे. यांतील वस्तूंत शिल्पकृति, सतीशिला, वीर-शिला, स्तंभ व इतर वास्तुकृति, मातीच्या विविध वस्तु, शिलालेख, ताम्रपट, ताडपत्रांवरील लेख, पारदर्शक रंगचित्रें, सुवर्ण दागिने, मुद्रा आणि अनेक दक्षिणी राज्यकर्त्यांचीं विविध नाणीं यांत आहेत. विजयनगर साम्राज्यांतील बहुतेक नाण्यांचा येथें व्यवस्थित संग्रह आहे.

४० बारीपाडा (ओरिसा) संग्रहालय

या पुराणवस्तु संग्रहालयांत अश्मयुगा-पूर्वीची व अश्मयुगीन हत्यारें, तांब्याच्या कुऱ्हाडी, शिल्पकृती, मयूरभंज येथील भांजा घराणें व ओरिसांतील इतर राजघराणीं यांचे ताम्रपट व ऐतिहासिक कागदपत्रें, मणी व मातीच्या वस्तु, शिलालेख, सनदा, ताडपत्री हस्तलिखितें शिक्के, मुद्रा वगैरे विविध वस्तु आहेत. नाणक संग्रहांत निरनिराळ्या ऐतिहासिक कालांतील सोन्याचीं, चांदीचीं, तांब्याचीं व अनेक छिद्रांकित नाणीं आहेत.

४१ ओरिसा संग्रहालय (भुवनेश्वर)

या पुराणवस्तु संग्रहालयांत इतिहासपूर्व-

कालीन विविध वस्तु, दगडी शिल्पकृति, धातूच्या प्रतिमा, मातीच्या वस्तु, हत्यारें, रंगचित्रें, ताडपत्री हस्तलिखितें, ऐतिहासिक कागदपत्रें, ताम्रपट वगैरे आहेत. नाणकसंग्राहांत अनेक प्रकारचीं प्राचीन, अर्वाचीन व पाश्चात्य, पौर्वात्य नाणीं आहेत.

४२ शीख संग्रहालय (अमृतसर)

यांतील वस्तूंत शस्त्रें व शस्त्रागार, शीख इतिहासाचें दर्शन घडविणारीं रंगचित्रें, पत्रें, ताम्रपट, गुरुमुखींतील जुनीं हस्तलिखितें; थोर शीख पुरुषांचीं शस्त्रें, वस्त्रें व विशिष्ट वस्तु वगैरे असून नाणींहि अनेक आहेत. या नाणक संग्रहांत दक्षिणी नाण्यांपेक्षां उत्तरी नाणीं अधिक आहेत.

४३ राजपुताना संग्रहालय (अजमेर)

राजस्थानच्या पुरातन वस्तु व दस्तऐवज यांचें जतन करण्याच्या दृष्टीनें स्थापन झालेल्या या संग्रहांत विविध प्रकारच्या अनेक ऐतिहासिक वस्तु असून त्यांचे निरनिराळे पुढील प्रमाणें विभाग आहेत :—

प्रागैतिहासिक विभाग, शिल्पकला विभाग, शिलालेख व ताम्रपट, जुनी रंगचित्रें व छायाचित्रें, शस्त्रें व शस्त्रागार, अधाई दिन का झोंपडा-वस्तु, समकृति वा अन्य प्रदर्शित वस्तु, उद्योग-कला वस्तु इ.

नाणकसंग्रह निराळा असून यांत जुनीं नाणीं फार आहेत. राजपुतांच्या नाण्यांचा संग्रह यांत छान आहे. मांडणीहि ठीक व ठळक आहे.

४४ अलवार - संग्रह

या संग्रहांत ठळक चार विभाग आहेत. औद्योगिक विभाग, रंगचित्र विभाग, शस्त्रागार विभाग व पुराणवस्तु विभाग. पहिल्यांत हजारावर विविध वस्तूंचा संग्रह असून दुसऱ्यांत मोंगल व राजपूत शैलींतील २००० कलाकृती व महत्वाचीं हस्तलिखितें आहेत. तिसरा शस्त्रागार विभाग यांत १५००० शस्त्रें कलात्मक व ऐतिहासिक महत्वाचीं आहेत. चौथ्या विभागांतहि अनेक महत्वाच्या वस्तु आहेत. या विभागांत नाण्यांचा पोटविभाग असून त्यांत अनेक राजवटींतील जुनी नाणीं आहेत. हा नाणकसंग्रह अलिकडचाच आहे.

४५ भरतपूर - संग्रह

पुराण वस्तु विभाग, शिल्पकला, रंगचित्रें, हस्तलिखितें, पुरालेखविद्या, हस्तकला, भुस्तरशास्त्र, शस्त्रें व शस्त्रागार आणि नाणक-विभाग असे यांत निरनिराळें विभाग आहेत. नाणकविभागांत ग्रीक, कुशान, हूण, वर्धन, गुप्त, सातवाहन, मौर्य, चालुक्य, राष्ट्रकूट, दिल्लीचे सुलतान, मोंगल, विजयनगर, मराठे, राजपूत यांची नाणीं आहेत.

४६ झालावाड - संग्रहालय

यांत शिल्पकलाकृती, कोरीव लेख, हस्तलिखितें, रंगचित्रें, खनिज वस्तु, शस्त्रें, प्राचीन दगडी हत्यारें, प्राचीन शिल्पकलेचे २०० वर

उपयुक्त नमुने आणि नाणीं असे विभाग आहेत नाणकविभागांत बरींच नाणीं प्राचीन व दुर्मिळ अशीं आहेत.

४७ सरदार संग्रहालय (जोधपूर)

या संग्रहालयांत पुराणवस्तुशास्त्र, शिल्प-कलाकृति, शिलालेख, ताम्रपट, भूर्जपत्र-हस्त-लिखितें, ऐतिहासिक कागदपत्र, शस्त्रास्त्रें, प्राचीन चित्रें, सृष्टिविज्ञान, वस्त्रें, मातीच्या पुराणवस्तु, खनिज पदार्थ आणि नाणीं असे विभाग आहेत. नाणक विभाग व्यवस्थित असून त्यांत प्राचीन व अर्वाचीन सोनें, रुपें, तांबें, शिसें अशा निरनिराळया नाण्यांचा संग्रह आहे.

या संस्थेतर्फे राष्ट्रकुटांचा इतिहास, मारवाडचा इतिहास, राठोडांचें वैभव, राजपुतान्याचा इतिहास, मंदसोरचे बोलके दगड अशीं ऐतिहासिक पुस्तकें प्रसिद्ध झालीं असून नाणकशास्त्रावरील महत्वाचें प्रकाशन म्हणजे ' मारवाडचीं नाणीं ' हें इंग्रजी पुस्तक होय.

४८ संगरिया स. छो. संग्रहालय

ग्रामोत्थान विद्यापीठाचें हें संग्रहालय तिबेट, चीन. ब्रह्मदेश, सिलोन येथील ऐतिहासिक वस्तूंनीं युक्त असून, अनेक शिल्पकलाकृती, मातीच्या वस्तु, रंगचित्रें, मूर्ति, शस्त्रें इ. वस्तु यांत व्यवस्थित मांडून ठेवलेल्या आहेत. नाण्यांचा संग्रह निराळा असून त्यांत प्राचीन व अर्वाचीन बरींच नाणीं आहेत. बयाणा निधींतील नाणींहि अनेक आहेत.

४९ उदेपूर-प्रताप संग्रहालय

यांत पुराणवस्तुविभाग, स्थानिक विभाग व संकीर्ण असे तीन मुख्य विभाग असून पहिल्या विभागाचे शिल्पकलाकृती, शिलालेख, ताम्रपट व नाणीं असे पोटविभाग आहेत. नाणकसंग्रह व इतर मौल्यवान वस्तु रात्रीं बंदिस्त खोलींत, दुहेरी कुलुपें लावून ठेवण्यांत येतात. नाणकसंग्रहांत प्राचीन नाणीं बरींच असून त्यांत सोनें, चांदी, तांबें अशा तिन्हीं धातूंचीं आहेत.

५० अलाहाबाद संग्रहालय

शिल्पकृती, मातीच्या वस्तु, मणी, मोहरा, मुद्रा, चित्रें, शिलालेख, ताम्रपट, कागदपत्र अशा अनेक प्राचीन वस्तूंमुळें या संग्रहाला विशिष्ट दर्जा आला आहे. गांधार शिल्प, ५००० वर मातीच्या सुंदर वस्तु, इंडो-पर्शियन, मोंगल, राजस्थानी रंगचित्रें, गुलेर व बसोहली कलाकृती; संस्कृत, हिंदी, पर्शियन, अरेबिक हस्तलिखितें इ. यांत आहेत. नाणकसंग्राहाची मांडणी ठीक असून त्यांत भारतीय व बाहेरील अनेक नाणीं आहेत. कौशांबी येथील राजांची अनेक नमुनेदार नाणीं या नाणकसंग्रहांत आहेत.

५१ महात्मा हिंदी संग्रहालय (काल्पी)

यांत इ. स. च्या प्रारंभापासून १७ च्या शतकापर्यंतच्या कालांतील पुरातन वस्तूंचा संग्रह करण्यांत आलेला असून त्यांत शिल्पकृती, रंगचित्रें, मातीच्या वस्तु, मूर्ति, शिलालेख, हस्तलिखितें, अनेक राज्यकर्त्यांचीं नाणीं आणि विशेष म्हणजे या संग्रहांत नाणीं पाडण्याचा एक प्राचीन सांचाहि आहे. नाण्यांच्या सांठ्यांत सोन्याचीं चांदीचीं, तांब्याचीं व ब्रॉंझचींहि नाणीं आहेत.

५२ गुरुकुल संग्रहालय (हरिद्वार)

यांतील पुराणवस्तुविभागांत अनेक शिल्पकृती, शिलालेख, मूर्ति, ताम्रपट नाणीं वगैरे आहेत. इंडो-ग्रीक जमातीचीं, कुशान, गुप्त, मध्ययुगीन व मोंगलकालीन, गणराज्याचीं आणि विदेशी नाणीं यांचा बराच मोठा संग्रह आहे.

५३ लखनौ सरकारी संग्रह

या संग्रहालयांत पुराणवस्तु, नाणीं, रंगचित्रें सृष्टिविज्ञान असे विभाग आहेत. नाण्यांत अनेक नाणीं प्राचीन व दुर्मिळ आहेत. गुप्त व मोंगलकालीन छिद्रांकित नाण्यांचाहि चांगला सांठा आहे. या संस्थेतर्फे नाणकशास्त्रावरील कांहीं पुस्तकें प्रकाशनांत आलीं असून 'गुप्त, मौखरी इ. नाणीं, दिल्लीच्या सुलतानांचीं नाणीं' 'मोंगली नाणीं (दोन भाग)' औंधच्या राजाचीं नाणीं वगैरेंचा त्यांत अंतर्भाव आहे.

५४ पुराण वस्तु संग्रह (मथुरा)

यांत ५ हजारांवर विविध पुराणवस्तु आहेत. शिला शिल्पकृती, शिलालेख, उठाव-चित्रें, विटालेख, चुन्याचे ठसे, ब्राँझच्या वस्तु, नाणीं वगैरे. कुशानकालीन कलावस्तूंचा यांतील संग्रह कौतुकास्पद आहे. या संग्रहांतील सुंगकालीन परश्वम यक्षाची अजस्र मूर्ति ही अतिप्राचीन शिल्पकलेचा उल्लेखनीय नमुना आहे. नाणीं प्राचीन, तशींच अर्वाचीनहि असून त्यांत कित्येक दुर्मिळ आहेत.

५५ सारनाथ संग्रहालय

बनारसजवळच्या सारनाथ येथील या संग्रहांत विविध प्राचीन वस्तूंचा सांठा आहे. राजमुद्रा, नाणीं वगैरेंचाहि यांत समावेश आहे.

५६ पुराणवस्तु संग्रहालय, बनारस

यांत प्राचीन रंगचित्रें, वस्त्रें, जडजवाहीर, शस्त्रें, नाणीं, कागदपत्रें इ. चा ठीक संग्रह आहे. हें बनारस हिंदु विद्यापीठाच्या आवारांत असून नाणीं व मौल्यवान वस्तु एका बंदिस्त खोलींत तिजोरींत ठेवलेल्या असतात. नाण्यांत प्राचीन, तशींच अर्वाचीन व अनेक दुर्मिळ अशीं असून सुवर्ण, रौप्य व ताम्र अशा तिन्ही धातूंचीं आहेत.

५७ भारतीय संग्रहालय (कलकत्ता)

या संग्रहालयांत मानवशास्त्र, पुराणवस्तुशास्त्र, कला, भूगर्भशास्त्र, प्राणीशास्त्र आणि औद्योगिक असे सहा विभाग आहेत. पुराणवस्तुविभागांत

उत्तमोत्तम वस्तूंचा मोठा संग्रह असून त्यांत ख्रिस्तपूर्व ४थ्या शतकापासूनच्या अनेक वस्तु आहेत. भारतीय नाण्यांचा एक फार मोठा प्रातिनिधिक संग्रह येथें आहे. पूर्वकालीन नाण्यांत छिद्रांकित, आदिवासी, इंडो-ग्रीक, इंडो-पार्थियन, इंडो-सिथियन, कुशाण, गुप्त, मौखरी, काश्मीर, कांग्रा, आसाम, नेपाळ; तसेंच आंध्र, चोल, पांड्य, चेर, चालुक्य, राष्ट्रकूट, शिलाहार, भोज, सुलतान, विजयनगर, मराठे इ. चीं नाणीं यांत आहेत. मुसलमानी नाण्यांत सुलतानी, बहमनी, मोंगली, नबाबी अशीं नाणीं असून निरनिराळ्या संस्थानांच्या नाण्यांचाहि प्रातिनिधिक संग्रह आहे. हा नाणकसंग्रह संपन्न असा असून नाण्यांच्या अभ्यासू लोकांनीं जरूरीनेंच तो पहावा अशा योग्यतेचा आहे.

'भारतीय संग्रहालयांतील नाण्यांचें पुस्तक,' 'मुसलमानी अमदानींतील नाणीं,' चार भाग, 'मुसलमानेतर अंमदानींतील नाणीं' अशीं कांहीं नाणकशास्त्रावरील पुस्तकेंहि या संस्थेतर्फे प्रसिद्ध झालीं आहेत.

५८ व्हिक्टोरिया मे. हॉल संग्रह

कलकत्यांतील या संग्रहांतहि अनेक जुनीं व दुर्मिळ नाणीं आहेत.

५९ आशुतोष संग्रह (कलकत्ता)

याच्या नाणकविभागांत १५०० वर नाणीं असून त्यांत शशांकाची सुवर्णमुद्रा आणि प्राचीन छिद्रांकित व ओतीव नाण्यापासून मोंगल कालीन नाण्यापर्यंतचे सर्व प्रकार आहेत.

६० एशियाटिक सोसायटी संग्रहालय

ही कलकत्त्यांतील एक जुनी महत्वाची संस्था असून तिचे अनेक विभाग आहेत. शिलालेख, ताम्रपट, जुनी नाणीं यांचा सांठा या संग्रहालयांत बराच आहे. नाणीं प्राचीन व अर्वाचीन अनेक आहेत.

६१ वंग साहित्य संग्रहालय

कलकत्ता येथील या संग्रहालयांत साहित्य-–साधनांशिवाय अनेक पुरातन वस्तूंचा सांठा आहे. शिलालेख, ताम्रपट, मूर्ति, शस्त्रें, नाणीं वगैरे. नाण्यांच्या संग्रहांत प्राचीन अर्वाचीन विविध नाणीं आहेत.

६२ सेन संग्रह (माल्डा)

यांत ब्राह्मणकालीन देवांच्या मूर्ति, बौद्धमूर्ति, ताम्रपट वगैरे वस्तु आहेत. नाणक संग्रहांत बंगालचे प्रारंभींचे स्वतंत्र सुलतान, दिल्लीचे सुलतान, पठाण, मोंगल, यांचीं व नेपाळ, त्रिपुरा येथील अनेक नाणीं आहेत. या नाण्यांत अनेक नाणीं दुर्मिळ अशी असल्यानें बरींच महत्वाचीं आहेत.

६३ टागोर संग्रहालय (शांतिनिकेतन)

यांत अनेक विभाग असून पुराणवस्तु विभागांत नाणकसंग्रह आहे. त्यांत भारतीय अनेक दुर्मिळ नाण्यांचा सांठा आहे. परदेशी प्राचीन नाणींहि बरींच आहेत.

६४ सेरामपूर संग्रह

यांत ३४ भारतीय भाषांत भाषांतरित

केलेल्या बायबलच्या पहिल्या आवृत्त्या आहेत. 'समाचार दर्पण' व 'दिग्दर्पण' या बंगालच्या पहिल्यानें प्रकाशनांत आलेल्या वृत्तपत्रांचे पहिले अंक आहेत. पुराणवस्तुशाखेंत शिलालेख, ताम्रपट व अनेक नाणीं आहेत.

६५ दिल्ली विद्यापीठ संग्रहालय

या संग्रहालयांतील मानववंशसंशोधन विभाग सर्वांत मोठा असून तो विद्यार्थ्यांच्या दृष्टीनें अतिशय उपयुक्त आहे. त्यांत भारतांतील व इतर ठिकाणच्या आदिवासींच्या अनेक वस्तु मांडलेल्या आहेत. इतर विभागहि महत्वाचेच आहेत. प्रागैतिहासिक विभागांत प्रागैतिहासिककालीन व इतिहासाच्या अगदीं सुरवातीच्या कालांतील वस्तूंचे अनेक प्रातिनिधिक नमुने आहेत. त्यांत अश्मयुगपूर्वकाळांत वापरल्या जाणाऱ्या कुऱ्हाडी, फरशा, सुरे, विळे, कोयते, खुरपीं व बरचीचा विकास दाखविणारीं निरनिराळीं हत्यारें ठेवलेलीं आहेत. त्याचप्रमाणें मद्रास व मयूरभंज येथील ग्रॅनाइट, ट्रॅप व बासाल्टचीं पूर्व उत्तर अश्मयुगकालीन छिन्नीसारखीं हत्यारें व गुजरात, मुंबई येथील पाषाणहि मांडलेले आहेत. यांतील मुद्रा, तांबड्या मातीच्या पुतळ्या व मातीच्या भांड्यांचे अवशेष इ. नमुने यांवरून हरप्पा संस्कृतीचा बोध होतो. या संग्रहांतील प्राचीन नाण्यांचा सांठाहि बराच महत्वाचा आहे.

६६ इंडिया ऑफिस संग्रहालय

ईस्ट इंडिया कंपनीनें सन १८०१ मध्यें इंग्लंडमधील लीडन हॉल स्ट्रीटवरील एका व्यवस्थित वास्तूंत इंडिया ऑफिस लायब्ररीची स्थापना केली. रॉबर्ट ओर्म या इतिहासकारानें पौर्वात्य देशांचा पद्धतशीर अभ्यास करण्याच्या दृष्टीनें एक संग्रहालय स्थापन करावें अशी कांहीं दिवसांपूर्वी सदर कंपनीला आग्रहाची विनंति केली होती आणि आपल्या विनंतीला मूर्तस्वरूप देण्यासाठीं त्यानें आपल्याजवळचीं कागदपत्रें, हस्तलिखितें, ग्रंथ, ताम्रपट, नकाशे व नाणीं संग्रहाला विनामूल्य देण्याचीतयारी दर्शविली होती. तथापि त्याच्या हयातींत या संग्रहालयाची स्थापना न होतां मृत्यूनंतर झाली. स्थापना झाल्यावर प्रांतिक सरकारांना जीं फर्मानें आलीं त्यांत लिहिलें होतें — " निरनिराळ्या खात्यांच्या कचेऱ्यांत आणि कोठारांत असलेलीं कागदपत्रें, हस्तलिखितें, पत्रव्यवहार; तसेंच निरनिराळ्या ठिकाणचे शिलालेख, ताम्रपट, मुद्रा, नाणीं इ. या संग्रहालयासाठीं जमा करण्याची दक्षता घ्यावी ".

सन १७९९ सालीं सुलतान टिपूचा पाडाव झाल्यावर त्याचा एक मोठा संग्रह ब्रिटिशांच्या हातीं आला. या संग्रहांत अरेबिक, पर्शियन, हिंदुस्थानी व इतर भाषांतील सुमारें दोन हजारांवर महत्वाचे ग्रंथ होते. शिलालेख, ताम्रपट होते आणि अनेक नाणींहि होतीं. संस्कृत भाषाप्रेमी कोलब्रुक यानें दोन हजार संस्कृत हस्तलिखित ग्रंथ दिले. सर मॅकेन्झी यानें तामीळ ग्रंथसंग्रह दिला. आणि ऑर्थर कोकनें वेदांच्या हस्तलिखितांचा मोठा सांठाच दिला. त्याचप्रमाणें कोणी भूर्जपत्रावरील ग्रंथ, कोणी शिल्पकृती, कोणी शिलालेख, ताम्रपट व कोणी नाणीं अशा अनेक वस्तु या संग्रहास

वहाल केल्या.

इंडिया ऑफिस संग्रहांतील विशेष उल्लेखनीय वस्तु म्हणजे कालिकतचा झामोरिन राजा आणि डच ईस्ट इंडिया कंपनी यांनीं सन १६९१ सालीं केलेल्या मल्याळी भाषेंतील तहनाम्याचा सुमारें पस्तीस तोळे वजनाचा कोरीव सुवर्णपट होय.

सन १८५९ सालानंतर संग्रहालय कंपनीकडून ब्रिटिश सरकारकडे आलें.

भारत हें पुराणवस्तूंच्या अवशेषांचें आगर आहे याची सर्वत्र प्रसिद्धी असल्यानें पुराणवस्तूंचा व्यापार करणारांनीं अशा वस्तु येईल त्या किंमतीस परदेशांत नेऊन विकण्याचा सपाटा चालविला होता. परदेशांत जाणारा हा पुराण-वस्तूंचा ओघ थांबविण्यासाठीं भारत सरकारनें त्याला प्रतिबंधक कायदा केला आणि त्यानंतर या संग्रहालयाकडेच विविध वस्तूंचा ओघ लागला व अशा रीतीनें भारतीय विविध वस्तूंच्या संकलनामुळें हें संग्रहालय संपन्न बनलें.

भारताला सन १९४७ सालीं स्वातंत्र्य मिळालें, तेव्हां इंग्लंडबरोबरचे भारताचे बहुतेक प्रश्न सलोख्यानें सुटले; तथापि ह्या संग्रहासह इंडिया ऑफिस लायब्ररी भारताच्या हवालीं करण्याचा प्रश्न मात्र सुलभपणें सुटला नाहीं व त्यांत पाकिस्तानी तक्रारींमुळें तर गुंतागुंत जास्त वाढली. मूळ ग्रंथ न मिळतां त्यांच्या मायक्रोफिल्मस् घ्याव्या असा एक पर्याय निघाला. पण त्यामुळें ग्रंथांचा प्रश्न जरी कसाबसा सुटला; तरी ईतर वस्तूंचें काय व कसें हा प्रश्न आहेच ! बघूं आतां काय होतें तें !

साधार इतिहास लेखनासाठीं शिलालेख, ताम्रपट, अस्सल पत्रें, दंतकथा, बखरी, लोककथा, गाणीं, मूर्ति, शिल्पकृती, भांडीं, सामान, वस्त्रें, हत्यारें, चित्रें, नाणीं वगैरे वस्तूंची भारताला फार जरूरी असल्यानें इंडिया ऑफिस संग्रह जशाचा तसा भारतालाच मिळणें रास्त व आवश्यक आहे.

संग्रहालय हें शैक्षणिक क्षेत्रांतील एक महत्वाचें साधन असून भारतीय गणराज्याच्या स्थापनेनंतर आपल्या राष्ट्रीय जीवनांत संग्रहालयांना फार मोठें महत्व प्राप्त झालेलें असल्यानें त्यासाठींहि लंडन मधील इंडिया ऑफिसचें संग्रहालय भारताला जशाचें तशें मिळणें अवश्य आहे.

समाप्त